



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १५ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# आज राज्यातील 29 मनपासाठी मतदान

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. १५) मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. एकूण २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत असून एकूण ३ कोटी ४८ लाख ७९ हजार ३३७ मतदारांकरिता एकूण ३९ हजार ९२ मतदान केंद्राची व्यवस्था केली आहे. महाराष्ट्रात २९ महानगर पालिकेच्या निवडणूका राज्यातील भविष्यातील राजकारणाची नांदी ठरणार आहेत. या निवडणूकात शहर भागात कोणत्या पक्षांचा दबदबा आहे हे निश्चित होणार असून राजकारणातील नव्या आघाडी आणि युतीची देखील चुणूक पाहायला मिळणार आहे. गेली अनेक वर्षे काही महापालिकांमध्ये निवडणूक झालेली नाही. त्यामुळे येत्या १५ जानेवारीला २९ महानगर पालिकेत मतदान होत असून मतमोजणी दुस-या दिवशी १६ जानेवारी रोजी होणार आहे.

**बदललेले राजकारण, नवे मित्र**

एकीकडे सत्ताधारी महायुती ( भाजपा-शिवसेना शिंदे गट-राष्ट्रवादी अजित पवार गट ) मैदानात आहेत. तर दुसरीकडे महाविकास बहुजन आघाडी ( काँग्रेस-शिवसेना उद्धव गट- राष्ट्रवादी शरद पवार गट ) असा विरोधी सामना असला तरी विविध मुंबई, ठाणे वगळता पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर, जालना या १४ महानगरपालिकांच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजपा आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार राष्ट्रवादी स्वंतत्र लढा देत आहेत. याशिवाय मनसे, AIMIM, वंचित बहुजन आघाडी आणि अनेक स्थानिक आघाड्या आहेत. मुंबईत काँग्रेस आणि वंचित एकत्र लढत आहेत.



**मोठ्या महानगरातील स्थिती-** मुंबई महानगरपालिका (एग्व) : २२७ नगरसेवकांच्या जागा असणारी देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिकेतील लढाई सर्वात रंगतदार होणार आहे.

**गेल्यावेळची सत्ता:** शिवसेना (अखंड ) उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली

यावेळचे समीकरण महायुती: भाजपा अ शिवसेना UBT-मनसे-NCP (शरद पवार) । कांग्रेस-वंचित

**मुंबईच्या निकालाचा संपूर्ण राज्याच्या राजकारणावर परिणाम** -ठाणे हा ऊमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जातो. तर कल्याण-डोंबिवली येथे शिवसेना आणि भाजपाचा दबदबा आहे. यंदा उद्धव ठाकरे यांची UBT-राज ठाकरे यांची मनसे एकत्र आल्याने मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड:** पश्चिम महाराष्ट्राच्या या दोन्ही महानगर पालिका राष्ट्रवादीकडून सध्या भाजपाच्या ताब्यात गेल्या आहेत. पुण्यात भाजपाने सर्व १६५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. तर पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी अजितदादा गटात मोठी टक्कर आहे.

**विदर्भ आणि मराठवाडा : काँग्रेस, AIMIM आणि वंचितचा प्रभाव :**

नागपुर : नागपूर महानगर पालिकेत १५१ जागा असून भाजपाचा पूर्वापार राज्य आहे. येथे काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने देखील चांगले उमेदवार देउन आव्हान दिले आहे.

**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

येथे शिवसेनेचा पूर्वीपासून दबदबा राहिलेला आहे. परंतू आता शिवसेनेची दोन शकले झाली आहे. येथे AIMIM देखील एक मजबूत दावेदार आहे. भाजपा, शिवसेना (दोन्ही गट) आणि AIMIM यांच्या तिरंगी निवडणूक होणार आहे.

**अकोला, अमरावती, लातूर-**या शहरात वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस आणि स्थानिक पक्ष भाजपासाठी मोठे आव्हान आहेत. अकोलामध्ये वंचितचा प्रभाव निर्णायक मानला जात आहे.

**उत्तर महाराष्ट्र आणि खान्देश**

नाशिक, धुले, जळगाव आणि जालनात भाजपा मजबूत स्थितीत आहे., परंतू महाविकास आघाडी आणि स्थानिक पक्षांच्या आव्हानांमुळे ही लढाई आता एकतर्फी राहिलेली नाही. नाशिकात शिवसेना (UBT)-मनसे-काँग्रेस-NCP (SP) चा संयुक्त प्रयोग चर्चेत आहे.

मुस्लिम बहुल(पान २ वर)

# ठाकरे बंधूंचा PADU मशीनवर आक्षेप

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी आहे. राज्यभरात निवडणूक साहित्याचे वितरण सुरू करण्यात आले आहे. मतदान केंद्रांपर्यंत कन्ट्रोल मशीन आणि अन्य साहित्य पोहोचवले जात आहे. अशातच निवडणूक आयोगाने आता एक PADU नावाचे नवीन मशीन आणले आहे. अचानक हे यंत्र आणल्यावर ठाकरे बंधूंनी यावर आक्षेप नोंदवला. पत्रकारांशी बोलताना राज ठाकरे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केले.



पाडू मशीन सगळीकडे ठेवले जाणार आहे. व्हीव्हीपॅट बंद पडले, तर हे मशीन वापरले जाणार आहे. पण, याबाबत कोणतीही माहिती निवडणूक आयोगाने दिलेली नाही. ईव्हीएमला नवीन मशीन जोडण्यासंबंधी आधी माहिती का दिली नाही? नवीन मशीन राजकारण्यांना दाखववेसे आयोगाला वाटले नाही. काय प्रकारचे राजकारण सुरू आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे, असे राज ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावर मुंबई मनपा आयुक्तभूषण गगराणी यांनी महत्त्वाचा खुलासा केला.


पाडू मशीन मुंबईमध्ये सरसकट वापरले जाणार नाही. काही अपवादात्मक, आपातकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास हे मशीन वापरले जाईल. व्हीव्हीपॅटला पर्याय म्हणून गरज पडल्यावर हे मशीन वापरले जाणार आहे. यावेळी जी मतमोजणी होईल, ती कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट यांना सोबत जोडून करण्याचे आदेश आहेत. जर कंट्रोल युनिटचा डिस्प्ले काम करत नसेल, तर हे (पाडू) एक यंत्र आहे. हे पण कंट्रोल युनिटच आहे. तसेच आहे. ते बॅकअप म्हणजे पर्याय असणार आहे, अशी माहिती गगराणी यांनी दिली.

# आता भारत 55 देशांमध्ये व्हिसा-मुक्त

## भारतीय पासपोर्टला मिळाली ताकद

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताच्या पासपोर्टने आणखी प्रगती केली असून जागतिक स्तरावर पासपोर्टच्या शक्तीमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. या वर्षी आशियाई देशांचे वर्चस्व कायम आहे. सिंगापूरचा पासपोर्ट जगातील सर्वात शक्तिशाली राहिला आहे, हा १९२ देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवास करण्याची परवानगी देतो. त्यानंतर जपान आणि दक्षिण कोरिया आहेत. दरम्यान, संयुक्त अरब अमिराती या वर्षी विशेषत: प्रमुख आहे, पाचव्या स्थानावर पोहोचले आहे.

भारताच्या पासपोर्ट रँकिंगमध्येही सुधारणा झाली आहे. भारताने पाच स्थानांनी प्रगती करत अल्जेरियाशी बरोबरी करत ८० व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय नागरिक आता ५५ देशांमध्ये पूर्व व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात. यामध्ये व्हिसा-मुक्त, व्हिसा-ऑन-अरायव्हल आणि इलेक्ट्रानिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन सुविधांचा समावेश आहे. गेल्या वर्षी भारत ८५ व्या स्थानावर होता. या अहवालातून भारताच्या पासपोर्टची ताकद हळूहळू वाढत आहे आणि भविष्यात भारतीयांसाठी आंतरराष्ट्रीय प्रवास सोपा होउ शकतो असे दिसत आहे. या वाढीव सुविधेचा फायदा आशिया, आफ्रिका, ओशनिया, कॅरिबियन आणि मध्य पूर्वेतील अनेक भागांमधील भारतीय प्रवाशांना होईल. लोकप्रिय व्हिसा-मुक्तदेशांमध्ये थायलंड, मलेशिया, मारिशस, नेपाळ, बार्बाडोस, फिजी, सेंट व्हिन्सेंट(पान २ वर)



# स्कूल बॅगमध्ये आढळले नवजात अर्भक; आरोपी पालकांचा शोध सुरु

**भंडारा/प्रतिनिधी-** माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यातील मानेगाव (सडक) येथे समोर आली आहे. एका अज्ञात निर्दयी मातेने किंवा पालकांनी आपल्या अवघ्या ८ ते १० दिवसांच्या मुलीला एका स्कूल बॅगमध्ये भरून नाल्याच्या काठावर बेवारस सोडून दिले. सुदैवाने, हे बाळ जिवंत असून सध्या सुरक्षित आहे. मानेगाव (सडक) परिसरातील उद्घजित पाल सिंग भाटिया यांच्या शेतशिवारातून जाणा-या नाल्याजवळ स्थानिकांना एक काळ्या रंगाची स्कूल बॅग पडलेली दिसली. संशय आल्याने जवळ जाउन पाहिले असता, त्या बॅगमध्ये एक जिवंत नवजात स्त्री जातीचे अर्भक आढळून आले. कडाक्याच्या थंडीत आणि(पान २ वर)



# हजारीबागमध्ये भीषण बॉम्ब ब्लास्ट, तिघांचा मृत्यू

## एकजण गंभीर जखमी



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** झारखंडमधील हजारीबाग जिल्ह्यात बुधवारी भीषण स्फोटाची घटना घडली. हबीबीनगर परिसरात झाडे-झुडपे साफ करण्याचे काम सुरू असताना जमिनीत पुरुन ठेवलेल्या बाम्बचा अचानक स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. घटनेमुळे परिसरात एकच खळबळ ऊडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेत मो. सद्दाम, परवीन आणि आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. जखमी झालेल्या व्यक्तीला ऊपचारासाठी हजारीबाग सदर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

**झुडपांमध्ये दडवलेला बॉम्ब-** स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, हबीबीनगर परिसरात झाडे-झुडपे आणि कचरा साफ करण्याचे काम सुरू होते. याच दरम्यान फावडा किंवा इतर अवजारे जमिनीत लपवून ठेवलेल्या बॉम्बला लागल्याने जोरदार स्फोट झाला. घटनेची(पान २ वर)




# अनेक लाडक्या बहिणी नोव्हेंबर, डिसेंबरच्या लाभापासून वंचित

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता वर्ग करण्यात आल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे; मात्र अजूनही राज्यातील अनेक लाडक्या बहि-णींना नोव्हेंबर आणि डिसेंबरचे पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे या लाडक्या बहि-णी नाराज झाल्या आहेत. लाडकी बहीण योजनेची केवायसी करण्याची शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०२५ इतकी होती. पण केवायसी करून देखील नोव्हेंबर आणि डिसेंबरचे पैसे अनेक लाडक्या बहिणींना मिळाले नाहीत. राज्यात अनेक लाडक्या बहि-णींनी केवायसी करून देखील त्यांना योजनेचे पैसे मिळाले नाहीत. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, आम्ही पात्र लाडक्या बहिणींना नोव्हेंबर आणि डिसेंबरचे दोन हप्ते वर्ग केले आहेत. महापालिका निवडणूक मतदानाच्या आधीच पात्र महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. दरम्यान, दोन महिन्यांचे एकत्रच पैसे जमा करण्यात येणार होते. परंतु, अग्रिम रक्कम जमा करण्यास निवडणूक आयोगाने मज्जाव केल्याने सरकारने केवळ डिसेंबर महिन्याचा निधी वितरित केला आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या वेळी लाडकी बहीण योजनेतील दोन हप्ते एकत्र देण्यात आले होते. त्यामुळे विरोधकांकडून टीका करण्यात आली होती. यावेळीही नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा निधी एकत्र वितरित करण्यात येणार होता. मात्र, विरोधकांनी त्यावर आक्षेप घेतला. त्यानुसार, सरकारने आता फक्त नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा नियमित हप्ता पाठवला आहे. जानेवारी महिन्याचा हप्ता पाठवण्यात आलेला नाही.








# संपत्तीसाठी जावयाने केली सास-याची हत्या

## मृतदेह पाईपलाईनमध्ये टाकला

**भंडारा/ प्रतिनिधी-**सास-याची संपत्ती मिळावी, या लालसेपोटी जावयानेच सास-याची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना भंडा-यात समोर आली आहे. मित्राच्या मदतीने जावयाने ही हत्या केल्याप्रकरणी आता कारधा पोलिसांनी आरोपी जावई आणि त्याच्या मित्राला अटक केली आहे. ही निर्घृण हत्या भंडा-याच्या कोकणागड येथे घडली. किशोर कंगाले (६०) असे मृत सास-याचे नाव आहे. तर पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीमध्ये जावई अमित लांजेवार (३६) आणि त्याचा मित्र योगेश पाठक (२६) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत किशोर कंगाले हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून त्यांना एकुलती एक मुलगी असून तिने अमित लांजेवार याच्यासोबत आंतरजातीय विवाह केला आहे. या विवाहाला सुरुवातीपासूनच मृत किशोर कंगाले यांचा विरोध होता. त्यामुळे मृतक हे कोकणागड येथे राहून शेती सांभाळत होते.मुलीच्या आंतरजातीय विवाहामुळे मुलगी आणि जावयाला संपत्ती आणि त्यांची कुठलीही मालमत्ता(पान २ वर)





जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महापालिका निवडणुकीत पैशांचा बोलबाला

## मतांचे विभाजन, बहुरंगी लढत

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी गुरुवार आज १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजेपासून मतदान सुरू होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे, तर दुसरीकडे उमेदवारांनी पण आपला प्रचार जोरदार केला आहे. आठ वर्षानंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारांमध्ये उत्साह आहे. जिंकण्यासाठी उमेदवार जोडतोड करत आहे. विविध प्रभागांमध्ये पैसे देखील वाटले जात आहे. जिंकण्यासाठी उमेदवार सर्व प्रयत्न करत आहे. अमरावती महानगरपालिकेमध्ये बहुरंगी लढत होत आहे. त्यामुळे मतांचे विभाजन होणार हे निश्चित आहे. प्रत्येक उमेदवाराला आपलाा पलडा जड वाटत आहे. निवडणुकीमध्ये भाजप,शिंदे सेना, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या पक्षांमध्ये मुकाबला होत आहे. निवडणुकीची चुरस



वाढलेली आहे. आज वैऱ्याची रात्र आहे. यामुळे आपली बाजू भक्कम करण्यासाठी उमेदवार प्रयत्न करत आहे.मतदारांना पैसे वाटले जात आहे.त्यांना वेगवेगळे प्रलोभन उमेदवारांच्या वतीने देण्यात येत आहे. या संदर्भात निवडणूक विभागाकडे अजून पर्यंत कोणतीही तक्रारि झालेली नाहा पण पैशांचा बोलबाला या निवडणुकीमध्ये दिसत आहे. जागोजागी पैशांचा पूर वाहत आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी पैसे वाटण्याची चर्चा जोरावर आहे. राजकीय पक्षाचे प्रतिनिधी निवडणूकीमध्ये जिंकण्यासाठी संपूर्ण जोर लावत आहे. जिंकण्यासाठी आपली पूर्ण ताकद लावत आहे. रोमांचक असा मुकाबला अनेक प्रभागात होत आहे. सर्व पार्टीचे उमेदवार जिंकण्यासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे. भाजपा हिंदुत्वाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढत आहे. हा मुद्दा या निवडणुकीमध्ये किती यशस्वी होणार हे तर निकाल लागल्यावर स्पष्ट होणार आहे. शिंदे सेना, अजित पवार गट, काँग्रेस, भाजपा, बसपा या निवडणुकीमध्ये आपली ताकद आजमावत आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडी, एमआयएम, युनायटेड फोरम सह इतर पार्टीच्या उमेदवारांनी पण जोरावर प्रचार केलेला आहे.

# अकोल्यात ५० लाखाची रोकड जप्त

## खदान पोलिसांची कारवाई

**अकोला :** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमध्ये मतदान सुरू होण्याच्या काही तास अगोदर खदान पोलिसांनी ५० लाखाची रोख रक्कम बुधवारी रात्री जप्त केली. शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत ही कारवाई करण्यात आली. महापालिका निवडणुकीच्या दरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम बाळगण्याचे कारण काय? याचा तपास पोलीस करीत आहेत. या कारवाईची माहिती महापालिका निवडणूक विभाग व प्राप्तिकर विभागाला देण्यात आली. मतदानाच्या पूर्वी घडलेल्या या घटनेमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली.

अकोला शहरातील खदान पोलीस ठाण्यांतर्गत मोठ्या प्रमाणात रोकड आणली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून खदान पोलिसांनी सापळा रचत ५० लाख रुपयांची रोख रक्कम बुधवारी रात्री विद्या नगर भागातून जप्त केली आहे. ही रक्कम बाळगणाऱ्या एका व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. या ५० लाख रुपयांच्या रोख रकमेचा वापर महापालिका निवडणुकीसाठी होत आहे का? याचा सुद्धा तपास केला जात आहे.

**सखोल चौकशी सुरू-**

५० लाख रुपयांची रोख रक्कम पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे. ही रक्कम नेमकी कोणाची, त्याचा वापर कशासाठी होणार होता? याचा सविस्तर तपास व चौकशी केली जात आहे. निवडणूक विभाग व प्राप्तिकर विभागाला देखील याची माहिती दिली. तपासानंतर रकमेबाबत नेमके सांगता येईल, असे खदान पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांनी सांगितले.

अकोला महापालिकेची निवडणूक तब्बल नऊ वर्षांनी होत आहे. महापालिकेच्या २० प्रभागांतील ८० जागांसाठी ४६९ उमेदवार मैदानात आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी विविध प्रभागांमध्ये चुरशीच्या लढती होत आहेत. अनेक ठिकाणी तिरंगी व चौरंगी लढतीची रंगत आहे. महापालिका निवडणुकीमध्ये मतदारांचे पाठबळ मिळण्यासाठी उमेदवारांकडून अतोनात प्रयत्न केले. १५ जानेवारीला शहरातील ६३० मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरू होईल.

# टाकरखेडा शंभू-साऊर रस्त्यावर नालीचे सांडपाणी

## नागरिकांना मोठा त्रास; ग्रामपंचायतीचा सतत पाठपुरावा

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** टाकरखेडा संभू गावातून रामा ते साऊरकडे जाणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील मुख्य रस्त्यावर नालीचे घाण पाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या मार्गावरून दररोज



शाळकरी मुले, महिला, वृद्ध नागरिक तसेच वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र रस्त्यावर साचणाऱ्या सांडपाण्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून दुर्गंधीमुळे आरोग्याच्या समस्याही निर्माण होत आहेत.

विशेषतः पावसाळा व सध्याच्या दिवसांत रस्त्यावर पाणी साचल्याने चिखल तयार होतो. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असून वाहन घसरून पडण्याचे प्रकारही घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामस्थांकडून या समस्येबाबत वारंवार तक्रारी करण्यात येत आहेत. या गंभीर समस्येची दखल घेत टाकरखेडा संभू ग्रामपंचायतीने सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येत असल्याने संबंधित विभागाला पत्रव्यवहार करून समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीमार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी नाराजी ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

सदर रस्त्यावरील नालीचे पाणी त्वरित योग्य पद्धतीने वळवावे, निचरा व्यवस्था सुधारावी व रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामपंचायत व नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल न घेतल्यास नागरिकांचे आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

# पूर्णानगर येथील चार विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता माहपात्र यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या नन्हे सितारे या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, पूर्णानगर येथील चार विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता दुसरीची बुशरा फातेमा साबिर शेख (कविता वाचन), इयत्ता तिसरीची ईश्वरी आशिष राजस (कथाकथन), इयत्ता चौथीची धनश्री मोहन कुकटकर (कविता वाचन) तसेच

करिष्मा चंद्रशेखर गायगोले (स्पोकन इंग्लिश) यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवला. या सर्व विद्यार्थिनींनी आपली कला व गुणवत्ता प्रभावीपणे सादर केली.

यामध्ये इयत्ता चौथीची करिष्मा चंद्रशेखर गायगोले हिने जिल्हास्तरीय स्पोकन इंग्लिश स्पर्धेत प्राथमिक गटातून द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशाबद्दल गावच्या सरपंच ज्योत्स्नाताई गजेंद्रसिंह गहरवाल, उपसरपंच उमेश महिंगे तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका शीला मसराम, इयत्ता चौथीच्या वर्गशिक्षिका माधुरी वाईन्देशकर, प्रीती जिस्कार व अश्विनी बोबडे यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. विनोबा अँपवर सातत्याने विद्यार्थिनींचे व्हिडिओ अपलोड करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्य माधुरी वाईन्देशकर यांनी केले. त्यांच्या या विशेष कार्याबद्दल त्यांना पोस्ट ऑफ द मंथ व स्टार ऑफ द मंथ हे पुरस्कारही मिळाले आहेत.

याशिवाय तालुकास्तरीय समूह नृत्य स्पर्धेतही या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थिनी व शिक्षकवृंदांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# संक्रांतीनिमित्त बोरांचा बाजार



अमरावती-परतवाडा महामार्गावरील आष्टी व वायगाव बसस्टॉप परिसरात मकर संक्रांतीनिमित्त रोडच्या बाजूला बोरांचा बाजार भरला असून ग्रामीण भागातून गोळा करून आणलेले ताजे बोर विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. प्रवासी व नागरिकांकडून बोरांना मोठी मागणी दिसून येत आहे.**छायाचित्र: संतोष शेंडे, टाकरखेडा शंभू**

## १ व १० वरिल उर्वरित

### आज राज्यातील २९ मनपासाठी

शहरांसाठी वेगळे समीकरण मालेगाव, भिवंडी, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर सारख्या शहरात ऋक्षग्क्ष, समाजवादी पार्टी आणि स्थानिक आघाड्या सत्तेची चावी स्वतःच्या हातात ठेवतात. मालेगावात ऋक्षग्क्ष सर्वात मोठी ताकद मानली जात आहे.

**स्थानिक आघाडी आणि किंगमेकर राजकारण** कोल्हापुर, इचलकरंजी, अमरावती आणि अहिल्यानगरात स्थानिक विकास आघाड्या आणि अपक्ष गट सत्तेचे संतुलन निश्चित करतात. या जागांवर निवडणूकीच्या निकालानंतर स्थानिक आघाड्यांची राजकारण आणि वेगाने होण्याची शक्यता आहे.

भाजपा शहरातील महानगर पालिकेतील स्वतःचा दबदबा काय ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. शिवसेना (छएच्र) मुंबई-ठाणे बेल्ट वाचवण्यासाठी संघर्ष करत आहे. काँग्रेस विदर्भ आणि मराठवाड्यात पुनरागमणाची आशा बाळगून आहे. ऋक्षग्क्ष आणि वंचित अनेक महानगरपालिकांत किंगमेकरची भूमिका निभा वठवू शकते.

**२०२९ च्या राजकारणाची दिशा ठरवणारी निवडणूक**२९ महानगरपालिकांच्या निवडणूका स्थानिक सत्तेचा फैसला तर करतीलच परंतू येणा-या २०२९ च्या राजकारणाची दिशा काय असणार हे निश्चित करणार आहेत. भाजपा शहरी भागातील आपल्या दबदबा कायम राखू शकेल का ? की महाविकास आघाडी पुनरागमन नवा संदेश देणार ? या सर्व प्रश्नांची उत्तरे पुढील राजकारणाची दिशा ठरवणार आहेत.

### आता भारत ५५ देशांमध्ये

आणि ग्रेनेडाइन्स आणि इतर समावेश आहेत. व्हिसा-ऑन-अरायव्हल देशांमध्ये इंडोनेशिया, मालदीव, श्रीलंका, केनिया, जार्डन आणि फिलीपिन्स यांचा समावेश आहे. जगातील टाप १० सर्वात शक्तिशाली पासपोर्ट सिंगापूर १९२ देश जपान १८८ देश दक्षिण कोरिया १८८ देश डेन्मार्क, लक्झेंबर्ग, स्पेन, स्वीडन, स्वित्झर्लंड १८६ देश ऑस्ट्रिया, बेल्जियम, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, आयर्लंड, इटली, नेदरलँड्स, न?र्वे १८५ देश हंगेरी, पोर्तुगाल, स्लोवाकिया, स्लोव्हेनिया, युएई १८४ देश

### स्कूल बॅगमध्ये आढळले नवजात

निर्जन स्थळी या बाळाला मरणाच्या दारात सोडून देण्यात आले होते.

या घटनेची माहिती मिळताच पिंपळगाव सडक येथील पोलिस पाटील सुरेश मते यांनी विलंब न लावता लाखनी पोलिसांशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस निरीक्षक सुभाष बारसे यांनी पथकासह घटनास्थळ गाठले आणि बाळाला ताब्यात घेतले. पोलिसांनी तातडीने बाळाला लाखनी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तिथे प्राथमिक उपचार केल्यानंतर, बाळाला पुढील देखभालीसाठी आणि उपचारासाठी भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. ड?क्टरांच्या मते, बाळ साधारण ८ ते १० दिवसांचे असून सध्या त्याची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

### हजारीबागमध्ये भीषण बॉम्ब

माहिती मिळताच सदर पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण परिसराची नाकेबंदी करुन जखमींना बाहेर काढण्यात आले. तसेच, मृतदेह ताब्यात घेउन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. पोलिस प्रशासनाने सांगितले की, बाम्ब तिथे कसा आणि कोणत्या उद्देशाने ठेवण्यात आला होता, याचा सखोल तपास सुरू आहे. बाम्ब जुना होता की, अलीकडेच ठेवण्यात आला, याचाही शोध घेतला जात आहे. पुरावे गोळा करण्यासाठी फारेन्सिक पथक घटनास्थळी पाचारण करण्यात आले आहे.

**याआधीही या परिसरात स्फोट-** विशेष म्हणजे, याच परिसरात २०१६ साली रामनवमीच्या दंगलीदरम्यान बाम्ब बनवताना झालेल्या स्फोटात पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे पुन्हा एकदा याच भागात बॉम्बस्फोट झाल्याने सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### संपत्तीसाठी जावयाने केली सास-याची

देणार नाही, असा संशय जावयाला निर्माण झाला होता. याच वादातून जावयाने सास-याची हत्या करून त्यांचा मृतदेह शेतशिवारातील पुलाखालील पाईपमध्ये दडवून ठेवला. किशोर कंगाले हे घरात दिसून आले नाहीत म्हणून कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार केली. पोलिसांनी तक्रारीनुसार, तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासाचा धागा किशोर कंगाले यांच्या जावयापर्यंत येउन थांबला असता, पोलिसांनी त्याची सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणाचा छडा लावताना पोलिसांनी जावई अमित लांजेवारला नागपुरातून तर त्याचा मित्र योगेश पाठकला रामटेकमधून अटक केली आहे.

### महापालिकेच्या ८७ जागेसाठी

शहरात जवळपास ४५०० हजार कर्मचारी नेमण्यात आले आहेत तर ३ हजार पोलीस कर्मचारी तैनात असणार आहेत.२२ प्रभागासाठी २३१ इमारतीमध्ये ८०५ मतदान केंद्र आहे. जेथे मतदार आपले कर्तव्य पार पाडणार आहे. मनपा निवडणूक रिंगणात एकूण ६६१ उमेदवार आपले नशीब आजमावत असून यामध्ये राजकीय पक्षाच्या अधिकृत उमेदवारांसहा १२० अपक्ष उमेदवार रिंगणात आहे. राजकीय गणित पाहता राष्ट्रवादी काँग्रेसचे ८५, काँग्रेसचे ७४, शिवसेनेचे (शिंदे गट)६३, भाजपाचे ६३, वंचित बहुजन आघाडीचे ४७, बहुजन समाज पक्षाचे ३४, युवा स्वाभिमान पक्षाचे ३६, एमआय एमचे २६, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गटाचे १५ व शिवसेना उबाठासह अपक्ष उमेदवार रिंगणात उतरले आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या नेतृत्वाखाली ४५०० कर्मचारी बंदोबस्त मध्ये तैनात आहे. प्रत्येक मतदार केंद्रावर सरासरी ८०० ते ९०० मतदारांची सोय करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूण मतदारांपैकी महिला आणि तरुण मतदारांची भूमिका निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. विकासाच्या मुद्द्यावर कोण बाजी मारणार हे तर आता निकाल लागल्यावरच स्पष्ट होणार आहे. मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी बुधवारी सकाळी पोलिंग पार्ट्या रवाना झाल्या.

### महादेवखोरी परिसरात कारमध्ये

विशेष म्हणजे, घटनास्थळापासून काही अंतरावर आणखी एक कार आढळून

आली, ज्यामध्ये कॅलेंडर व प्रचार साहित्य सापडले. त्यामुळे ही रोकड मतदारांना लाच देण्यासाठीच आणली होती का? असा संशय अधिक बळावला आहे. निवडणूक काळात अशा प्रकारे रोख रक्कम सापडणे हे आदर्श आचारसंहितेची थेट पायमल्ली असल्याचे बोलले जात आहे. शहरात सर्वत्र प्रचाराचा धुरळा सुरू असताना, बंद दाराआड मतदारांची किंमत ठरवली जात असल्याची चर्चा आहे. 'विकास, विचारधारा आणि कामगिरीच्या नावाने मत मागण्याऐवजी नोटांच्या जोरावर सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू आहे का?' असा संतप्त सवाल आता सामान्य मतदारांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, निवडणूक विभागाकडे यापूर्वी कोणतीही अधिकृत तक्रार नसल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र शहरातील अनेक प्रभागांमध्ये पैशांचे खुलेआम वाटप सुरू असल्याच्या जोरदार चर्चा आहेत. महादेवखोरीतील प्रकार हा केवळ किरकोळ असून, पडद्यामागे आणखी किती 'डील' सुरू आहेत, याबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहेत. महापालिका निवडणूक विभागाच्या एसएसटी पथकाने या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील चौकशी सुरू आहे. पोलिस निरीक्षकांसह सहायक पोलीस आयुक्तांनीही या प्रकरणाची दखल घेत तपासाचा वेग वाढवला आहे. लोकशाहीचा उत्सव म्हणवल्या जाणाऱ्या निवडणुकीत पैशांचा वाटप होऊ लागल्याने, 'मतदान स्वेच्छेने होणार की नोटांच्या जोरावर?' हा प्रश्न आता अमरावतीकरांच्यावतीने विचारला जात आहे.

### नवसारी मतमोजणी केंद्राची आयुक्त

अत्याधुनिक व्यवस्था करण्यात

आली आहे. मतमोजणीदरम्यान निकाल थेट एलईडी स्क्रीनवर प्रदर्शित होणार असून, नागरिक व माध्यम प्रतिनिधींना त्वरित व पारदर्शक माहिती उपलब्ध होणार आहे.

मतपेट्या व ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्रॉंग रूममध्ये बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त व प्रवेश नियंत्रण प्रणालीमुळे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये याची दक्षता घेतली जात आहे. तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी व एजंट यांच्यासाठी स्वतंत्र, सुव्यवस्थित बसण्याची व निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

माध्यम प्रतिनिधींकरिता सुसज्ज मीडिया सेंटर उभारण्यात आले असून, त्याठिकाणी इंटरनेट, वीजपुरवठा, माहिती फलक व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. १५ व १६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतमोजणीदरम्यान पत्रकारांना निकालांची माहिती वेळेवर मिळावी, यासाठी स्वतंत्र समन्वय यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणा, होमगार्ड व सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय वीजपुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, रुग्णवाहिका व वैद्यकीय सुविधा या सर्व बाबींचेही विशेष नियोजन करण्यात आले आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पत्रकारांशी संवाद साधत सांगितले की, मतमोजणीची प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि तत्परतेने पार पडावी यासाठी सर्व व्यवस्थांची काळजी घेतली गेली आहे. गुरुवार, १५ जानेवारी २०२६ आणि दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सातही झोनमध्ये मतमोजणी सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### घरगुती वादात पत्नीचा पतीवर

फ्रेजरपुरा ठाण्यामध्ये जाऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले आणि त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून कार्यवाही सुरू केली आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा ही केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

### व्यास लेआउट येथे घरफोडी

व कपडे इतरत्र फेकलेल्या अवस्थेत दिसून आले होते. बेडरूम असलेल्या लाकडी अलमारीतील पत्नीचे २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ४ ग्रॅम वजनाचे सोन्याची कानातले,८ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र असे एकूण ३६ ग्रॅम सोन्याचे दागिने अंदाजे किंमत दोन लाख ५२ हजार रुपयाची चोरी झाल्याचे लक्षात आले तसेच वरच्या मजल्यावरील मुलीचा लॅपटॉप अंदाजे किंमत २० हजार रुपये, असा एकूण २ लाख ७२ हजार रुपयाचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे दिसून आले. त्यामुळे यासंदर्भात तक्रार फिर्यादीने मोर्शी पोलिसात दिली असल्याने अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे. घटनास्थळी श्वान पथक, फिंगरप्रिंट तज्ञ पोहोचले असून तांत्रिकदृष्ट्या तपास सुरू केला आहे.

### बाथरूममध्ये पडल्याने वृद्धाचा

आवाज दिला तर त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. यामुळे त्यांच्या मुलाने खिडकी मधून पाहिले तर रमेश खंडारे बाथरूम मध्ये बे शुद्ध पडले होते. मुलाने मोठ्या प्रयत्नाने दरवाजा उघडून त्यांना बाहेर काढले

आणि जिल्हा सामान रुग्णालयात दाखल केले. तेथून त्यांना खाजगी रुग्णालयात रेफर करण्यात आले. येथे पण प्रकृती मध्ये सुधारणा न झाल्याने त्यांना सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. जिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.

### चांदूर बाजार नगर परिषदेत प्रहार

करण्यात आली. सत्तेतील पहिल्याच दिवशी खुर्चीवर बसून कारभार सुरू करण्याऐवजी प्रहार प्रमुख बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर स्वच्छता व सामाजिक उपक्रमातून सत्तेचा नवा आदर्श प्रहार जनशक्ती पक्षाने घालून दिला. याअंतर्गत गाडगेबाबा मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, तेथून बेलोरा ऑटो चौक – किसान पुतळा – जयस्तंभ चौक – नेताजी चौक – गांधी चौक असा संपूर्ण शहरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आला. यानंतर मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये चांदूर बाजार शहरातील तरुण, युवा व महिला मंडळींनी उत्स्फूर्त सहभाग घेत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या वेळी सचिन खुळे, हेमंत कोंडे, अबुदादा वानखडे, एजाज भाई, तनवीर ताज, रहमान भाई, हाजी सोहेल, मुजफ्फर हुसेन, जमील आफताब सर, ॲड. आबिद हुसेन, जमील अहमद, गोपाल वानखडे, घनश्याम उसरबरसे, विनोद कोरडे, मनीष नांगलिया यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रहार तालुका प्रमुख प्रदीप बंड, संजय गोमकाळे, प्रहार महिला आघाडी विदर्भ प्रमुख स्टेला मॅडम, जिल्हा पदाधिकारी लीना गुडघे यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. या भव्य, नावीन्यपूर्ण व लोकाभिमुख प्रयोगामुळे चांदूर बाजारच्या जनतेने 'असाच कारभार अपेक्षित होता' अशी भावना व्यक्त करत बच्चू कडू व त्यांच्या संपूर्ण टीमला बहुमत दिल्याचे समाधान व विश्वास व्यक्त केला आहे.

### खानापूर येथे इसमाची

करून मृतदेह रात्रीच मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता. बुधवारी सकाळी शवविच्छेदन झाल्यानंतर मृतक दिनेश धुर्वे च्या मृतदेहावर शोकाकुल वातावरणात खानापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतकाच्या मागे पत्नी, लहान मुलगा आई वडील असा शोकाकुल परिवार आहे. मोर्शी पोलिसांनी या प्रकरणी मर्ग दाखल केला असून अधिक तपास मोर्शी पोलीस करीत आहे.

### तृतीयपंथी मतदारांची बैठक,

महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक ती मदत देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी उपस्थित तृतीयपंथी मतदारांनी प्रशासनाच्या उपक्रमाचे स्वागत करत, 'माझे मत, माझा अधिकार' या भावनेतून आगामी महानगरपालिका निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याचे आव्हान स्वीकारले. तसेच समाजातील इतर तृतीयपंथी मतदारांनाही मतदानासाठी प्रेरित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीला स्वीप विभाग प्रमुख तथा शिक्षणाधिकारी महानगरपालिका अमरावती डॉ. प्रकाश मेश्राम, स्वीप सदस्य उज्वल जाधव तसेच महामंडलेश्वर गुड्डी ताई, तृतीयपंथी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमामुळे तृतीयपंथी मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

### कीटकनाशक प्राशन करून

मुलाने दिलेल्या माहितीनुसार, नंदकिशोर गौरीहार यांच्याकडे स्वतःची शेती होती. यावर्षी त्यांनी शेतात सोयाबीन व तूर पिकाची पेरणी केली होती. मात्र अतिवृष्टीमुळे दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. उत्पादन न आल्याने ते मानसिक तणावात होते. पेरणीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, या चिंतेत ते दिवसेंदिवस अंतर्मुख झाले होते व कोणाशीही फारसे बोलत नव्हते. कर्जबाजारीपणाच्या चिंतेतूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत आहे. या प्रकरणी मुलाच्या जबाबावरून वलगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १५ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

## सीईओ अर्पित चौहान यांच्याकडून तीन गावांची पाहणी?

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत मंगरूळपीर तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना भेट देऊन कामांची पाहणी केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत वाशिम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायती सहभागी झालेल्या आहेत.**



सीईओ अर्पित चव्हाण यांनी गावांना भेटी देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्याचा धडाका लावला आहे. गावात कोणती कामे झाली आणि कोणती बाकी आहेत याची नोंद घेऊन संबंधितांना सूचना देण्यात येत आहेत. या अभियानात लोकसहभाग वाढविण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश सीईओ देत आहेत.

मंगळवारी (दि.१३) त्यांनी मंगरूळपीर तालुक्यातील पारवा जनुना बु. आणि कोठारी या गावांना भेट दिल्या. येथील सरपंच ग्रामपंचायत अधिकारी आणि लोकांशी संवाद साधला. परवा येथील कार्यक्रमात बोलतांना ते म्हणाले 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सर्वांनी एकत्र येऊन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावे.' यावेळी पारवा ग्रामपंचायतचे सरपंच गोपाल लुंगे, उपसरपंच सरला वाळके, सचिव एस एम काळे आणि मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

**शाळा अंगणवाडी यांना भेटी :** मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान यांनी तीनही गावातील शाळा आणि अंगणवाडी यांना प्रामुख्याने भेट दिली. शाळेतील शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. शाळेतील सुविधांची पाहणी केली. पारवा, जनुना बु. आणि कोठारी या गावातील शाळेला त्यांनी भेट दिली. कोठारी या गावातील पीएमश्री शाळेतील उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक तसेच सरपंचांनी माहिती दिली.

**बचत गटातील महिलांशी संवाद:** जनुना बु. येथील बचत गटातील महिलांनी सुरू केलेल्या उद्योग व्यवसायाची सीईओ अर्पित चौहान यांनी पाहणी केली. उमेद अभिनांतर्गत त्यांनी घरीच हा व्यवसाय सुरु केला होता. सीईओ यांनी त्यांच्या घरी भेट दिल्यामुळे या महिलांना प्रेरणा मिळाली असल्याचे त्यांनी सागितले. येथील महिलांनी गिरणी व्यवसाय, गोड बर्फी तसेच कुरड्या, पापड, खारोड्या तयार करून विकण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. आजूबाजूच्या परिसरात तसेच काही जिल्ह्यातही त्यांचे प्रॉडक्ट्स विकल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच रूपाली नितेश खडसे, उपसरपंच सुनील नवघरे, ग्रामपंचायत अधिकारी अमोल जाधव तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर व ग्रामपंचायत पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# शास्त्रज्ञांची प्रत्यक्ष भेट व तांत्रिक पाहणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■



मालेगाव तालुक्यालगत असलेल्या चिवरा (ता. मालेगाव) येथील प्रगतशील शेतकरी श्री. रामप्रसाद शिरसागर यांनी मागील एक वर्षापासून नाविन्यपूर्ण औषधी वनस्पती आळीव या पिकाची यशस्वी लागवड केली आहे. सदर पिकाची कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉक्टर आर एल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डिगंबर इंगोले यांनी दि. ८ जानेवारी रोजी प्रत्यक्ष शेतभेट देऊन तांत्रिक पाहणी व शेतकऱ्यांशी सखोल चर्चा केली.

या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेतून असे निदर्शनास आले की आळीव हे पीक गहू, हरभरा व तूर यांसारख्या पारंपरिक रब्बी पिकांसाठी एक उत्तम, शाश्वत व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्यायी पीक ठरत आहे. विशेष म्हणजे या पिकास केवळ एक ते दोन पाण्याच्या पाळ्यांची आवश्यकता असून अत्यंत कमी पाण्यात वाढणारे पीक असल्यामुळे ते पाण्याच्या मर्यादित उपलब्धतेच्या परिस्थितीतही यशस्वीरीत्या घेता येते.

आळीव हे पीक रब्बी हंगामातील असून कमी खर्चात लागवड होणारे, तसेच चोपण व मध्यम प्रतीच्या जमिनीत अधिक अनुकूल असल्याचे शास्त्रीय निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. वाशिम जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव व वाशिम या तीन तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चोपण स्वरूपाच्या जमिनी उपलब्ध असून, या जमिनीत आळीव पिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर करता येण्याची दाट शक्यता आहे. या पिकासाठी एकरी बियाण्याचे प्रमाण २ ते ३ किलो इतके असून, रासायनिक खतांचा वापरही अत्यंत मर्यादित असून केवळ २५ ते ३० किलो प्रति एकर इतक्या अल्प प्रमाणात खतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या कमी येतो. पिकाची काढणी हार्वेस्टरद्वारे किंवा पारंपरिक हात कापणीद्वारे सहज करता येते. महत्त्वाची बाब म्हणजे आळीव पिकास कोणत्याही प्रकारच्या वन्यप्राण्यांचा त्रास होत नाही, तसेच आतापर्यंत कोणत्याही प्रमुख कीड व रोगांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. त्यामुळे हे पीक पर्यावरणपूरक व जोखमरहित ठरत आहे. उत्पादनाच्या दृष्टीने पाहता, आळीव पिकाचे प्रति एकर उत्पादन ३ ते ५ क्विंटल इतके मिळाले आहे. सदर उत्पादनास कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशिम येथे ७,३०० ते ?१०,६०० प्रति क्विंटल इतका समाधानकारक बाजारभाव प्राप्त झाला. यावरून या पिकास वाशिम जिल्ह्यात स्थिर व शाश्वत बाजारपेठ उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत शेतकऱ्यांनी असे नमूद केले की, आळीव हे पीक कमी खर्चिक, अधिक नफा देणारे, पाण्याच्या दृष्टीने किफायतशीर तसेच कीड-रोगमुक्त असल्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर स्वीकारले जाण्याची असलेले पीक आहे. जर पिकाचा कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठ यांच्या माध्यमातून शास्त्रीय पद्धतीने प्रचार व प्रसार करण्यात आला.

# दुचाकी चोरी प्रकरणी आरोपीला अटक



■ प्रतिनिधी | मानोरा ■

## डी बी पथकाची कारवाई

शहरातील मिश्रा मोबाईल गॅलरी येथून दुचाकी चोरी झाल्याची घटना रविवार दि.११ जानेवारी रोजी घडली होती. सदर चोरीचा प्रकरणी सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत मानोरा पोलिसांतील डी बी पथकाने वेगाने सूत्रे हलवित दुचाकी चोराला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार नुसार मानोरा शहरातील मिश्रा मोबाईल गॅलरी येथून दुकान मालक अरविंदकुमार विद्यासागर मिश्रा यांची मोटर सायकल क्रमांक एम एच ३७ वाय ४७६४ एच एफ डिलक्स हिरो कंपनी किंमत ४५ हजार रुपयांची मोटर सायकल चोरी गेल्याची तक्रार १२ जानेवारी २०२६ रोजी दिली होती. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३०३ ( ९ ) प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा तपास मानोरा डीबीकडे देण्यात आला होता, त्यानुसार डीबी पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावरून आरोपी बुऱ्हान शहा भुरु शहा ( वय ४० वर्षे ) दारव्हा वेश कारंजा याचा शोध घेऊन राहत्या घरातून दि. १४ जानेवारी रोजी दुचाकी व आरोपीला ताब्यात घेतले व चोरी प्रकरनातील दुचाकी कारंजा येथून जप्त केली. सदर प्रकरनी पोलीस स्टेशनला आणून रीतसर आरोपीला पोलिसांनी अटक केली.

सदरील कारवाई पोलीस अधिक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कारंजा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी, ठाणेदार नैना पोहेकर मॅडम, सहाय्यक पोलीस निरीक्षक रामबाबू सरोदे, पोहवा मदन पुणेवार, पोलीस शिपाई फिरोज खान, गोकुळ पाडूने, रोहन तायडे यांनी केली.

# साई मंदिरात महाप्रसादास हजारो भाविकांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | अनसिंग ■

येथील श्री साई संस्थान चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने साईमंदिरात ११ जानेवारी रोजी श्रीमद भागवत सप्ताहानिमित्त आयोजित महाप्रसादाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला. आळंदी येथील ह.भ.प.वात्सल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन झाले.त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसादाला अनसिंग पंचक्रोशीतील अनसिंग, खडसिंग, देगांव, एकांबा, सापळी, जवळा, उमरा कापसे, उमरा मोठा, शेलु बुद्रुक, शेलु खुर्द, उमराळा, सोंडा, पिंपळगाव, ब्रम्हा, वाई, वारला, ढिल्ली, घोटा, सावळी, पन्हाळा, निंबाळवाडी, टणका, जयपूर, चिंचखेडा, नांदगाव, शिवणी व परिसरातील हजारो भाविकांनी हजेरी लावली.

# संत नरहरी सोनार पुण्यतिथी उत्सव समिती कार्यकरिणी जाहीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



आगामी संत नरहरी सोनार पुण्यतिथी निमित्ताने उत्सव समिती कार्यकरिणी दि १३ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आली त्यावेळी विविध बाबतीत नियोजन करण्यात येऊन समिती स्थापना करण्यात आली त्यात अध्यक्ष पदी कार्तिक भांडेकर सचिव आदित्य अंजणकर यांची ईश्वर चिठ्ठी ने निवड करण्यात आली.

संत नरहरी सोनार पुण्यतिथी ४ फेब्रुवारी रोजी असून दरवर्षी प्रमाणे सर्व समाज बांधव सामूहिक रित्या करत असतात त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले त्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जेष्ठ मार्गदर्शक सुभाष भांडेकर गणेश अर्धापुरकर विनोद कल्याणकर ट्रस्ट अध्यक्ष महेश अंजनकर समाज अध्यक्ष ज्ञानेश्वर वाढणकर हे होते कार्यक्रमाचे संचलन अमोल कल्याणकर यांनी केले. पुण्यतिथी च्या अनुषंगाने समाज मेळावा ओंकार संगीत संध्या कीर्तन नगरसेवक सत्कार महाप्रसाद होणार आहे. त्याचे तसेच वर्षभर होणारे सामाजिक धार्मिक कार्यक्रम च्या दृष्टीने समिती जाहीर करण्यात आली कार्तिक भांडेकर (अध्यक्ष), ऋषीकेश बानाईतकर (उपाध्यक्ष),निशांत भांडेकर (उपाध्यक्ष),आदित्य अंजनकर (सचिव), ओम वर्मा (सहसचिव), तेजेस कल्याणकर (कोषाध्यक्ष), शुभम अर्धापुरकर (सह कोषाध्यक्ष),आकाश बानाईतकर (संघटक),सुरज वर्मा (संघटक), आशिष वर्मा (संघटक),रुपेश बानाईतकर (संघटक), अभिजीत पाटील (संघटक), जय भांडेकर (प्रसिद्धी प्रमुख),राजेश इवरकर (संपर्क प्रमुख), मयूर भांडेकर (संपर्कप्रमुख), संस्कार कल्याणकर (संपर्क प्रमुख) अनिकेत पडोळे आयुष वाढणकर ( सदस्य) यांची एकमताने निवड करण्यात आली. आभार प्रदर्शन विजय अर्धपुरकर यांनी केले.

# जिल्हा परिषद शाळेला मदतीचा ओघ सुरू

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील पीएम श्री वरिष्ठ प्राथमिक शाळेला मदतीसाठी अनेक तरुण व माजी विद्यार्थी वेगवेगळ्या प्रकारे मदतीसाठी पुढे येत आहेत.

माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर आघाव यांची मुलगी संस्कृती ज्ञानेश्वर आघाव हिचा चौथ्या वाढदिवस शाळेत साजरा करून शाळेला शंभर स्टील प्लेट व शंभर चम्मच मुलांसाठी भेट दिले.शाळेत वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवून याही पुढे अशीच मदत करणार असल्याचे ज्ञानेश्वर आघाव यांनी सांगितले आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमाला ज्ञानेश्वर आघाव, भाग्यश्री आघाव, शोभा आघाव, गोपाल दौंड, शारदा दौंड,सागर अहिर, पुष्पम शिंदे, सुभाष बळी,शाळा समिती सदस्य धीरज कान्हेड,व मुख्याध्यापक अनुपमा देशमुख, यांच्या सह सर्व शिक्षक उपस्थित होते.

# संस्कारातून व सुदृढ आरोग्यातून सक्षम पिढी घडते - उषा मापारी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून ते सुदृढ शरीर, सशक्त मन आणि सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडवणारे असले पाहिजे. त्यामुळेच या जयंतीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले आहे. निरोगी विद्यार्थीच उद्याचा सक्षम नागरिक घडवू शकतो.असे प्रतिपादन माईंड्स आय इंग्लिश स्कूलच्या संचालिका उषा माघारी यांनी केले.

माईंड्स आय इंग्लिश स्कूल, वाशिम येथे राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अत्यंत भावपूर्ण आणि सामाजिक जाणीव जागवणारा उपक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी त्या बोलत होत्या. जिजाऊंच्या मातृत्व, त्याग, शौर्य आणि संस्कारमूल्यांना अभिवादन करत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, शिस्त आणि सुदृढ जीवनशैलीचे महत्व रुजवण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे वजन, उंची, रक्तदाब, दृष्टी तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य परीक्षण करून त्यांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. निरोगी शरीरातच सशक्त मन घडते, हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दिपाली हजारे, अरुणा जुणघरे, सुषमा राऊत, अर्चना भुसारी, माया मापारी, अश्विनी रावत, ज्ञानेश्वरी इंगळे, रजनी ठाकरे, आरती राठोड, कांचन राठोड, वर्षा लुले व छाया नालेगावकर आदींची उल्लेखनीय उपस्थिती व सहकार्य लाभले.

# बुद्ध विहारात राजमाता जिजाऊ जयंती साजरी



**मानोरा :** येथील तक्षशिला बुद्ध विहारात दि. १२ जानेवारी रोजी स्वराज्य क्रांतीच्या निर्मात्या राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली आहे .

यावेळी सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध राष्ट्रमाता माँ जिजाऊ, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवर कार्यक्रमाचे अध्यक्ष राजू मनवर सरपंच, प्रमुख अतिथी जगन इंगोले, आनंद खुळे, गोवर्धन मनवर, यांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले.

त्यानंतर मान्यवरांनी तसेच काही लहान बालकांनी माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी बहुसंख्य उपासक उपासिका व लहान बालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिलिंद उरकडे यांनी केले सूत्रसंचालन छगन मनवर यांनी केले तर आभार सुमेध सोनोने यांनी मानले.

# मराठी पत्रकार पत्रकार संघाची बैठक उत्साहात

■ प्रतिनिधी | मानोरा ■



तालुक्यातील कारपा येथे नुकतीच मराठी तालुका पत्रकार संघाची सहविचार बैठक व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कारपा येथील पत्रकार आनंद खुळे व इंद्रगोल राठोड यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात विविध सामाजिक विषयांवर चर्चा करण्यात आली.तसेच माँ जिजाऊंना जयंतीचे औचित्य साधून अभिवादन करण्यात आले, यावेळी गुरुदेव सेवा संघाचे वतीने संघटनेचे पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता माॅ जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यावेळी मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्नित तालुका पत्रकार संघाच्या मान्यवरांची उपस्थिती होती . आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष प्रवीण ठाकरे होते, तर प्रमुख उपस्थितीमध्ये ज्येष्ठ पत्रकार जगदीश राठोड, देविदास पारसकर आणि सुदाम तायडे यांची उपस्थिती लाभली होती. यावेळी जगदीश राठोड,बळवंत भगत,राजेंद्र दीक्षित ,सुदाम तायडे व तालुका अध्यक्ष प्रविण ठाकरे यांनी पत्रकारितेतील मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी गुरुदेव सेवा संघाचे तालुका कार्यवाहक अरुण दादा भालदान यांनी तालुका अध्यक्ष प्रवीण ठाकरे आणि ज्येष्ठ पत्रकार जगदीश राठोड यांचा शाल , श्रीफळ व 'ग्रामगीता' देऊन विशेष सत्कार केला. या कार्यक्रमाचे संचालन प्रवीण आडुळे यांनी केले तर आभार आनंद खुळे यांनी मानलेत. सभेच्या समारोपानंतर उपस्थित पत्रकारांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. उपस्थित पत्रकार व मान्यवर या प्रसंगी देविदास पारसकर, बळवंत भगत, सुदाम तायडे, बंडू राठोड, संतोष कांबळे, पंडित राठोड, राजेंद्र दीक्षित, मनोज आडे, अफसर शाह, प्रमोद आडे, अशोक रत्नपारखी यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलिसांची मांजाविरोधी मोहीम



**मालेगाव :** मकर संक्रांती सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात पतंग उडवताना वापरल्या जाणाऱ्या धोकादायक मांजामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी मालेगाव पोलिस स्टेशनच्या वतीने विशेष जनजागृती व कारवाई मोहीम राबवण्यात आली.

आज शहरातील विविध भागांमध्ये मांजा विक्री करणाऱ्या दुकानदारांना भेट देत, मांजा विक्री न करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. या मोहिमेचे नेतृत्व मालेगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार राजेश खेरडे यांनी केले. यावेळी पोलिस किशोर चिंचोळकर, शिवाजी काळे तसेच जितू पाटील, रवि खडसे आदी पोलिस कर्मचारी उपस्थित होते. धोकादायक चायनीज मांजा व काचलेपित मांजामुळे नागरिक, दुचाकीस्वार, पक्षी व जनावरांना गंभीर इजा होण्याची शक्यता असल्याने त्याच्या विक्री व वापरावर कडक निर्बंध आहेत.

# शिव चौकातील गर्दी कधी बंद होणार?

## 'नगरपंचायत अपडेट' व्हॉट्सॲप ग्रुपवरील पोस्टने उघड केली वास्तवस्थिती; रस्त्यावर हातगाडे, गाडया असतात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील मध्यवर्ती शिव चौकातील मंगळवारी होणारी गर्दी आता टोकाला पोहोचली आहे. सर्वसामान्य नागरिकांना जाण्या-येण्या पुरताही मोकळा रस्ता उरत नाही, ही वस्तुस्थिती पुन्हा एकदा 'नगरपंचायत अपडेट' या सामाजिक कार्यकर्त्यांच्या व्हॉट्स?प ग्रुपवरील एका पोस्टमुळे चव्हाट्यावर आली.



शिव चौकातील पार्किंगच्या बेशिस्तीबाबत टाकलेल्या त्या पोस्टनंतर ग्रुपवर प्रचंड चर्चा झाली. अनेक नागरिकांनी अनुभव मांडत स्पष्ट केले की, पार्किंगची कोणतीही व्यवस्था नसताना बाजारासाठी आलेले लोक आपली वाहने थेट रस्त्यावर किंवा रस्त्याच्या कडेला बेधडक उभी करतात. व्यापारी लोक रस्त्यावर विक्री करतात कायदा जणू काही 'घरचा नियम' असल्यासारखा सर्रास मोडला जातो. परिणामी वाहतूक कोंडी अपघाताचा धोका आणि पादचाऱ्यांची गैरसोय वाढत आहे.

याच गर्दीचा फायदा घेत मोबाईल चोरीच्या घटना वाढत आहेत तसेच महिलांना व मुलींना धक्के लागून होणारी कुचंबणा ही गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. हा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता न राहता सार्वजनिक सुरक्षिततेचा बनला आहे असेही ग्रुपवरील चर्चेतून अधोरेखित झाले.नगरपंचायत अपडेट ग्रुपची विशेष दखल घ्यावी लागेल. शहरातील समस्या केवळ टीका करून न थांबता जबाबदारीने मुद्दे मांडणे नागरिकांचे अनुभव एकत्र आणणे आणि प्रशासनाचे लक्ष वेधणे—ही सामाजिक जाणीव या ग्रुपमधून ठळकपणे दिसून येते. अनेकांनी उपायही सुचवले मंगळवारी शिव चौक परिसरात चारचाकी वाहनांवर तात्पुरती बंदी रस्त्यावरची दुकाने त्वरित दुसरीकडे हलवणे शिस्तबद्ध पार्किंगची पर्यायी व्यवस्था आणि पादचाऱ्यांसाठी मोकळा मार्ग तरीही नगरपंचायत व पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे शहरात चर्चा आहे की प्रशासन जाणून-बुजून तर याकडे दुर्लक्ष करत नाही ना? उद्या पाहू'ची भूमिका सोडून तात्काळ कठोर कारवाई हवी, अशी स्पष्ट मागणी नागरिकांनी केली आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ५१ ■ गुरुवार, १५ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## जिल्हा नियोजनचा संपूर्ण निधी मार्चअखेर खर्च करा

### -पालकमंत्री डॉ. भोयर यांचे स्पष्ट निर्देश; २०२६-२७ च्या २८१ कोटींच्या आराखड्यास मंजुरी



**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा वार्षिक योजनेतून विविध विकास कामांसाठी मंजूर करण्यात आलेला निधी खर्च करण्यासाठी आता काहीच महिने शिल्लक आहेत. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपापल्या स्तरावर मंजूर कामांचा व निधी खर्चाचा सखोल आढावा घ्यावा आणि मार्च अखेरपर्यंत जिल्हा नियोजनचा संपूर्ण निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी, असे ठाम निर्देश पालकमंत्री यांनी दिले.

नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अमर काळे, दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, नियोजन विभागाचे उपायुक्त अनिल गोतमारे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजूरवार यांच्यासह सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याला सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेंतर्गत ४१२ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. मात्र डिसेंबरअखेर झालेला खर्च अपेक्षेप्रमाणे नाही. निधीचे वितरण विभागांना करण्यात आले असले तरी उर्वरित कालावधीत खर्चाची गती वाढविणे अत्यावश्यक आहे. निधी खर्च न झाल्यास विकासकामांवर परिणाम होतो, याची जाणीव ठेवून सर्व विभागांनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे निदर्शनास येत आहे.**

अशा प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी पंचनामे अचूक व काळजीपूर्वक करावेत, असे निर्देश देण्यात आले. यासोबतच मागील वर्षी बोगस बियाण्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अशा प्रकारांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे कृषी विभागाने अधिक सतर्क राहून कारवाई करावी, असेही पालकमंत्री म्हणाले.

अलीकडेच सामान्य रुग्णालयातील एका भागाला लागलेल्या आगीच्या घटनेचा संदर्भ देत, या प्रकरणासाठी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा होत असल्याने, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, भारतीय संचार निगम तसेच इतर महत्त्वाच्या विभागांच्या अधिकाऱ्यांनाही आवश्यकतेनुसार बैठकीस बोलाविण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.

जलजीवन मिशन अंतर्गत अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करावीत. पूर्ण झालेल्या योजनांमधून १५ दिवसांत पाणीपुरवठा सुरू करावा. उन्हाळ्यातील पाणीटंचाई लक्षात घेता जानेवारीअखेर टंचाई आराखडा तयार करून फेब्रुवारीत मंजुरी घ्यावी व आराखड्यानुसार कामे मार्चपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले. तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेशही पालकमंत्र्यांनी दिले.

बैठकीत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी २८१ कोटी ६६ लाख रुपयांच्या जिल्हा वार्षिक आराखड्यास मंजुरी देण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २१९ कोटी ६८ लाख, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना १७ कोटी ९८ लाख रुपयांचा समावेश आहे. लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या विविध विषयांवर संबंधित विभागांनी कालमर्यादेत कार्यवाही करून माहिती द्यावी, अशा सूचना देत पालकमंत्र्यांनी बैठक संपविली.

## ७७ व्या वर्षीही सत्तेचा मोह कायम

## हिंगणघाट नगरपालिकेत 'बाबूजी पॅटर्न'ची एन्ट्री

**वर्धा । रवींद्र लाखे :** हिंगणघाट नगरपालिकेच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळाल्याची चर्चा सुरू असतानाच, सत्तेच्या पडद्यामागून पुन्हा एकदा जुन्याच 'हुकमी एक्क्याने' मैदानात उडी घेतल्याने शहराच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.



७७ वर्षांचे वय झाले, तरी सत्तेचा मोह काही केल्या सुटत नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, हिंगणघाटचे बाबूजी म्हणून ओळखले जाणारे सुधीरबाबू उर्फ बाबूजी कोठारी यांनी स्वीकृत नगरसेवक म्हणून थेट नगरपालिकेच्या सभागृहात एन्ट्री घेतली आहे.

नगरपालिकेत नवे चेहरे, नवी दिशा आणि तरुण नेतृत्वाची अपेक्षा व्यक्त होत असतानाच, सत्तेचा दोर पुन्हा एकदा अनुभवी पण वादग्रस्त हातात गेल्याची भावना जनतेत उमटू लागली आहे. आर्थिक ताकद, संस्थात्मक जाळे आणि दबाव यंत्रणेचा अचूक वापर करत बाबूजींनी ही जागा आपल्या नावे करून घेतल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

सहकार महर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, मुंबई कृषी बाजार समितीचे संचालक, तसेच वणा नागरी बँकेचे संस्थापक अध्यक्ष अशी प्रभावी ओळख असलेल्या बाबूजींनी हिंगणघाटच्या राजकारणावर दीर्घकाळ वर्चस्व राखले आहे. माजी नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी सत्तेची चव चाखलेली आहे. तरीही आता थांबावे हा विचार बाजूला ठेवत, त्यांनी पुन्हा एकदा थेट सत्ताकेंद्र गाठले. यामुळे राजकीय वर्तुळात तीव्र नाराजी पसरली आहे. स्वीकृत नगरसेवकपद हे नव्या, निष्ठावान आणि संघर्षशील कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी असते, अशी अपेक्षा होती. मात्र ती संधी पुन्हा एकदा अनुभवी नेत्यालाच मिळाल्याने, इथे संघटना महत्त्वाची की व्यक्ती, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कार्यकर्त्यांमध्ये कुजबुज सुरू असून, अनेकांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. अनुभवाच्या नावाखाली सत्तेची मक्तेदारी किती काळ चालणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर दुसरीकडे बाबूजी समर्थक मात्र अनुभवाशिवाय कारभार चालत नाही. असा युक्तिवाद करत आहेत. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, ७७ व्या वर्षीही सत्तेचा मोह सुटत नसेल, तर ते नेतृत्वाचे यश मानायचे की राजकीय स्वार्थाचे लक्षण, हा प्रश्न हिंगणघाटच्या जनतेसमोर उभा ठाकला आहे.

सत्ता सोडून मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारण्याऐवजी पुन्हा एकदा सत्तेच्या खुर्चीवर बसण्याचा आटापिटा केल्याबद्दल बाबूजींचा 'सत्कार' झाला, तर तो उपरोधिक ठरणार नाही, अशी बोचरी प्रतिक्रिया आता चहाच्या टपऱ्यांपासून नगरपालिकेच्या दालनांपर्यंत ऐकू येत आहे.

## वाघांच्या दहशतीनंतर बिबट्याचा हल्ला; गिरड हादरले

### -६ बकऱ्यांच्या पिल्यांचा फडशा; शेतकऱ्यांचे ३० हजारांचे नुकसान

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील गिरड परिसरात गेल्या बारा महिन्यांपासून पाच वाघांनी दहशत माजवली असून अनेक जनावरांवर हल्ले झाले आहेत. या भीतीच्या वातावरणात आता बिबट्यानेही शिरकाव केल्याने शेतकरी अधिकच भयभीत झाले आहेत. मंगळवारी पहाटे गिरड येथील शेतकरी अनिल गोरकर यांच्या शेतातील बड्यात बिबट्याने घुसून एकामागून एक ६ बकऱ्यांच्या पिल्यांचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली.

अनिल गोरकर हे मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजता शेतात गेले असता बड्यात रक्ताचे डाग व मृत बकऱ्यांची पिल्ले दिसून आली. हा थरारक प्रकार पाहून त्यांनी तातडीने वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच निलेश गावंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी, यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठविले. वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पंचनामा केला.या हल्ल्यात शेतकऱ्यांचे सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. वाघांच्या सततच्या वावरामुळे आधीच शेती व जनावरे धोक्यात असताना आता बिबट्याच्या हल्ल्यामुळे रात्री शेतात जाणेही धोक्याचे बनले आहे.

बॅंक दरोडा प्रकरण

## चारचाकीने आले, तिजोरी फोडली अन् फरार; राज्याबाहेरील टोळीचा संशय

### -पोलिसांच्या ८ चमू मैदानात; सीमारेषांवर नाकेबंदी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्याच्या शांततेला हादरा देणारी थरारक बँक लूट सुकळी (बाई) येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत उघडकीस आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी हायड्रॉलिक कटरने लोखंडी गज कापले, तर तीन स्तरांची तिजोरी गॅस कटरने फोडून तब्बल २३.११ लाखांची रोकड लंपास केली. अत्याधुनिक साधनांचा वापर, अचूक वेळेचे नियोजन आणि जलद पलायन पाहता ही सराईत, व्यावसायिक टोळी असल्याचा ठाम संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.




मंगळवारी दि. १३ जानेवारी रोजी सकाळी बँक उघडताच चोरीचा प्रकार उघडकीस आला. क्षणातच परिसरात खळबळ माजली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तुटलेले गज, कापलेली तिजोरी, विखुरलेली कागदपत्रे आणि परिसरातील हालचालींची सखोल पाहणी करण्यात आली. चोरट्यांनी रेकी करूनच हा डाव साधल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट होत आहे. पोलिस तपासात चोरटे चारचाकी वाहनाने घटनास्थळी आल्याचे निष्पन्न झाले आहे. लूट आटोपताच त्याच वाहनाने ते पसार झाले. सीसीटीव्ही फुटेज, टोल नाक्यांवरील नोंदी आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली आहेत. चोरीची पद्धत आणि वापरलेली साधने पाहता राज्याबाहेरील टोळी सक्रिय असल्याचा अंदाज बळावला आहे.

या प्रकरणात सावंगी पोलिसांच्या सहा आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन अशा एकूण आठ विशेष चमू विविध दिशांना रवाना करण्यात आल्या आहेत. सीमावर्ती भागांवर नाकेबंदी वाढविण्यात आली असून, संशयितांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. आधीच्या गुन्ह्यांशी साधर्म्य, वापरलेली साधनसामग्री आणि गुन्हेगारी पॅटर्नचा क्रॉस-चेक सुरू आहे. दरम्यान, या घटनेने बँक सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. लवकरच आरोपींना जेरबंद करू, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## खड्ड्यांनी हैराण केलेला रस्ता अखेर दुरुस्त

### -खा.काळेंच्या पत्र-फोनची तात्काळ दखल; कवडघाटजवळील रस्त्याला दिलासा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा-हिंगणघाट राष्ट्रीय महामार्गावरील कवडघाटजवळील रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली होती. अवघ्या अर्धा किलोमीटरच्या या पट्ट्यात मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना अक्षरशः खड्ड्यांतून प्रवास करावा लागत होता. काही ठिकाणी तब्बल १ ते १ फूट खोल खड्डे पडल्याने अपघाताचा धोका वाढला होता. संपूर्ण वर्धा-हिंगणघाट प्रवास सुरळीत असतानाही हाच रस्ता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत होता.



ही बाब खासदार अमर काळे यांच्या लक्षात त्यांच्या दौऱ्यादरम्यान आली. त्यांनी स्वतः या रस्त्यावरून प्रवास करत वाहनधारकांचा त्रास प्रत्यक्ष अनुभवला. त्यानंतर विलंब न करता त्यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाला पत्र दिले तसेच दूरध्वनीवरून तात्काळ सूचना देत रस्ता दुरुस्तीचे निर्देश दिले.खासदारांच्या पत्र व फोनची तातडीने दखल घेत राष्ट्रीय महामार्ग विभागाने युद्धपातळीवर काम हाती घेतले. अखेर दि. १३ जानेवारी २०२६ रोजी कवडघाटजवळील खराब रस्त्याची दुरुस्ती पूर्ण झाल्याची माहिती विभागाचे अभियंता वानखेडे यांनी खासदार कार्यालयाला दिली. या दुरुस्तीमुळे वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नागरिकांच्या समस्यांकडे तत्परतेने लक्ष देत पाठपुरावा केल्याबद्दल खासदार अमर काळे यांच्याप्रती सर्वत्र आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## ७/१२ वर सौदा : शेतकऱ्याच्या कागदावर दलाली

### -३ हजारांची लाच घेताना तलाठी रंगेहात पकडला

**वर्धा । जनमाध्यम :** महसूल खात्यातील लाचखोरीचा सडलेला किडा पुन्हा एकदा उघडा पडला आहे. शेतकऱ्याच्या सात-बाऱ्यावर सहीसाठी थेट पैशांची मागणी करणारा तलाठी ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडला गेल्याने वर्धा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. काम नसेल तर पैसे नाहीत, पैसे नाहीत तर काम नाही. असा खुलेआम बाजार मांडणाऱ्या तलाठ्याचा काळा कारभार अखेर चव्हाट्यावर आला आहे.

कारंजा तालुक्यातील ग्रामपंचायत काजळी येथे कार्यरत तलाठी ललितकुमार रामकृष्णाजी जोगे याने शेतकऱ्याच्या कागदावर थेट दलाली सुरू केली होती. डोंगरगाव शेतशिवारातील शेत क्रमांक ५९/१ मधील २ हेक्टर ४९ आर क्षेत्राच्या सन २०२४-२५ च्या पेरापत्रक नोंदी सात-बाऱ्यावर चढविण्यासाठी ६५ वर्षीय शेतकऱ्याकडे निर्लज्जपणे ३ हजार रुपयांची लाच मागितली.

शेतकऱ्याच्या मेहनतीच्या जमिनीवर सरकारी बाबूंचा हा उघड उघड माज पाहून अखेर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गाठला. एसीबीनेही वेळ न दवडता सापळा रचला. दोन पंचांच्या उपस्थितीत झालेल्या पडताळणीत लाच मागणी स्पष्ट होताच सापळा कारवाई करण्यात आली आणि तलाठी ३ हजार रुपये स्वीकारताच जाळ्यात अडकला.

## इंझापूर कचरा डेपोत आगीचा भडका

### -कचऱ्याचे ढिगारे जळाले; ४ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील प्रत्येक घर व व्यावसायिक प्रतिष्ठानांतून दररोज संकलित होणारा कचरा साठविण्यात येणाऱ्या इंझापूर येथील कचरा डेपोत मंगळवारी दि.१३ जानेवारी रोजी रात्री उशीरा भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने कचऱ्याला आग लावल्याचा संशय असून, काही मिनिटांतच आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी व्यापला. घटनेची माहिती मिळताच सेलू नगरपंचायत व वर्धा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे जवान अग्निशमन बंबासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. कचऱ्याचे ढिगारे मोठ्या प्रमाणात आणि पसरलेले असल्याने आग आटोक्यात आणणे कठीण ठरत होते. मात्र अग्निशमन दलाने सातत्याने पाण्याचा मारा करून सुमारे चार तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर पहाटे आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत मोठ्या प्रमाणात कचरा जळून खाक झाला.


१४.१.२०२६ — जाहिरात क्रं १५/२०२५-२६

## नगर परिषद वर्धा (कर विभाग)

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना या द्वारे सूचित करण्यात येते कि, खालील प्रमाणे मालमत्ता धारकांनी त्यांची मालमत्ता हस्तांतरण करण्याबाबत आवश्यक कागदपत्रासह प्रकरण या कार्यालयात सादर केलेले आहे.

| अ. क्र. | वार्ड.न. | न.प. अभिलेखात दर्ज असलेले मालमत्ता धारकाचे नाव | हस्तांतरण व्यवहार | मालमत्ता हस्तांतरित होणा-या मालमत्ताधारकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ०२-६७० | देवराव लहानुजी धोंगडे | वारस | प्रतिभा घुसे व संदीप देवराव धोंगडे |
| २ | ३०-२०७ | मंदा जयप्रकाश भिसे इतर ४ प्लाट न.५० | विक्रीपत्र | अविनाश मुंजेवार |
| ३ | १४-१६१ | भाऊरावजी चौधरी | वारस | दिशा सुहास चौधरी व इतर २ |
| ४ | ०५ | महरूनिस मुगल बेग' | विक्रीपत्र | शमशेर खा पठाण |
| ५ | २३-१९९ | थावरदास दयामल भाटीया | बक्षीस पत्र | जगदिश दयामल भाटीया |
| ६ | १६-१३६८ | विधानंद दयामल भाटीया | बक्षीस पत्र | जगदिश दयामल भाटीया |
| ७ | ०४-४६० | अमिषा अपार्टमेट तर्फे पार्टनर | विक्रीपत्र | उज्वला चंद्रकांत भितकर |
| ८ | ०४-५४१ | मीना चंद्रशेखर चांभारे | विक्रीपत्र | श्रीकांत भैयाजी मुळे |
| ९ | २१-४७१ | सिताराम कडवे तर्फे नरेश कडवे | वारस | महेश नरेश कडवे व इतर २ |
| १० | १०-५३५ | लीलाबाई दादाराव ठाकरे | हक्कसोडलेख | दीपक दादाराव ठाकरे |
| ११ | २२-२८७ | शरद विठ्ठल निमजे, छाया विठ्ठल निमजे व इतर २ | वाटणी पत्र | शरद विठ्ठल निमजे |
| १२ | ३५-४९६ | अरुणा मेंढे म.ख देविदास बोबळे | विक्रीपत्र | देविदास पांडूरंगजी बोबडे |
| १३ | १९-२६२ | कलावती मधुकर ठाकरे | मृत्यूपत्र लेख | प्रतिभा सुधाकर गुडधे |
| १४ | ३८-३१६ | शालिनी उमाकांत संगमवार | विक्रीपत्र | साहेबसिंह अवतारसिंह सिख्या व इतर १ |
| १५ | २८-७१ | जैनबी शरीफखा पठाण | विक्रीपत्र | रिजवान खान नियामत उल्लाखान पठाण |
| १६ | ०८ | अशोक पद्माकरराव डांगे | वारस | कुणाल अशोक डांगे व इतर २ |
| १७ | २४-६७८ | राकेश बन्सीलाल साहू, रितेश बन्सीलाल साहू व इतर १ | हक्कसोडलेख | राकेश बन्सीलाल साहू व इतर १ |
| १८ | ०७८-३३८ | लीलाबाई नामदेवराव खेलकर | वारस | वैशाली प्रशांत तिमांडे व इतर ३ |
| १९ | ३१-१४२ | बुद्धू ठकूरदिन यादव | विक्रीपत्र | योगेश रामदास साहू |
| २० | २२-५६४ | इंदुबाई विठ्ठलराव निमजे | बक्षीस पत्र | रवी विठ्ठलराव निमजे |
| २१ | १२-२६७ | महेश माधवराव कावरे | बक्षीस पत्र | सतिश माधवराव कावरे |
| २२ | १५-२०६ | शेख एजाज शेख हुसैन | विक्रीपत्र | मोहम्मद साजिद शेख हुसैन |
| २३ | ३९-४५९ | बसंत झामनदास पंजवानी, विष्णू झामनदास पंजवानी व इतर ३ | विक्रीपत्र | ब्रिजलाल करोडीमल पंजवानी |
| २४ | .१६-१२५५ | लाद्धाराम आहुजा | विक्रीपत्र | अशोक गुरुमुखदास आहुजा व इतर १ |
| २५ | ३९-८१ | सुमनबाई देविदास मेश्राम | विक्रीपत्र | विनोद देविदास मेश्राम |
| २६ | १२-२६८ | विश्वेश्वर शंकरराव नांदूरकर | वारस | सुनिल विश्वेश्वर नांदूरकर व इतर ३ |
| २७ | १०-५२५ | नारायण बळीराम काकडे | वारस | धनंजय नारायण काकडे व इतर ४ |
| २८ | ३६-४०७ | नलिनी शरदराव गाडेकर व इतर | विक्रीपत्र | अमित बलराम गनवाणी व इतर १ |
| २९ | ३६-४०८ | नलिनी शरदराव गाडेकर व इतर | विक्रीपत्र | अमित बलराम गनवाणी व इतर १ |
| ३० | ०७-५५४ | कलावती महादेवराव मुरकुटे, रुखमाबाई महादेव मुरकुटे | विक्रीपत्र | प्रदीप शामराव मुनघाटे |
| ३१ | ०६ | साधना दीपकराव सुरकार | नवीन नोंद | नरेश साहेबराव लोहाटे |
| ३२ | १०-४३२ | मारोतराव जगन्नाथ ढुमने | वारस | विलास मारोतराव ढुमने व इतर २ |
| ३३ | १३-२९९ | शोभा विजय कुलधरिया | विक्रीपत्र | शुभांगी अमोल लाडे |
| ३४ | १३-२८९ | कपिल विजय कुलधरिया | विक्रीपत्र | अमोल नामदेवराव लाडे |
| ३५ | ०७-३३६ | वामन नानाजी लोहकरे | विक्रीपत्र | सुष्टी बंडूजी लाडे |
| ३६ | १८ | मनोहर रामचंद्रराव निशाने | मृत्यूपत्र लेख | शुभम ज्ञानेश्वर निशाने |
| ३७ | १६- ८८३/ ८८४ | राधाकिसन गानेशनारायण जोगानी | विक्रीपत्र | संदेश स्वरूपचंद बोथरा |
| ३८ | १६-१०२७ | राधा रमेश उमरे नितेश रमेश उमरे संजय रमेश उमरे | विक्रीपत्र | जोहेर अब्बास सैफी |
| ३९ | २२-२८५ | रत्नाकर महादेव मंगरूळकर | वारस | राहुल रत्नाकर मंगरूळकर व इतर १ |
| ४० | ०९-२८० | नंदकुमार मधुकर कणसे | विक्रीपत्र | नितीन शांतारामजी डगवार |
| ४१ | २२-४४८ | प्रतिभा उदयराव साळंवे | विक्रीपत्र | प्रियंका मनीष घोडे |
| ४२ | १०-६६९ | मारोतराव रामचंद्र बोडखे | विक्रीपत्र | अभय व्यंकटेश सकंडे |
| ४३ | ०३-२७७ | हिमालय विश्व सुमितभाई जमनादास उनटकर तर्फे अशोक लक्ष्मीचंद कृपलानी | विक्रीपत्र | अशोक लक्ष्मीचंद कृपलानी |
| ४४ | ०३-२७८ | हिमालय विश्व सुमितभाई जमनादास उनटकर तर्फे राजेश लक्ष्मीचंद कृपलानी | विक्रीपत्र | राजेश लक्ष्मीचंद कृपलानी |
| ४५ | ११-५८३ | वारको रियालीटीज प्रा.लि. तर्फे डायरेक्टर | विक्रीपत्र | प्रतिक किशोर भूत |
| ४६ | ३८-५२० | बापट डेकाटे | विक्रीपत्र | दीपक शिवदास डेकाटे |

वरील मालमत्ता हस्तांतरण बाबत ज्या नागरिकांना हरकत किंवा आक्षेप घ्यावयाचा असेल त्यांनी आपल्या हरकती, आक्षेप आवश्यक दस्ताएवज व लेखी स्वरूपात हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाचे आत नगर परिषद वर्धाचे कार्यालयात सादर करावे. मुदतीच्या नंतर कोणतीच हरकत किंवा आक्षेप विचारात घेतल्या जानार नाही. करीता नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मतदारांना वाटल्या चांदीच्या वाट्या

## ◆ पुण्यात वसंत मोरे आक्रमक ◆

**पुणे/प्रतिनिधी :** अजित पवार आणि भाजप यांच्यातील तीव्र संघर्षामुळे कमालीच्या रंगतदार झालेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. मतदानापूर्वी मतदारांना पैसे वाटण्याचे प्रकार सर्रास घडतात. हे प्रकार रोखण्यासाठी निवडणूक आयोग आणि पोलिस डोळ्यात तेल घालून लक्ष देत आहेत. मात्र, एवढा चोख बंदोबस्त असतानाही पुण्यात मतदारांना चांदीच्या वाट्या वाटण्यात आल्याची घटना समोर



आली आहे. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी हा आरोप केला आहे. वसंत मोरे यांचा मुलगा रुपेश मोरे पुणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ४० ड मधून निवडणुकीच्या रिंगणात आहे.पुण्यातील कात्रज परिसरातील प्रभाग क्रमांक ४० मध्ये मतदारांना चांदीच्या वाट्या वाटल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार वसंत मोरे आणि त्यांच्या मुलाने केला आहे. बुधवारी संध्याकाळी एका गाडीतून मोठ्या प्रमाणात चांदीच्या वाट्या प्रभागात नेल्या जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित गाडीत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रकाश कदम यांच्या प्रचाराच्या पत्रिका तसेच मतदारांची यादी आढळून आल्याचा आरोप वसंत मोरे यांनी केला आहे. त्यामुळे सदर गाडी ही प्रचारासाठीच प्रभागात आली होती, असा त्यांचा दावा आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत वसंत मोरे यांनी पोलिसांकडे अधिकृत तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# निवडणूक आश्वासनाचे बळी; तेलंगणात 500 कुत्र्यांची हत्या

**कामारेड्डी /वृत्तसंस्था-** तेलंगणाच्या गावांमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर भटक्या कुत्र्यांना जीवे मारल्याची प्रकरणे समोर आली आहेत. गेल्या



एका आठवड्यात, वेगवेगळ्या जिल्ह्यांतील गावांमध्ये सुमारे ५०० कुत्र्यांची कथितरित्या हत्या करण्यात आली आहे. पोलिसांच्या मते, या घटनांमध्ये पंचायत प्रतिनिधींची भूमिका समोर येत आहे. ताजे प्रकरण कामारेड्डी जिल्ह्यातील आहे. येथे पालवंचा मंडळातील ५ गावांमध्ये भवानीपेट, पालवंचा, फरीदपेट, वाडी आणि बंदारामेश्वरपल्ली गावांमध्ये गेल्या दोन-तीन दिवसांत सुमारे २०० भटक्या कुत्र्यांना मारल्याचा आरोप आहे. पोलिसांनी पाच सरपंचांसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यापूर्वी, हनमकोंडा जिल्ह्यातील श्यामपेट आणि अरेपल्ली गावांमध्ये ६ जानेवारी ते ९ जानेवारी दरम्यान सुमारे ३०० भटक्या कुत्र्यांची हत्या झाल्याचे प्रकरण समोर आले होते. पोलिसांनी या संदर्भात दोन महिला सरपंच आणि त्यांच्या पतींसह नउ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गावांशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांदरम्यान काही उमेदवारांनी भटक्या कुत्र्यांच्या आणि माकडांच्या समस्येवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. आरोप आहे की, निवडणूक जिंकल्यानंतर तीच आश्वासने कुत्र्यांना मारून पूर्ण केली जात आहेत.

# चांदीची एका दिवसात 14 हजारांची उसळी

## ◆ नागपुरात किलोचा दर २.८६ लाखांवर ◆

**नागपूर/प्रतिनिधी :** सोन्याच्या पावलावर पाउल ठेवत चांदीनेही आता दरवाढीचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. नागपूरच्या सराफा बाजारात अवघ्या चार




दिवसांत चांदीच्या दरात तब्बल ३२ हजार रुपयांची विक्रमी वाढ झाली असून, हा दर ३ टक्के जीएसटीसह २,८६,४४३ रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. लवकरच ३ लाखांची पातळी गाठण्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे.विशेष म्हणजे, मंगळवारच्या तुलनेत बुधवारी एकाच दिवसात चांदीत किलोमागे १४,१०० रुपयांची प्रचंड वाढ नोंदवण्यात आली. दरवाढीची आकडेवारी पाहता नववर्षात केवळ जानेवारी महिन्यातच चांदीत तब्बल ५०,८०० रुपयांची वाढ झाली. दरवाढीच्या या वेगामुळे गुंतवणूकदार आणि ग्राहकांचे डोळे विस्फारले आहेत.

**का वाढताहेत चांदीचे दर?-** चांदीच्या या रॉकेट वेगामागे केवळ गुंतवणूक नाही, तर अनेक जागतिक आणि औद्योगिक कारणे कारणीभूत आहेत. सौर उर्जा आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीमध्ये चांदीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. जगभरात ग्रीन एनर्जीवर भर दिला जात असल्याने चांदीची मागणी औद्योगिक स्तरावर प्रचंड वाढली आहे. मागणीच्या तुलनेत जागतिक स्तरावर चांदीचा पुरवठा मर्यादित आहे. खाणींमधून होणारे उत्पादन संथ असल्याने बाजारात तुटवडा जाणवत आहे. याशिवाय जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता आणि वाढत्या महागाईपासून संरक्षण म्हणून गुंतवणूकदार आता सोन्यासोबतच चांदीला प्राधान्य देत आहेत. अनेक दिवसांपासून चांदीचे दर सोन्याच्या तुलनेत कमी होते. आता ही तफावत भरून काढण्यासाठी चांदीमध्ये जोरदार खरेदी दिसून येत आहे. नागपूरच्या बाजारातील स्थिती नागपूर हे मध्य भारतातील सोने आणि चांदीच्या व्यापाराचे मोठे केंद्र आहे. येथील बाजारात झालेली ही मोठी वाढ लग्नसराईच्या काळात ग्राहकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

# राफेल खरेदीचा फ्रान्सशी होणार सर्वात मोठा सौदा!

## विमानांची असेंब्ली लाईन नागपूरमध्ये

**नवी दिल्ली :** भारत आणि फ्रान्समध्ये राफेल फायटर जेट संदर्भात एक मोठा करार होणार आहे. पुढील महिन्यात फेब्रुवारीमध्ये डील फायनल होउ शकते.



यात राफेलचे आधुनिक वर्जन एफ-४ आणि एफ-५ यांचा समावेश आहे. राफेल विमानांची फायनल असेंब्ली लाइन नागपूरमध्ये स्थापित केली जाईल. अनेक भारतीय कंपन्यांना या प्रोजेक्टशी जोडलं जाईल. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅनुएल मॅक्रो पुढील महिन्यात भारत दौ-यावर येणार आहेत. त्यावेळी दोन्ही देशांमध्ये करारावर स्वाक्षरी होउ शकते. या डील अंतर्गत भारत फ्रान्सकडून ११४ फायटर विमाने विकत घेणार आहे. करारांचे वैशिष्ट्य म्हणजे राफेल विमानांचा काही भाग भारतात बनवला जाईल. त्यामुळे देशात रोजगार निर्मिती होईल. संरक्षण मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या डीलचा एकूण खर्च ३.२५ लाख कोटी रुपयांच्या घरात असल्याचं सांगितलं जात आहे. या करारातंर्गत भारताला १८ राफेल विमान उड्डाण योग्य म्हणजे फ्लाई-अवे कंडीशनमध्ये मिळणार आहेत. उर्वरित विमानांची निर्मिती भारतातच होईल. यात जवळपास ६० टक्के स्वेदशी उपकरणांचा वापर केला जाईल.

# अंत्यविधी सुरू असतानाच हलले पाय; 103 वर्षांच्या आजीला 'नवजीवन'

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील रामटेकमध्ये राहणा-या एका कुटुंबाने मृत्यू आणि जीवनाच्या सीमारेषेवर उभे राहून थक्क करणारा अनुभव घेतला. १०३ वर्षांच्या गंगाबाई सावजी साखरे यांना मृत घोषित करून अंत्यविधीची तयारी पूर्ण झाली होती. नाकात कापूस ठेवण्यात आला, हातपाय बांधणे सुरू होते. अचानक आजीबाईने पायाची बोटे हलवली आणि सा-यांनाच धक्का बसला. विशेष म्हणजे आजीबाईंचा १३ जानेवारीलाच वाढदिवस होता. त्यामुळे आईबाईचा यावेळी अंत्यविधी ऐवजी घरात साधेपणाने नवजीवनाचा वाढदिवस साजरा केला गेला.

आजीबाईचे नाव गंगाबाई सावजी साखरे असून त्या १०३ वर्षांच्या आहे. त्या दोन महिन्यांपासून अंथरुणाला खिळलेल्या होत्या. आजारपणामुळे त्या दोन चम्मच पाण्यावर दिवस काढत आहे. गंगाबाई यांच्या मृत्यूची वार्ता नातेवाईकांपर्यंत पसरली. अंत्यविधीची तयारी पूर्ण झाली. नाकात कापूस ठेवण्यात आला. हातापायांची बोटे बांधण्यात आली. अंत्यविधीची प्रक्रिया सुरू असतांना अचानक आजीबाईने पायाची बोटे हलवली. त्या जिवंत असल्याचे समजले. त्यामुळे उपस्थितांमध्ये खळबळ उडाली. गंगाबाई या मूळच्या चारगाव (ता. रामटेक) येथील रहिवासी आहे. सध्या रामटेकच्या आंबेडकर वार्डात मुलगी कुसुमा अंबादे यांच्या घरी राहतात. १२ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता त्यांच्या शरीराच्या हालचाली थांबल्याचे दिसताच कुटुंबीयांनी त्यांना मृत समजले. नातेवाईकांना फोनवरून निरोप देण्यात आला. समाज माध्यमांवरून नातेवाईक व कौटुंबिक मित्रांना निधन वार्ता दिली गेली. घरासमोर मंडप उभारण्यात आला. अंत्यविधीची वेळ ठरवण्यात आली आणि शववाहिका निश्चित करण्यात आली. गंगाबाईना नवीन वस्त्रे घालून हात- पायांची बोटे बांधण्यात आली. नाकात कापूस ठेवण्यात आला. दरम्यान, दोन तासांनी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास नातू राकेश साखरे यांच्या लक्षात आले की आजीच्या पायाची बोटे हलवली. त्वरित बोटांची बांधणी सोडण्यात आली. नाकातील कापूस काढताच गंगाबाईनी जोरात श्वास घेतला ही बाब समजताच उपस्थितांचा क्षणभर विश्वासच बसेना. अंत्यविधीची सर्व तयारी रद्द करण्यात आली.





## दुस-या दिवशी आज्जीचा वाढदिवस साजरा केला

आज्जीच्या बोटांच्या हालचाली पाहून, नाकातला कापूस काढला. आज्जी जीवंत आहे यावर नातेवाईकांचा विश्वास बसत नव्हता. त्यानंतर अंत्यविधीची तयारी रद्द करण्यात आली. १३ जानेवारीला गंगाबाई सावजी साखरे यांचा वाढदिवस असतो, त्यामुळे अत्यवीधीसाठी आलेल्या नातेवाईकांनी दुस-या दिवशी आज्जीचा वाढदिवस साजरा केला. यावेळी नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

**आज्जी काय म्हणाल्या ?-** या घटनेनंतर गंगाबाई सावजी साखरे यांच्या तोंडून, मी जिवंत नाही मला घेउन जा आटोवाल्याला ५० रुपये द्या मी देवाला सुट्टी मागीतली असे शब्द ऐकायला मिळाले. पण आज्जीच्या मरणाच्या वृत्ताने दुःखात असलेल्या नातेवाईकांनी मोठ्या आनंदात केक कापून आज्जीचा १०३ वाढदिवस साजरा केला. दरम्यान, या घटनेमुळे नातेवाईकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. ही घटना आता परिसरात वा-यासारखी व्हायरल झाली आहे. त्यामुळे लोकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. रामटेक तालुक्यातील चारगावच्या गंगाबाई सावजी साखरे या १०३ वर्षांच्या आज्जीला जीवनदान मिळालं आहे. गंगाबाई साखरे रामटेकमध्ये मुलीकडे राहतात. १२ जानेवारीला सायंकाळी त्यांची हालचाल थांबली त्यामुळे घरच्यांनी आज्जीला मृत समजले. नातेवाईकांना फोन सुरु झाले, अंत्यविधीची तयारी झाली. आज्जीच्या नाकात कापसाचे बोळे टाकले आणि पाय बांधले मात्र तेवढ्यात आज्जीच्या पायाच्या बोटांची हालचाल सुरु झाली आणि नातेवाईकांना आश्चर्य वाटलं. त्यानंतर अंत्यविधीसाठी आलेल्या नातेवाईकांनी नंतर दुस-या दिवशी आज्जीचा १०३ वा वाढदिवस साजरा केला.

# अधिका-याची शेतक-याला बुटाने मारहाण

**वाशीम/प्रतिनिधी :** शेतक-याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. मात्र आता कृषीमंत्राचे पालकत्व असलेल्या वाशिमच्या मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी शेत शिवारात धक्कादायक प्रकार घडला आहे. मनरेगा अंतर्गत चार महिन्यांपासून फळबागेची रखडलेली मजुरी मागितल्याचा राग मनात धरून मंगरूळपीर तालुका कृषी अधिका-यांकडून थेट शेतक-याला बुटाने मारहाण करण्यात आली. या घटनेत शेतक-याला शिवीगाळ करण्यात आली असून त्याचा मोबाईल हिसकावून घेतला. या प्रकरणामुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. याचा व्हिडिओ समोर आला आहे.



**शेतकरी ऋषिकेश पवार यांना मारहाण**

समोर आलेल्या माहितीनुसार, वाशिममधील मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी शिवारात मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड करण्यात आली आहे. मात्र या फळबागेची मजुरी मागील चार महिन्यांपासून रखडलेली असल्याने शेतक-यांनी जिल्हा कृषी अधिका-यांकडे तक्रार केली होती. या तक्रारीनंतर तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे हे पाहणीसाठी शेतावर आले होते. यावेळी शेतकरी ऋषिकेश पवार हे घडामोडींचे व्हिडिओ चित्रीकरण करत असताना, व्हिडिओ का काढतोस असा जाब विचारत कृषी अधिका-यांकडून शेतक-याला थेट बुटाने व मातीच्या ढेकळाने मारहाण केली. मारहाणीबरोबरच शिवीगाळ करण्यात आली असून, मोबाईल हिसकावून घेतल्याचेही शेतकरी ऋषिकेश पवार यांनी म्हटलं आहे.

**कायदेशीर कारवाई होणार -** जिल्हा कृषी अधिकारी

या घटनेनंतर प्रभारी जिल्हा कृषी अधिकारी अनिसा महाबळे यांनी म्हटले की, गोगरी येथे प्रकार घडला, त्याच्याबद्दलची वायरल लिंक आली होती आणि त्या अनुषंगाने पाहिल्यानंतर मी स्वत? आणि आमचे कृषी सहसंचालक वरिष्ठ जेडीएस साहेब आम्ही त्या शेतक-यांकडे गेलो त्यांना भेट घेतली. हा जो प्रकार घडला याला आमचं कोणाचं समर्थन नाहीये आणि या अनुषंगाने शेतक-यांना सुद्धा दिलासा दिलेला आहे. यामध्ये जे त्यांचं काही मस्टर प्रलंबित असतील तेही तात्काळ काढण्यासाठी सांगितलं आहे. याशिवाय आता त्यांचा महाराष्ट्र नागरी सेवा नियम वर्तणुकीमध्ये जे त्यांच्याकडे कारवाईचा प्रस्ताव आणि सादर करत आहे चौकशी करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**मारहाण करणा-या अधिका-याने काय म्हटले ?** तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी याबाबत म्हटले की, गोगरी गावात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड योजनेची तपासणी व मार्गदर्शन करत असताना साखरे यांच्या शेतात दोन युवक सतत शूटिंग करत होते. शूटिंग बंद करण्यास सांगितल्यानंतर त्यांनी माझ्यासोबत असलेल्या महिला कर्मचारी यांच्याशी गलिच्छ व अपमानास्पद भाषेत बोलणे सुरू ठेवले. मी त्यांना विरोध केला, मात्र ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. जाताना त्यांनी माझ्याशीही असंविधानिक व सामाजिकदृष्ट्या अयोग्य भाषेत बोलल्यामुळे माझा संयम सुटला आणि पुढील घटना घडली. दरम्यान, वाशिमचे पालकत्व असलेल्या कृषिमंर्त्याच्या जिल्ह्यात जिल्ह्यात शेतक-यांना मारहाण होत असेल तर गंभीर बाब म्हणावी लागेल. या प्रकारामुळे परिसरातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. तालुका कृषी अधिका-याविरोधात प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे आता शेतक-यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# प्रयागराज माघ मेळ्यात भीषण आग

**प्रयागराज :** प्रयागराज माघ मेळ्यात सलग दुस-या दिवशी आग लागली असून बुधवारी संध्याकाळी ब्रम्हा आश्रम शिबिरात अचानक आग लागली. जोरदार वा-यामुळे आगीच्या ज्वाळांनी



२ मोठ्या शिबिरांना वेढले. यामुळे १० हून अधिक तंबू जळून खाक झाले. कल्पवासियांनी पळून जाउन आपला जीव वाचवला. ब्रम्हा आश्रम शिबिर सेक्टर ४ च्या खालच्या मार्गावर आहे. उंच उळणा-या ज्वाळांसोबत धूर सुमारे ५ किलोमीटर दूरून दिसत होता. अग्निशमन दलाच्या पथकांनी पाण्याचा फवारा मारून आगीवर नियंत्रण मिळवले. या दरम्यान, आग अधिक पसरू नये म्हणून संपूर्ण परिसर सील करण्यात आला. सर्वात आधी पोलिस आणि संतांनी बचाव कार्य सुरू केले. त्यानंतर १० अग्निशमन दले आणि १० रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. ३० अग्निशमन कर्मचा-यांनी लोकांना दुस-या ठिकाणी हलवले. तंबूमधील कल्पवासियांचे सामान जळून खाक झाले. कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही.

# विद्यार्थिनीवर बलात्कार; शाळेच्या मुख्याध्यापकाचे भयंकर कृत्य

**कोल्हापूर/ प्रतिनिधी-** कोल्हापुरातून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. इयत्ता दहावीपर्यंत शाळेत शिकलेल्या माजी विद्यार्थिनीवरच त्या शाळेच्या मुख्याध्यापकाने अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पीडितेच्या आईच्या आजारपणाचा गैरफायदा घेत हा प्रकार घडवण्यात आला असून, या प्रकरणी पोक्सो कायद्यासह अॅट्रासिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. कृष्णा ज्ञानू दाभोळे, असे या आरोपी मुख्याध्यापकाचे नाव आहे. पीडित मुलगी अल्पवयीन असून ती दहावीपर्यंत याच शाळेत शिकली होती. पीडितेची आई सध्या कोल्हापूर शहरात वास्तव्यास असून काही दिवसांपासून आजारी आहे. आईच्या उपचारासाठी मुलगी कोल्हापुरात परतली होती. हीच संधी साधत आरोपीने तब्येतीची विचारपूस करण्याच्या बहाण्याने पुन्हा संपर्क वाढवला. ऑगस्ट २०२५ मध्ये पीडितेच्या घरी कोणी नसल्याचे पाहून आरोपीने तिच्यावर अत्याचार केला. यानंतर आरोपीच्या मुलाचा शहरात फ्लॅट असल्याने दोन महिन्यांनंतर त्या ठिकाणी बोलावून पुन्हा अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर मुलीच्या वागण्यात झालेला



बदल लक्षात आल्याने आईने तिला विश्वासात घेउन विचारपूस केली. यावेळी पीडितेने सर्व प्रकार आईला सांगितला. हे ऐकून आईलाही धक्का बसला. त्यानंतर दोघींनी पोलिस मुख्यालयातील महिला कक्षामध्ये तक्रार दिली. त्यानुसार जुना राजवाडा पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम म्हणजेच पोक्सो तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला मुरगूड येथून अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# इराणमध्ये दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश

## 2500 आंदोलक ठार; 10 हजार जण अटकेत

**तेहरान /वृत्तसंस्था-** इराणमध्ये सरकारविरोधात सुरु असलेल्या आंदोलनाने आता हिंसक वळण घेतले असून, परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे चित्र आहे. आठवडाभरापासून सुरू असलेल्या या संघर्षात आतापर्यंत २,५०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक दावा एका वरिष्ठ इराणी अधिका-याने केला आहे. अधिकृत आकडेवारीनुसार ६०० मृत्यूंची नोंद असली तरी, मृतांचा आकडा यापेक्षा कितीतरी मोठा असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, १०,००० हून अधिक आंदोलकांना अटक करण-यात आली. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खोमेनी यांनी निदर्शकांना चिरडण्यासाठी सुरक्षा दलांना आंदोलकावर दिसताच क्षणी गोळ्या घालण-याचे आदेश दिले आहेत. १९७९ च्या क्रांतीनंतर इराणला बसलेला हा सर्वात मोठा सत्ताविरोधी धक्का मानला जात आहे. सरकारच्या तिन्ही प्रमुख अंगानी घेतलेल्या बैठकीनंतर इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कार्प्स आणि बसीज मिलिशियाला बळाचा वापर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एकीकडे देशांतर्गत असंतोष असताना, दुसरीकडे अमेरिकेच्या




संभाव्य लष्करी कारवाईमुळे इराणी नागरिक चिंतेत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला चर्चेचे आवाहन केले असले तरी, व्हाईट हाउसच्या प्रेस सचिव कॅरोलिन लेविट यांनी स्पष्ट केले आहे की, गरज पडल्यास अमेरिका लष्करी पर्याय निवडेल. दरम्यान इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अल जझीराला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ते अमेरिकेचे दूत स्टीव्ह विटकाफ यांच्या सतत संपर्कात आहेत. आंदोलनापूर्वी आणि नंतरही दोन्ही देशांमधील संवाद सुरू असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. मात्र, इराणची सार्वजनिक भूमिका आणि खाजगी पातळीवर दिली जाणारी आश्वासने यात तफावत असल्याचे अमेरिकेने म्हटले आहे. तेहरानमधील भारतीय दूतावासाने तेथील भारतीय नागरिकांना तातडीने देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी, यात्रेकरू, व्यावसायिक आणि पर्यटकांना उपलब्ध व्यावसायिक विमानांच्या माध्यमातून लवकरात लवकर बाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मतदानासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज; 10,231 मतदान केंद्रांवर होणार मतदान

**गेली 30 -35 वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता असलेल्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. त्यामुळे शिवसेनेच्या दोन गटांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे.**



**मुंबई/प्रतिनिधी :** तब्बल नउ वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असून या निवडणुकीचा दिवस येउन ठेपला आहे. मुंबईमधील २२७ प्रभागांसाठी गुरुवार, १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून मुंबई महापालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. मुंबईत १०,२३१ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. मुंबई महापाालिकेच्या यंत्रणेने विविध विभागीय केंद्रांवर मतपेट्या व निवडणूक साहित्य वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली. मुंबईमधील २२७ प्रभागांमधून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या १७०० उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. देशातील सर्वात श्रीमंत महानगरापालिका अशी ख्याती असलेल्या मुंबई महापालिकेची निवडणूक गुरुवारी होणार आहे. राज्यातील २९ महापालिकांची निवडणूक होणार असली तरी संपूर्ण देशाचे लक्ष मंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे लागले आहे. गेली ३० -३५ वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता असलेल्या शिवसेनेत फूट पडल्यानंतर होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. त्यामुळे शिवसेनेच्या दोन गटांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे.

मुंबई महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच प्रमुख पक्षांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे) महायुती आणि ठाकरे बंधू यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. ही निवडणूक अत्यंत अटीतटीची होणार असून त्याचा प्रचंड ताण प्रशासकीय यंत्रणेवर आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, गुरुवार, १५ जानेवारी रोजी मतदान, तर शुक्रवारी १६ जानेवारी रोजी मतमोजणी पार पडणार आहे. यंदा मतदानाच्या दुस-याच दिवशी मतमोजणी होणार असल्यामुळे पालिका यंत्रणेने मतदानाबरोबरच मतमोजणीची तयारीही पूर्ण केली आहे. राजकीय पक्षही निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी तयार झाले असून प्रशासकीय यंत्रणाही सज्ज झाली आहे.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) अश्विनी जोशी यांनी बुधवारी अंधेरी (पश्चिम) येथील शहाजीराजे भोसले क्रीडा संकुलातील मतदान साहित्य वाटप केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी मतदान साहित्य वाटप प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. या केंद्रांवर मतपेट्या, मतदार यादी, मतदानासाठी आवश्यक कागदपत्रे, शिक्के, सील, शाई, ओळख पट्टे, मार्गदर्शक सूचना पुस्तिका आदी साहित्याचे वितरण करण्यात आले. मतदान साहित्य वाटपानंतर सर्व मतदान पथके नियोजित मतदान केंद्रांकडे रवाना झाली.

**निवडणूकीच्या रिंगणात २९ पक्ष**

मुंबई महापालिकेच्या रिंगणात तब्बल २९ विविध पक्ष उतरले आहेत. शिवसेनेचे दोन गट झाल्यामुळे यंदा शिवसेनेचे दोन गट निवडणुकीच्या रिंगणात आहेत. शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे), मनसे, भाजप, कांग्रेस, राष्ट्रवादी, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी या पक्षांबरोबरच सनद छत्रपती शासन, विनायक मेटे विकास आघाडी, बहुजन मुक्ती पार्टी, सरदार वल्लभभाई पटेल पार्टी, बहुजन समाज पार्टी, अखिल भारत हिंदू महासभा, जनता दल (सेक्युलर), राष्ट्रीय महास्वराज भूमी पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), प्रहार जनशक्ती पक्ष, संभाजी ब्रिगेड, राष्ट्रीय समाज पक्ष, पीस पार्टी,उत्तर भारतीय विकास सेना, वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया बळीराज सेना या अन्य पक्षांचेही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**६४ हजार अधिकारी व कर्मचारी नियुक्त-** मुंबईत गुरुवारी एकूण १० हजार २३१ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ६४ हजार ३७५ अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित सर्व अधिकारी - कर्मचा-यांचे निवडणूकविषयक प्रशिक्षण पूर्ण झाले असून, मतदान साहित्य स्वीकारण्यासाठी त्यांनी बुधवारी २३ विभागीय केंद्रांवर नियोजित वेळेत हजेरी लावली. मतदान प्रक्रिया सुरळीत आणि त्रुटीरहित पार पडावी यासाठी प्रत्येक मतदान केंद्रासाठी स्वतंत्र मतदान साहित्य संच तयार करण्यात आले आहेत. या साहित्याची काटेकोर तपासणी करूनच वितरण प्रक्रिया पार पाडण्यात आली. कोणत्याही प्रकारची चूक किंवा त्रुटी राहू नये, यासाठी वरिष्ठ निवडणूक अधिकारी व पर्यवेक्षकांनी संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने देखरेख ठेवली. मतदान कर्मचा-यांना त्यांची जबाबदारी, मतदानाची संपूर्ण कार्यपद्धती, निवडणूक नियमावली, तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# एक मत म्हणजे..

एक मत म्हणजे एक आवाज. लाखो मतदारांचा मिळून तयार होणारा हा आवाजच शहराचे भविष्य ठरवतो. पालिका निवडणूक ही दैनंदिन आयुष्याशी थेट जोडलेली निवडणूक आहे. दैनंदिन निगडित प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनच सुटतात. म्हणूनच पालिका निवडणुकीत मत देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. न्यायालयाच्या आदेशाने वा इतर काही कारणांमुळे रखडलेल्या निवडणुका अखेर नऊ वर्षांनी का होईना होत आहे. घटनेने दिलेल्या या स्वातंत्र्याचा आपण आता पुन्हा एक प्रकारे उत्सवच साजरा केला पाहिजे. आपला स्वतःचा लोकप्रतिनिधी निवडण्याची वेळ आली. न्यायालयाच्या आदेशाने आता निवडणुका पार पडणार आहेत. त्यासाठी प्रत्येकाने गुरुवारी मतदान केले पाहिजे. आपल्यासाठी सुद्धा आणि येणाऱ्या भविष्यासाठी सुद्धा. बरीच मंडळी निवडणुका आल्या, की त्यावर बहिष्कार टाकण्याची तसेच आम्हाला काय त्यातले म्हणत निवडणुकीकडे पाठ फिरवतात. मात्र हे चुकीचे असून आपणच आपल्या प्रगतीच्या मार्गात अडथळे आणत आहोत हेही त्यांच्या लक्षात येत नाही. जर आपण मतदान केले नाही तर आपल्याला टीका करण्याचा कोणताही हक्क उरत नाही. काहीजण म्हणतात इतर नगरसेवकांची स्थानिक पातळीवरची निवडणूक आहे, मग त्यात काय एवढे; आमच्या एका मतदानाने इतका काय फरक पडतो? मात्र असा सर्वांनीच विचार केला तर मात्र चुकीच्या हाती सत्ता जाऊन त्याचे दुष्परिणामही आपल्यालाच भोगावे लागतील. ही स्थानिक पातळीवरचीच निवडणूक आपल्या शहराला आपण निवडून दिलेल्या उमेदवाराकडून चांगली कामे करून घेऊन आपले शहरच नव्हे, तर देश घडवण्यास आपण मदत करत असतो हेही लक्षात घ्यावयास हवे. ही निवडणूक नगरसेवकांसाठी आहे, तर आधी नगरसेवकाचे खरे महत्त्व पटवून घेतले पाहिजे.आपल्या रोजच्या आयुष्यात ज्या कामांशी आपला संबंध येतो त्या रस्ता, पाणी, वीज, कचरा, नाले, शाळा, दवाखाना, परिवहन सेवा ही सगळी कामे थेट नगरसेवकाच्या हातात असतात. आपल्या गल्लीतला खड्डा, बंद लाईट, भरलेली गटारे, कचऱ्याचा ढीग,बस सेवा हे सगळे नगरसेवकाकडेच जाते. आपल्या वॉर्डमध्ये काही चांगले झाले, तर त्यामागे नगरसेवकाची धावपळ असते. काही बिघडले, तर आपण पहिल्यांदा जाऊन जाब विचारतो तोही नगरसेवकालाच. म्हणजे तो आपला सगळ्यात जवळचा लोकप्रतिनिधी असतो. म्हणूनच पालिका निवडणूक फार महत्त्वाची आहे. आपण ज्याला मत देतो, तोच पुढची पाच वर्षं आपल्या भागाचे नशीब ठरवतो. चुकीचा माणूस निवडला, तर पाच वर्षं तक्रार करत बसावे लागते. योग्य माणूस निवडला, तर आपला परिसर बदलून जातो. जो फोन उचलतो, लोकांना भेटतो, कामासाठी मागे लागतो, अधिकाऱ्यांकडे धावपळ करतो आणि प्रश्न सुटेपर्यंत शांत बसत नाही, असा नगरसेवक हवा. फक्त बॅनर लावणारा, भाषण देणारा, पण काम न करणारा नको. हेही लक्षात असू द्या. एकदा प्रचारासाठी आपल्या दारात आला आणि पाच वर्षे तो गायब झाला असाही नको, म्हणून योग्य त्या व्यक्तीची निवड ही खूप जरुरी म्हणूनच मतदानाच्या दिवशी आळस झटकून बाहेर पडा आणि योग्य त्या व्यक्तीला मत द्या. आपल्या विभागातील रस्ते पाणी, लाईट, कचरा, दवाखाना याची कमतरता व त्यांची परिस्थिती हे सगळे मत देताना आठवा.'माझ्या घराजवळचे काम कोण करून देईल?' हा प्रश्न स्वतःला विचारा आणि मगच बटन दाबा. आपले एक मत म्हणजे आपल्या वॉर्डचे भविष्य आहे. चुकीचे मत दिले, किंवा मत दिलेच नाही, तर नंतर बोलायचा अधिकारही आपोआप कमी होतो. म्हणूनच पहिले मतदान, मग बाकी सगळी कामे !आपल्या वॉर्डसाठी, मुलांच्या भविष्यासाठी आणि रोजच्या सोयीसाठी नक्कीच मतदान करा. याचा खरा अर्थ फक्त भाषणांत, घोषणा देण्यात किंवा सोशल मीडियावर मत मांडण्यात नाही, तर प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मत नोंदवण्यात आहे. पालिका निवडणूक ही दैनंदिन आयुष्याशी थेट जोडलेली निवडणूक आहे. दैनंदिन निगडित प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनच सुटतात. म्हणूनच पालिका निवडणूक ही केवळ राजकारणाची नाही, तर घराघरातील सुखदुःखाची निवडणूक आहे. आज अनेकजण म्हणतात, 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' पण इतिहास सांगतो, की अनेक निवडणुकांमध्ये काही मतांच्या फरकाने निकाल बदलले आहेत. एक मत म्हणजे एक आवाज. लाखो मतदारांचा मिळून तयार होणारा हा आवाजच शहराचे भविष्य ठरवतो. सध्या होऊ घातलेल्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्याचे पालिका व राज्य निवडणूक आयोगासमोर आव्हान आहे.यंदा ही परिस्थिती बदलेल अशी आशा करूया!

# लोकशाहीचा पोपट जिवंतच!

**राज्यात महानगरपालिका निवडणुकांचा प्रचाराचा धडाका थंडावत असतानाच राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याचे 'टायमिंग' साधले आहे. राज्यात मागील सप्ताहात महापालिका निवडणूकांसाठी ठाकरे बंधू, आणि वंचित बहुजनसह सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांच्या प्रचाराचा ज्वर पहायला मिळाला आहे. त्यात अनेक अजब-गजब गोष्टी जाणवल्या आहेत.**

### महायुतीच्या घटकपक्षांचे 'तुझ्या गळा माझ्या गळा'!

या प्रचाराची गंमत म्हणजे सर्वात मोठा राजकीय पक्ष असे म्हणवणा-या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सर्वात छोटा असलेल्या आणि विशेष म्हणजे चक्क् मुस्लिमांचा 'कैवारी पक्ष' असलेल्या (मजलीस ए एत्तहादी मुसलमीन) पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांचे चक्क पाय धरताना दिसला! (शू.त्यावर बोलायचे नाही हं!.) महायुतीचे घटकपक्ष म्हणून सत्तेवर असलेल्या शिवसेना शिंदे पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे,विद्यमान उपमुख्यमंत्री आणि माजी मुख्यमंत्री यांचे नाव घेवून भाजपचे नवी मुंबईचे सर्वेसर्वा,वनमंत्री,गणेश नाईक यांनी ठाणे-मुंबईच्या मध्यातील राखीव जंगल अभयारण्यातील हजार एकर जागा कुण्या उद्योगपतीला देण्याचा निर्णय परस्पर घेतल्याचा आरोप केला.इतकेच नाही तर वरिष्ठ नेत्यांनी सांगितले तर या प्रकरणात टांगा पलटी आणि घोडे फरार करण्याचा इशारा देखील जुने शिवसैनिक असलेल्या दादनी भाईंना देवून टाकला आहे. पण त्यावर मुख्यमंत्र्याकडून मात्र चकार भाष्य आले नाही की इन्कार करण्यात आला नाही. मात्र त्यावर भाजपचे महसूलमंत्री असलेल्या बावनकुळे यांनी आपल्याला यातील काहीच माहिती नसल्याचा खुलासा तातडीने देवून टाकला.

### हे 'करतळी आवळे तैसा हरी'

तर दुसरे उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडून भाजपची सत्तेची राक्षसी भुख,आणि सत्तेचा माज आल्याबाबत वक्तव्ये केली.इतकेच नाही तर ७०हजार कोटीचा भ्रष्टाचाराचा आरोप करणारेच सोबत सत्तेवर बसल्याची शेखी देखील मिरवली! त्यावर अजून त्या प्रकरणांची चौकशी पूर्ण होवून निर्णय लागायचा बाकी आहे, अशी आठवणही भाजपचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी करून दिली. त्याच पक्षाचे मुंबईचे अध्यक्ष नबाब मलिक यांच्यावर भाजपने मुंबईत जाहिर बहिषकाराची भाषा केली तर मलिक यांच्याकडूनही भाजपविरोधात वक्तव्य करण्याची एकही संधी सुटणार नाही याची दक्षता घेण्यात आली.पिंपरी चिंचवड पुण्यात राष्ट्रवादीची शक्ती असूनही त्यांना भाजपने सोबत घेतले नाही. तर मुंबईत फारशी शक्ती नसलेल्या एकनाथ शिंदे यांच्याशी मात्र मुंबईत जाणिवपुर्वक युती करण्यात आली. तर ठाण्यात युतीधर्म म्हणून शिंदे सोबत असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्र्याकडून करण्यात आले. या सगळ्या गोष्टीचा गोषवारा घेण्याचे कारण म्हणजे सुमारे 'चार वर्ष उशीराने या निवडणूका का घेण्यात आल्या?' याचे उत्तर या सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांच्या नेत्यांच्या वर्तनातून आणि वक्तव्यातून अगदी ज्ञानेश्वरांनी हरिपाठात म्हटले आहे तसे 'करतळी आवळे तैसा हरी' या उक्तीसारखे ठळकपणे दिसून आले. सत्तेमध्ये बसलेल्या तीन घटकपक्षांचे आणि त्यांच्या नेत्यांचे विळ्या-भोपळ्याचे सख्य त्या निमित्ताने मतदारांसमोर आले आहे.मात्र प्रचाराच्या कोलाहलात त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसले आहे. संपादकीय नावाच्या वर्तमानपत्रातील रकान्यात याची फारशी दखल घेतल्याचे दिसत नाही. किंवा महाचर्चा किंवा पत्रकार परिषदांमध्येही यावर रंग चढल्याचे जाणवत नाही.असे महायुतीच्या घटकपक्षांचे रंग बेरंग पणाचे राजकारण 'तुझ्या गळा माझ्या गळा' सुरू राहिल्याने मतदारांचा संभ्रम देखील होणार यात नवल नाही! नक्की हे सोबत आहेत की एकमेकांविरोधात आहेत? कारण लाडकी बहिण योजना कुणी आणली त्यावर यांचे एकमत नाही मात्र राजकीय फायदा तिघांना हवा आहे.एक म्हणाले मी मुख्यमंत्री असे पर्यत ती सुरू ठेवणार दुसरे म्हणतात मीच मुख्यमंत्री असताना ती सुरू केली. तर तिसरे म्हणत आहेत की वित्तमंत्री म्हणून माझ्या अखत्यारीत त्याची प्रभावी अंमलबजावणी होत आहे! आहे ना गंमत!इतके होवूनही तिघेही एकमेकांवर कुठे भ्रष्टाचाराचे आरोप करताना दिसतात तर कुठे एकत्र व्यासपीठावर एकत्र येवून प्रचार करताना दिसतात, बहुदा यांच्या या वागण्याने त्यांचे नेते मोदी-शाह देखील चक्रावून गेले असावेत आणि त्यांनी चक्क कोणत्याच शहरात प्रचाराला न येण्याचा निर्णय घेवून टाकला असावा असे ठाकरे पक्षांच्या काही नेत्यांकडून सांगण्यात आले! तशी अवस्था त्यांच्या मतदारांची झाली असावी म्हणून शिवाजी पार्कवर झालेल्या सभेला फार गर्दी जमली नाही की 'जान' दिसली नाही असा निष्कर्ष निरिक्षक व्यक्त करताना दिसत आहेत.

### 'सत्तातुराणां न भयं न लज्जा'!

मुंबई आणि राज्यात या निवडणूकांच्या कार्यक्रमा दरम्यान सत्ताधारी पक्षांकडून स्थानिक राजकारणावर वर्चस्व मिळवण्यासाठी जे अतार्कीक मार्ग निवडण्यात आले आणि काय वाट्टेल ते अश्याप्रकारचे वर्तन करण्यात येत आहे, त्यावर राज्य निवडणूक आयोगाने देखील फारशी काही दखल घेतल्याचे दिसून आले नाही. मात्र ऐन निवडणूकाच्या प्रचारात सरकारने लाडकी बहिण योजनेच्या अग्रीम हप्त्याचे पैसे मागील महिन्याच्या थकीत रकमेसह एकरकमी देण्याला आयोगाने हरकत घेतल्याचे दिसले. विधानसभांच्या निवडणूक मतदार याद्याच यावेळी वापरल्या जात असताना त्यात जसा दुबार आणि बोगस मतदानाचा फटका बसला तसा यावेळी अनुभव आलाच तर अश्या बोगस लोकांना ठोकून काढण्याचे जाहीर आवाहन राज ठाकरे यांच्याकडून करण्यात आले त्यावरही आयोगाकडून काही प्रतिसाद आल्याचे पहायला मिळाले नाही. ठाकरे बंधूकडून निवडणूकीत बेफाट पैसा वाटला जात असल्याचा जाहीर आरोप झाला इतकेच काय पण प्रत्यक्ष पैश्याची ऑफर नाकारलेल्या उमेदवारांचा जाहीर सभेत गौरव करण्यात आला त्याची देखील कोणतीच दखल आयोगाकडून घेतल्याचे दिसले नाही.

निवडणूकांच्या प्रचारा दरम्यान धार्मिक तेढ वाढविणारी वक्तव्ये करण्यात आली. तर हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा आणि उध्दव ठाकरेंवर कॉंग्रेस सोबत गेल्याने हिंदुत्व गमावल्याचा आरोप करणारा भाजप देखील कॉंग्रेस आणि चक्क एम आय एम सोबत जाताना या वेळी पहायला मिळाल्याने यावेळच्या निवडणुकीत भाजपने 'सत्तातुराणां न भयं न लज्जा' असा स्वतःचा परिचय करुन दिल्याचे बोलले जात आहे. त्यात मग गावगुंडाना राजाश्रय देण्यापासून अन्य पक्षांच्या संभाव्य उमेदवारांनाच पळवून आणून आपल्या पक्षातून उभे करण्याचा नवा 'चाणक्यनितीचा पॅटर्न' देखील आता अंगवळणी पडत चालला आहे.



### नेते आणि त्यांचे नातेवाईक यांचाच बोलबाला!

या सा-या राजकीय घडामोडी पाहता असे सारे 'भवती न भवती' चे राजकारणाचे रंग दिसले असताना मतदारांमध्ये फारसा मतदानाबद्दल उत्साह दिसत नाही. राजकीय धुळवडीत प्रस्थापीत नेते आणि त्यांचे नातेवाईक यांचाच बोलबाला असल्याचे महत्वाचे निरिक्षण यामागे असल्याचे सांगण्यात येते. महत्वाचे म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षात सर्वच इच्छुकांचे समाधान झाल्याचे पहायला मिळाले नाही, त्यामुळे बंडखोरांची तसेच अपक्षांची संख्याही जास्त असल्याचे पहायला मिळाले. तसेच या मोठ्या संख्येने मैदानात उतरलेल्यांना मग 'साम दाम दंड भेद' निती वापरून बाजुला करण्याचे 'कोटीच्या कोटी उड्डाणे' घेणारे हथकंडे देखील यावेळचे वैशिष्ट्य म्हणायला हवे. त्यानंतरही मतदारांना अमिषे दाखविण्यापासून त्यांची नावेच गायब करण्यापर्यंतचे प्रकार यावेळेलाही होताना दिसत आहेत. त्यावरुन खरच ही निवडणूक आहे की,लोकशाहीची 'अडवणूक किंवा फसवणूक' आहे असा प्रश्न निर्माण होतो. मात्र 'तोंड दाबून गुद्याचा मार' म्हणायचे तसे माध्यमांतून फारसे काही झिरपताना दिसत नाही. कारण त्यांना पाच वर्षातून एकदाच मिळणारा पानभर जाहिरातींचा बिझनेस हवा असतो. त्यासाठी डोळ्यांना पट्टी कानात बोळे ही प्राथमिकता असते म्हणे! असो.

### राजकारण आहे की लोकशाहीला लागलेले गजकरण

त्यामुळे हे राजकारण आहे की लोकशाहीला झालेले गजकरण आहे असा 'रोकडा' किंवा 'कोरडा' सवाल कुणी विचारत नाहीत. महाराष्ट्रात चार वर्ष उशीराने का होईना अडवून ठेवलेल्या निवडणूका पार पडल्या. लोकशाहीचा खाका तयार झाला त्यात प्राण आहे की नाही हा प्रश्न व्यक्तीसापेक्ष वेगळे उत्तर देणारा आहे. प्रशासकीय राजला चाप बसला, कसे का असेना लोकांच्या हाती स्थानिक राजकारणाचा, गावगाडा हाकण्याचा अधिकार आला इतकेच समाधान मानायचे तसे सारे काही छानच आहे, नाही का? सुरूवातीला म्हटले तसे निवडणूक आयोगाने या साचून राहिलेल्या लोकशक्तीच्या प्रक्रियेला एकामागोमाग ज्या प्रकारे कार्यान्वित केले त्यासाठी त्यांनाही धन्यवाद द्यायला हवे! मग हे सारे न्यायालयांच्या निर्णयाला आधीन राहून पार पडले असे ना का? लोकशाहीचा पोपट मेला नाही तो जिवंत आहे,हे ही नसे थोडके!

**किशोर आपटे**

# मुंबईचा महासंग्राम: 'मराठी अस्मिता' की 'विकासाचा अजेंडा'



आज बृहन्मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान पार पडत आहे. भारताची आर्थिक राजधानी आणि आशियातील सर्वात श्रीमंत नागरी संस्था म्हणून ओळखली जाते. रुपये ७४,४१५ कोटी एवढी अवाढव्य अर्थसंकल्प असणारी महानगरपालिका असून केवळ शहराचे व्यवस्थापन करत नाही, तर ती राज्याच्या सत्तेचा कणा मानली जाते. ही निवडणूक भाजप, शिवसेना शिंदे यांच्या साठी महत्त्वाची ठरणार असून शिवसेना उद्धव, मनसे या पक्षांसाठी तर त्याच्या अस्तित्वासाठी लढाई आहे.

२००२ ते २०१७ पर्यंतच्या प्रवासात अविभाजित शिवसेनेने मुंबईवर आपले निर्विवाद वर्चस्व राखले होते. २०१७ मध्ये भाजप आणि शिवसेना सत्तेत एकत्र असूनही मुंबईत स्वबळावर लढले. त्या निवडणुकीत शिवसेनेला ८४, तर भाजपला ८२ जागा मिळाल्या. भाजपने शिवसेनेला दिलेली ही कडवी झुंज मुंबईच्या राजकारणातील शक्तीबदलाची नांदी होती. मात्र, आज परिस्थिती पूर्णपणे भिन्न आहे. शिवसेना आता उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे अशा दोन गटांत विभागली गेली आहे.

गेल्या सात वर्षांत भाजपने मुंबईत सूक्ष्म स्तरावर आपली संघटनात्मक बांधणी केली आहे. ज्या प्रभागांमध्ये २०१७ मध्ये भाजपचा निसटता पराभव झाला होता, तिथे आता भाजपने आपली पकड मजबूत केली आहे. दुसरीकडे, अप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यावर असलेली पकड मुंबईत तितकीशी प्रभावी दिसत नाही. परिणामी, भाजप आता कोणत्याही परिस्थितीत शिवसेनेच्या (शिंदे गट) आग्रहाखातर आपल्या हक्काच्या जागा सोडण्यास तयार नाही त्यामुळे येथे भाजप शिवसेना शिंदे पेक्षा अधिक लढत आहे.

निवडणुकीच्या तोंडावर 'मराठी अस्मिते'च्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची चर्चा आहे. मात्र,या युतीसमोर मोठी आव्हाने आहेत. २०१७ मध्ये शिवसेना एकसंध होती, तरीही त्यांना २८.३% मते मिळाली होती. आता शिंदेंच्या बंडामुळे ही मते विभागली गेली आहेत. विधानसभा निवडणुकीत शिवसेना ला अवघ्या १० जागा मिळाल्या, तर मनसेला खातेही उघडता आले नाही. अगदी मोहीम सारख्या बालेकिल्ल्यातही ठाकरे ब्रँडची जादू चालली नाही.

भाषिक ध्रुवीकरण: ठाकरे बंधू एकत्र आल्यास हिंदी भाषिक आणि दक्षिण भारतीय मतदार पूर्णपणे भाजपच्या बाजूने कौल देण्याची शक्यता अधिक आहे. 'मराठी माणूस' आणि 'मुंबईवर घाला' हे शब्दप्रयोग आता मतदारांवर पूर्वीइतकी मोहिनी घालू शकतील का, हा मोठा प्रश्न आहे.गेल्या तीन दशकांपासून पालिकेत सत्ता असूनही मराठी शाळांची दुरवस्था का झाली? मराठी माणूस मुंबईबाहेर का फेकला गेला? या प्रश्नांची उत्तरे शिवसेनेला उबाठा देताना कसरत करावी लागेल. याउलट, भाजप आणि शिंदे युतीकडे कोस्टल रोड, अटल सेतू, मेट्रोचे जाळे आणि रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण यांसारखी ठोस विकासकामे दाखवण्यासाठी आहेत.

महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष असलेला कॉंग्रेस यावेळी वेगळी वाट चोखाळण्याची शक्यता आहे. कॉंग्रेस स्वबळावर लढल्यास अल्पसंख्याक मतांचे विभाजन होईल. ही मते कॉंग्रेस, समाजवादी पक्ष आणि एमआयएम यांच्यात विभागली गेल्याचा थेट फटका ठाकरे गटाला बसू शकतो.

मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेचा मार्ग यावेळी 'भावनिक अस्मिता' पेक्षा 'केलेल्या कामाचा हिशोब' यातून जाणार असे दिसते. भाजपने आपला विकासाचा अजेंडा सेट केला आहे, तर ठाकरे गटासमोर आपली उरलीसुरली व्होट बँक वाचवण्याचे आव्हान आहे. सध्याची परिस्थिती पाहता, महायुतीचे (भाजप-शिवसेना शिंदे गट) पारडे नक्कीच जड वाटत असले तरी, मुंबईचा मतदार कोणाच्या पारड्यात आपले वजन टाकतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**अविनाश देशपांडे**

## संवाद

### एका मताची किंमत

लोकशाहीत एका मताची किंमत मोठी आहे. घटनेने नागरिकांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे. त्याचा वापर नागरिकांनी करणे हे कर्तव्य आहे. आज महाराष्ट्रात २९ महानगर पालिकेचे मतदान आहे. या मतदानात आपण सर्वजण शंभर टक्के मतदान करण्याची प्रतिज्ञा करूया. एका मताची किंमत सुद्धा मोठी आहे. १७ एप्रिल १९९९ चा तो दिवस लोकसभेत त्या वेळचे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या विरुद्ध अविश्वासाचा ठराव आणला होता. त्यावेळी वाजपेयींचे सरकार केवळ एका मताने पराभूत झाले. २००४ च्या विधानसभेच्या निवडणुकात कर्नाटकमध्ये हे जनता दलाचे उमेदवार ए आर कृष्णमूर्ती केवळ एका मताने पराभूत झाले त्यांना ४०७५१ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्षाचे ध्रुव नारायण यांना ४०७५२ एवढी मते मळली. कृष्णमूर्तींच्या ड्रायव्हरने मतदान केले नव्हते त्याने मतदान केले असते तर निकाल वेगळा लागला असता. २००८ मध्ये राजस्थानात कॉंग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री पदाचे एक स्पर्धक सी पी जोशी हे विधानसभेच्या निवडणुकीत केवळ एका मताने पराभूत झाले. त्यांना ६२२१५ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी भारतीय जनता पक्षाचे कल्याण सिंग यांना ६२२१६ मते मिळाली सी पी जोशी यांच्या आई, पत्नी व ड्रॉयव्हरने मतदान केले नव्हते त्यांनी जर मतदान केले असते तर सी पी जोशीं निवडून आले असते व कदाचित राजस्थानचे मुख्यमंत्री सुद्धा झाले असते. १९२३ मध्ये अडाल्फ हिटलरने केवळ एका मतांनी नाझी पक्षाचे अध्यक्ष मिळवले होते. १८६८ मध्ये अमेरिकेत अँड्रू जॅनसन यांनी एका मताने विजयी होत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षपद मिळविले होते अशी काही उदाहरणे निवडणुकीत एका मताने विजयी झाल्याची आहेत.तेव्हा हे लक्षात येईल कि एका मताची किंमत मोठी आहे तर आपणही मतदान शंभर टक्के करूया.

**शांताराम वाघ**

### सोमनाथ स्वाभिमान पर्व : सनातन संस्कृतीचा गौरव!


नुकतेच गुजरातमधील सोमनाथ येथे 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा'चे भव्य आयोजन करण्यात आले. इ.स. १०२६ मध्ये सोमनाथ मंदिरावर झालेले पहिले आक्रमण आणि त्या घटनेला पूर्ण झालेली एक हजार वर्षे, या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने प्रत्येक हिंदूचे मन श्री सोमनाथाविषयी कृतज्ञतेने आणि अभिमानाने भरून आले.सोमनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक अत्यंत पवित्र तीर्थस्थान आहे. येथे साक्षात भगवान शिवाचा वास आहे. गेल्या एक हजार वर्षांत या मंदिरावर अनेक परकीय आक्रमणे झाली; परंतु प्रत्येक वेळी उद्ध्वस्त झाल्यानंतरही हे मंदिर पुन्हा नव्या तेजाने, नव्या डौलाने उभे राहिले. आज औरंगजेब किंवा महमूद गझनी प्रत्यक्षात नसले, तरी त्यांनी पेरलेले हिंदूद्वेषाचे विष अजूनही समाजात खोलवर भिनलेले आहे. पाकिस्तान, बांगलादेशसारख्या इस्लामी देशांमध्ये हिंदू मंदिरांवरील आक्रमणे, देवतांच्या मूर्तींची तोडफोड, लव्ह जिहाद करून आया-बहिणींची अब्रू लुटणे, बलपूर्वक धर्मांतर आणि धर्म विचारून हिंदूंची हत्या, ही सर्व कृत्ये त्याच द्वेषपूर्ण मानसिकतेची उदाहरणे आहेत.अशा परिस्थितीत हिंदू समाजाची अस्मिता जागृत राहावी, यासाठी 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा'सारखे कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतात. या पर्वाच्या माध्यमातून भारताच्या संघर्षमय आणि गौरवशाली इतिहासाची जाणीव जनमानसात निर्माण झाली. समाजात द्वेष पसरवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश नव्हता; तर सत्याची जाणीव करून देणे आणि इतिहासाकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी निर्माण करणे, हाच त्यामागील हेतू होता.

**प्रिया बागडदेव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# • वेचक


## महागाव शहराच्या विकासासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करणार : माजी आ. राजेंद्र नजरधने



महागाव - महागाव नगरपंचायतीच्या वतीने मकर संक्रांत या दिवसाच्या औचित्य साधून प्रभाग क्रमांक १४ मध्ये सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.


या विकासकामाच्या भूमिपूजन प्रसंगी माजी आमदार राजूभाऊ नजरधने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी बोलताना त्यांनी अत्यंत स्पष्ट व ठाम शब्दांत सांगितले की, "मी कोणत्याही पक्षात असो वा नसो, माजी आमदार या नात्याने माझा प्रशासकीय अनुभव वापरून महागाव शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही व सर्वतोपरी शासन स्तरावर प्रत्येक विकास कामासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. महागाव नगरपंचायतीच्या माध्यमातून शहराचा चेहरा-मोहरा बदलून दाखवू," असा विश्वास त्यांनी उपस्थित नागरिकांना दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे महागावच्या विकासाबाबत नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. या कार्यक्रमास महागाव शहराचे सहकार महर्षी श्री. संभाजीराव नरवाडे, नगराध्यक्षा सौ सुनंदाताई कोपरकर, विश्वनाथ कदम, रावसाहेब पाटील नरवाडे, शैलेश कोपरकर, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते नितीन पाटील नरवाडे, गजानन पाटील यांचीही उपस्थिती लाभली.

## नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात प्रशासनाची तपासणी मोहीम



पांढरकवडा - नायलॉन मांजाची विक्री होऊ नये, यासाठी पतंग व स्टेशनरी दुकानदारांची नगर परिषद व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे तपासणी केली. या पडताळणीदरम्यान शहरातील विविध दुकानांची पाहणी करण्यात आली; मात्र कोणत्याही दुकानात नायलॉन मांजा आढळून आला नाही. प्रशासनाकडून स्पष्ट सूचना देण्यात आल्या असून, भविष्यात कोणत्याही दुकानात नायलॉन मांजाची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास, शहरी भागात नगर परिषद व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना, तर ग्रामीण भागात ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांना तात्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने त्याचा वापर व विक्री पूर्णतः बंद करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अतिक्रमण न हटविल्यामुळे पंचायत समितीच्या आवारात आमरण उपोषण सुरु



दिग्रस - तालुक्यातील साखरा गावातील ग्रामस्थांना अतिक्रमण हटविण्याबाबत आठ दिवसांत अतिक्रमण बाबत नोटिस देऊन अतीक्रमन हटविण्याची कार्यवाही करण्यात येईल अशा स्वरूपाचे पत्र सचिव ग्राम पंचायत साखरा यांनी ११ डिसेंबर २०२५ रोजी दिले होते. त्या सचिवांच्या पत्रावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे परत साखरा गावातील ग्रामस्थांनी दिनांक 12 जानेवारी 2026 पासून बेमुदत आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तो पर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही असा निर्धार साखरा गावातील ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या आवारात आमरण उपोषण मांडून शासनास वेठीस धरले आहे तर या वेळेस उपोषण स्थळी ठाणेदार वैजनाथ मुंडे यांनी भेट देवुन उपोषण कर्त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या आहे.

## यवतमाळमध्ये रंगणार सहावे महावीर प्रीमियर लीग सीझन

यवतमाळ : श्री महावीर युवक मंडळ, यवतमाळ यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महावीर प्रीमियर लीग सीझन ६, या भव्य क्रिकेट स्पर्धेला दिनांक 15 जानेवारी ते 18 जानेवारी 2026 दरम्यान तळेगाव भारी ग्राउंड, यवतमाळ येथे रंगतदार प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता होणार असून उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, लोकमत समूहाचे जिल्हाप्रमुख किशोरजी दर्डा, जैनसेवा समितीचे अध्यक्ष महावीरजी भन्साली, तसेच यवतमाळ जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संजयजी सिसोदिया श्री संदिपजी तातेड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या स्पर्धेत रॉयल किंग्स, लोढा लॉयन्स, आर.के. चॅलेंजर्स, गुरुदेव अव्हेंजर्स, परंपरा जेम्स, यश इन्व्हेस्टमेंट आणि जम्मू या बलाढ्य संघांचा सहभाग असणार आहे. प्रत्येक सामना चुरशीचा ठरणार असून प्रेक्षकांसाठी हा एक पर्वणीचा सोहळा ठरणार आहे. स्पर्धेत विजेत्या संघास प्रथम पुरस्कार विनायकी दर्डा स्कूल यांच्या वतीने तर द्वितीय पुरस्कार जैन सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहे. यासोबतच प्रत्येक सामन्यात 'मॅन ऑफ द मॅच' आणि संपूर्ण स्पर्धेसाठी बेस्ट बॅट्समन व बेस्ट बॉलर व 'मॅन ऑफ द सिरीज' असे आकर्षक पुरस्कार ठेवण्यात आले आहेत.

# महागावात रेती तस्करांचे तांडव; पैनगंगेचे पात्र पोकलँडने ओरबडले!

## तहसीलदारांचा 'आशीर्वाद' आणि खनिकर्म विभागाचे दुर्लक्ष, नियम धाब्यावर बसवून शेकडो ट्रकची अवैध वाहतूक

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील पैनगंगा नदीपात्र सध्या रेती तस्करांच्या विळख्यात सापडले आहे. तालुक्यातील भोसा आणि थार (खुर्द) या दोन रेती घाटांचा लिलाव झाला असला तरी, प्रशासकीय नियमांची पायमल्ली करत या ठिकाणी रेतीचा महापूर ओरबडून वाहत आहे. विशेष म्हणजे, महसूल प्रशासन आणि पोलीस विभागाच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे नदीपात्राचे अस्तित्व धोक्यात आले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शासकीय नियमानुसार रेतीघाटावरून रेतीचा उपसा करताना पर्यावरणाचे रक्षण आणि मर्यादित उपसा होणे अपेक्षित असते. मात्र, भोसा आणि थार घाटावर चित्र पूर्णतः उलट आहे. लिलाव झाला केवळ नावापुरता, पण प्रत्यक्षात संपूर्ण नदीपात्रावर तस्करांनी ताबा मिळवला आहे. या घाटांवर चक्क पोकलँड मशीन उतरवण्यात आल्या असून, दिवस-रात्र नदीचे काळीज पोखरले जात आहे. नियमानुसार ठराविक फुटांपर्यंतच उपसा करण्याची अट असताना, तस्करांनी पात्रात खोल खड्डे करून निसर्गाचा समतोल बिघडवला आहे.

संवेदनशील रेती घाटावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आणि त्याचा दैनंदिन अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, महागाव तहसील कार्यालयाने या अटीची पूर्तता करण्याकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवल्याचे दिसते. सीसीटीव्ही नसल्याचा फायदा घेत तस्कर दररोज ४०० ते ५०० ट्रक, टिप्पर आणि हायवा गाड्यांमधून रेतीची विल्हेवाट लावत आहेत. तहसीलदारांच्या या 'उदार' धोरणामुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. सध्या शेजारील वाशिम आणि परभणी जिल्ह्यांत रेतीची मोठी मागणी आहे. या संधीचा फायदा घेण्यासाठी तस्करांनी वर्षभराचा कोटा अवघ्या काही दिवसांतच संपवण्याचा सपाटा लावला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, उच्च प्रतीची रेती मिळवण्यासाठी चक्क नदीपात्रातच मोठ्या चाळण्या बसवण्यात आल्या आहेत. रेती गाळून ती महागड्या दराने परजिल्ह्यात पाठवली जात आहे. खनिकर्म अधिकारी संजय जोशी हे या गंभीर प्रकाराकडे डोळेझाक करत असून, ते केवळ 'उंटावरून शेळ्या हाकण्याचे' काम करत असल्याची टीका नागरिकांमधून होत आहे. महागाव तालुक्यातील रेती तस्करी केवळ प्रशासकीय भ्रष्टाचार नाही, तर तो एक संघटित गुन्हेगारीचा भाग बनला आहे. काही दिवसांपूर्वी रेती तस्करीतून गोळीबाराची घटना घडली होती. त्यानंतर पोलिसांनी कडक पावले उचलण्याऐवजी 'हात वर' केले आहेत.

वाहतूक पोलिसांपासून ते स्थानिक प्रशासनापर्यंत सर्वांनाच 'हप्तेखोरी'च्या जाळ्यात ओढण्यात आले आहे. रेती व्यवसायात एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याचा आणि स्थानिक गुंडांचा मोठा हस्तक्षेप आहे. त्यांच्या धाकामुळे सामान्य नागरिक किंवा प्रामाणिक अधिकारी तक्रार करण्यास धजावत नाहीत. नदीपात्राची झालेली ही दुरवस्था पाहता, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप करावा, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. आतापर्यंत नेमका किती उपसा झाला, हे शोधण्यासाठी ईटीएस (Electronic Total Station) मोजणी करण्याची तातडीची गरज आहे. जर ही मोजणी झाली, तर लिलावाच्या मर्यादेपेक्षा कितीतरी पट अधिक रेती चोरली गेल्याचे सत्य समोर येईल.

### मुख्य प्रश्न

लिलावाच्या अटींचे उल्लंघन होत असताना तहसीलदार कारवाई का करत नाहीत? पोकलँड मशीनला नदीपात्रात प्रवेश मिळतोच कसा? गोळीबाराच्या घटनेनंतरही पोलीस यंत्रणा सुस्त का? महागाव तालुक्यातील या वाळू माफियांच्या साम्राज्याला जिल्हाधिकारी लगाम घालणार का? की पैनगंगेचे पात्र असेच ओरबडले जाणार? याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


## १६ जानेवारी पासून रोटरी महोत्सवाचे आयोजन

यवतमाळ - दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रोटरी क्लब ऑफ यवतमाळ व रोटरी सेवा ट्रस्ट द्वारा भव्य "रोटरी महोत्सवाचे" आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक समता मैदान (पोस्टर ग्राउंड) येथे शुक्रवार दि. १६ ते सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत आयोजित केलेल्या या महोत्सवामध्ये २५० पेक्षा अधिक स्टॉल्स राहणार आहे. यामध्ये प्रामुख्याने वित्तीय संस्था, इमिटेशन ज्वेलरी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फॅन्सी ड्रेस व ड्रेस मटेरियल, इंटेरियर डेकोरेशन, कॉस्मेटिक्स, नामांकित कंपन्यांची दुचाकी व चारचाकी वाहने शैक्षणिक संस्था व अनेक नामांकित कंपन्यांचे स्टॉल्स या महोत्सवामध्ये असणार आहे. यासोबतच यवतमाळकर खवय्यांसाठी लज्जतदार व्यंजनांचेही ७५ पेक्षा अधिक स्टॉल्स या महोत्सवात राहणार आहे. सायंकाळी ५ ते १० या वेळात यवतमाळकरांनी सहकुटुंब महोत्सवाला भेट देऊन महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ यवतमाळचे अध्यक्ष डॉ. आशिष गवरशेट्टीवार, प्रकल्प अधिकारी एडवोकेट प्रवीण हर्षे, डॉ. आनंद भंडारी, सचिव मोहनसिंग शेर, तुषार पद्मावार यांनी केले आहे.

## बालाजी मंदिर परिसरातील नझुल जागेत विनापरवानगी केलेल्या बांधकामावर कारवाई करा

### मुख्याधिकारी यांच्याकडून कारवाई न झाल्यास तक्रारकर्त्यांचा उपोषणाचा इशारा!

जनमाध्यम प्रतिनिधी




पुसद - येथील अर्जदार तथा तक्रारकर्ते मनोज टिकाराम चंदन रा.लोहार लाईन पुसद यांनी पुसद नगर परिषद अंतर्गत येत असलेल्या बालाजी मंदिर परिसरातील नझुल जागेत विनापरवाना दोन मजली दुकान गाळे इमारतीचे बांधकाम करणाऱ्या बांधकाम धारका विरुद्ध कारवाई न झाल्यामुळे जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालय परिसरात बेमुदत उपोषणास बसत असल्या बाबत निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

सदर निवेदनात म्हटले आहे की, पुसद शहरातील बालाजी मंदिर संस्थानला लागून तसेच नझुल मध्ये असलेल्या जागेत व मुख्य रस्त्याला लागून दक्षिण भागात डॉ. सुनील जोशी व त्यांचे सुपुत्र सागर जोशी यांनी पुसद नगरपरिषदची कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी किंवा परवानगी करीता आवश्यक कागदपत्र नगरपरिषद प्रशासनाकडे दाखल न करता विनापरवाना अवैधरित्या नगररचना अधिनियम 1966 च्या नियम व कायद्याचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आहे. सदर केलेले अवैध बांधकाम धारक डॉ. सुनील जोशी व त्यांचे सुपुत्र सागर जोशी हे कारवाईस पात्र आहे त्यामुळे नगर रचना कायद्याने त्यांचे विरुद्ध फौजदारी कारवाई करून त्यांनी केलेले अवैध बांधकाम तात्काळ पाडण्यात यावे अन्यथा नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध लोकशाही मार्गाने उपोषणास बसावे लागेल अशा प्रकारची तक्रार दि.21/08/2025 रोजी दाखल केली होती. सदर तक्रारीवर नगर प्रशासनाने दिनांक 16/09/2025 व 27/10/2025 रोजी पत्र देऊन परवाना व कागदपत्रे दाखल करण्यासाठी संबंधित बांधकाम धारकांना कळविले होते परंतु त्यांनी कोणतेही कागदपत्र अद्याप पर्यंत दाखल केले नाही व त्याची पूर्तता केली नाही. त्यामुळे ते कारवाईस पात्र आहेत हे सिद्ध होते. परंतु नगर प्रशासन कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे सदर तक्रार कर्ते व अर्जदार यांनी अवैध बांधकाम व बांधकाम धारकावर कारवाई होण्यासाठी दिनांक 22 जानेवारी 2025 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे त्यामुळे सदर बांधकाम धारक व बांधकामावर नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडून कोणत्या प्रकारे कारवाई केल्या जाते याकडे तक्रारकर्ते यांचे लक्ष लागले आहे..

आरोग्यदायी सवयी आणि शाश्वत विकास या तिन्हींचा समन्वय साधणारे : प्रशांत पाटील

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान वर्तनात्मक बदल

जनमाध्यम प्रतिनिधी



आर्णी : "संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान हे केवळ कचरा व्यवस्थापनापुरते मर्यादित नसून वर्तनात्मक बदल, आरोग्यदायी सवयी आणि शाश्वत विकास या तिन्हींचा समन्वय साधणारे अभियान आहे. अंबोडा ग्रामपंचायतीने स्वच्छतेसाठी चांगले प्रयत्न केलेले दिसून येतात. पुढील काळातही सातत्यपूर्णता आणि ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग गाव विकासास अधिक गती देईल," असे असे प्रतिपादन विस्तार अधिकारी (आरोग्य) प्रशांत पाटील यांनी केले.

आर्णी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत अंबोडा येथे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणी पथकाने आज भेट देऊन विविध उपक्रमांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. तपासणीदरम्यान गावातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, शौचालयांची उपलब्धता, आरोग्यविषयक जनजागृती, वृक्षारोपण तसेच ग्रामस्थांचा सहभाग आदी घटकांचा बारकाईने आढावा घेण्यात आला. तपासणी पथकाने प्रथम ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन दस्तऐवजांची पाहणी केली. त्यानंतर पथकाने गावातील प्रमुख ठिकाणे, सार्वजनिक शौचालये, अंगणवाडी केंद्र, शाळा परिसर, नाला स्वच्छता उपक्रम आणि कचरा वर्गीकरण पद्धतीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. ग्रामस्थ, स्वच्छता कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्थांसोबतही संवाद साधून उपक्रमांची माहिती घेतली. या प्रसंगी तपासणी पथकामध्ये विस्तार अधिकारी (आरोग्य) प्रशांत पाटील, स्वच्छ भारत मिशनचे जिल्हा समन्वयक भाऊसाहेब चव्हाण, पंचायत समिती आर्णीचे विस्तार अधिकारी (पंचायत) गोविंद झोले, स्वच्छ भारत मिशन आर्णीचे एस. एस. जाधव मॅडम सहभागी होते. तर तपासणी दरम्यान ग्रामपंचायतच्या सरपंचा सौ. वर्षाताई बाबाराव आडे, उपसरपंचा सौ. चंचलताई ज्ञानेश्वर पावडे, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठोंबरे, मुख्याध्यापक अंकुश मोरे, पैनगंगा प्रोड्युसर कंपनी व दाल मिलचे संचालक माधव राऊत, प्रतिष्ठित नागरिक बाबाराव आडे, ग्रामपंचायत कर्मचारी व जलसुरक्षक ज्ञानेश्वर जाधव, केंद्र चालक दिनेश पाटील, ग्राम रोजगार सहाय्यक कैलास राठोड, अंगणवाडी सेविका लताताई पाटील, आयसीआरपी रुक्मिणताई जाधव, युवक मंडळाचे दशरथ नरहरी, ज्ञानेश्वर जाधव, रमेश चव्हाण, कुणाल राठोड उपस्थित होते. पथकातील अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांचा सहभाग आणि स्वच्छतेबाबतची जनजागृती ही मोहिम यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. ग्रामपंचायत अंबोडा यांनी तपासणी पथकाचे स्वागत करून अभियानाच्या पार्श्वभूमीवर राबविलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती सादर केली. गावात दररोज स्वच्छता मोहीम, ओला-सुका कचऱ्याचे विभाजन, विषमुक्त परिसर अभियान, प्लास्टिकविरहित गाव उपक्रम आणि शाळांमधील स्वच्छता जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आली.

## मनरेगा बचाव संग्राम : गरीबांचा रोजगार हिरावण्याचा केंद्राचा डाव काँग्रेस हाणून पाडणार : माणिकराव ठाकरे

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - ग्रामीण भारतातील गरीब, शेतमजूर व कष्टकरी जनतेच्या रोजगारावर गदा आणण्याचा केंद्र सरकारचा कट काँग्रेस कदापि यशस्वी होऊ देणार नाही, असा ठाम इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रभारी (गोवा, दीव, दमण व दादरा नगर हवेली) मा. माणिकराव ठाकरे यांनी दिला. मनरेगा योजना कमकुवत करून ती बंद करण्याचा डाव भाजप सरकार रचत असून, त्याच्या विरोधात काँग्रेसतर्फे 'मनरेगा बचाव संग्राम' अंतर्गत राज्यव्यापी व देशव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

दि. १४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता दर्डा नगर, यवतमाळ येथील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल्ल मानकर, अनिल गायकवाड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाकरे म्हणाले की, १९७२ च्या दुष्काळात शेतमजुरांना काम नसताना तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजनेची मुहूर्तमेढ रोवली. पुढे डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात काँग्रेस सरकार असताना मनरेगा कायद्याद्वारे रोजगाराचा कायदेशीर अधिकार देशातील नागरिकांना मिळाला. महात्मा गांधी यांच्या नावाने सुरू झालेली ही योजना आजही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे.मात्र सध्याचे केंद्र सरकार मोठ्या उद्योगपतींच्या हितासाठी काम करत असून, गरिबांच्या हातातील शेवटचा आधार असलेली मनरेगा योजना निधी कपात, कामे बंद आणि मजुरी विलंबाद्वारे हळूहळू संपवण्याचा प्रयत्न करत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला. हा थेट गरीबविरोधी आणि संविधानविरोधी डाव असल्याचे सांगत त्यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली. या अन्यायाविरोधात काँग्रेस पक्ष जिल्हा, तालुका व गावपातळीवर तीव्र आंदोलन उभारणार असून, गरीब, शेतमजूर आणि कष्टकरी जनतेच्या हक्कासाठीचा हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असे ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. "मनरेगा वाचवणे म्हणजे ग्रामीण भारत वाचवणे आहे," असे स्पष्ट करत काँग्रेसचा संघर्ष थांबणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## यवतमाळ हॉकर्स असोसिएशनचा उद्घाटन सोहळा उत्साहात

### नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके "हॉकर्स हे शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा"

जनमाध्यम प्रतिनिधी





यवतमाळ : यवतमाळ हॉकर्स असोसिएशनच्या भव्य उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी बोलताना त्यांनी शहराच्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेत हॉकर्सचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. "हॉकर्स हे शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नगरपरिषद सकारात्मक भूमिका घेईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

हॉकर्सच्या प्रश्नांवर लवकरच महत्वाचे निर्णय घेण्यात येतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. सुरज खोब्रागडे यांच्या संयोजनात आयोजित या कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे (अवधूतवाडी), पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर देवकते (वाहतूक शाखा), समता पर्व प्रतिष्ठानचे अंकुश वाकडे, फ्रूट मंडी अध्यक्ष आरिफ खान, भाजी मंडी अध्यक्ष महेश मुरब, माजी अध्यक्ष गजानन बरे, नवनिर्वाचित नगरसेवक ॲड.आनंद गायकवाड यांच्यासह पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर देवकते यांनी नियमांचे पालन केल्यास शहरातील व्यवस्था सुरळीत राहते, असे सांगितले. ॲड. आनंद गायकवाड यांनी नगरपरिषदेत हॉकर्स समिती स्थापन करून त्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचे आश्वासन दिले. प्रा. अंकुश वाकडे यांनी आपल्या अनुभवातून हॉकर्स समाजातील संघर्ष आणि जिद्दीवर प्रकाश टाकला. संयोजक सुरज खोब्रागडे यांनी हॉकर्स समाजाला नवी ओळख देण्यासाठी असोसिएशन सातत्याने कार्यरत राहील, असे नमूद केले. हा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला असून, हॉकर्स समाजात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## ढाणकी नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षपदी दत्तदिगंबर वानखेडे; नगराध्यक्षांच्या 'कास्टिंग वोट'ने ठरला विजय

जनमाध्यम प्रतिनिधी




ढाणकी - येथील नगरपंचायतीच्या पहिल्या ऐतिहासिक सर्वसाधारण सभेत राजकीय घडामोडींना वेग आला असून, उपनगराध्यक्षपदी शहर विकास आघाडीचे दत्तदिगंबर वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत नगराध्यक्षांनी आपल्या 'निर्णायक मताचा' वापर केल्याने वानखेडे यांचा विजय सुकर झाला.

मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या उपस्थितीत आणि नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. उपनगराध्यक्षपदासाठी शहर विकास आघाडीकडून दत्तदिगंबर वानखेडे आणि भाजपकडून उमेश योगेवार यांनी अर्ज दाखल केले होते. मतदानादरम्यान दोन्ही उमेदवारांना प्रत्येकी ९-९ मते पडल्याने सभागृहात पेच निर्माण झाला. यावेळी नगराध्यक्षा अर्चना वासमवार यांनी सदस्य म्हणून मतदान केल्यानंतर, मते समसमान झाल्याने आपले 'निर्णायक मत' वानखेडे यांना दिले आणि त्यांची निवड जाहीर केली. नगराध्यक्षांच्या दुहेरी मतदानावर भाजप नगरसेवकांनी आक्षेप घेतला. मात्र, मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी २६ डिसेंबरच्या सरकारी अध्यादेशाचे वाचन करून स्पष्ट केले की, नगराध्यक्षांना सदस्य म्हणून मतदान करण्याचा आणि समसमान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा कायदेशीर अधिकार आहे. या स्पष्टीकरणानंतर वानखेडे यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले. उपनगराध्यक्ष निवडीसोबतच रिक्त असलेल्या दोन स्वीकृत नगरसेवक पदांची प्रक्रियाही पूर्ण झाली. यामध्ये भाजपकडून रोहित वर्मा आणि शिवसेना (शिंदे गट) शहराध्यक्ष संजय सालेवाड यांची नियुक्ती करण्यात आली. या दोन्ही नेत्यांचे अर्ज वैध ठरल्याने त्यांची निवड झाल्याची घोषणा प्रशासनाकडून करण्यात आली. यावेळी नगरपंचायतीचे सर्व नवनिर्वाचित सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर पुरस्काराने डॉ. एम.आर. मेघावत सन्मानित

जनमाध्यम प्रतिनिधी




पुसद - मुकनाथ बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरादेवी येथे पुसद येथील प्रसिध्द डॉ. एम. आर. मेघावत यांना राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर प्रेरणा विशेष सन्मान 2026 या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आरोग्य क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. संपूर्ण देशातुन 15 राज्यातुन या पुरस्कार सोहळ्याकरीता अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाला बंजारा समाजातील अनेक मान्यवर संत, महंत मंडळी उपस्थित होते. डॉ.एम.आर. मेघावत यांना महंत श्री.जितेंद्र महाराज पोहरादेवी, महंत श्री. सुनिल महाराज, महंत श्री शेखर महाराज, महंत श्री. भक्तराज बाबुसिंग महाराज व महंत यशवंत महाराज, मध्यप्रदेशचे मा.श्री. बाबुलालजी बंजारा (कॅबिनेट मंत्री दर्जा) इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. एम.आर. मेघावत यांना हा पुरस्कार देण्यात आला. या अगोदर डॉ.एम.आर. मेघावत यांना वेगवेगळ्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. एम. आर. मेघावत यांनी अनेक ठिकाणी रोगनिदान शिबीर घेऊन अनेक रुग्णांना योग्य उपचार दिले आहे. राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर पुरस्कार विशेष सन्मान 2026 हा पुरस्कार डॉ. मेघावत यांना मिळाल्यामुळे समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## मकरसंक्रांतीनिमित्त नायलॉन मांजाविरोधात जनजागृती उपक्रम

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा : मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमिवर नायलॉन मांजामुळे होणाऱ्या पर्यावरणीय व मानवी हानीबाबत जनजागृती करण्यासाठी नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था तसेच वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कार्यालय, पांढरकवडा येथे जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात नायलॉन मांजामुळे गंभीर जखमी झालेले पक्षी, तुटलेली पंखे, रक्तबंबाळ अवस्था तसेच मानवी अपघातांची वास्तव उदाहरणे मांडण्यात आली. क्षणिक करमणुकीसाठी अनेक निरपराध जीवांचे प्राण जात असल्याची विदारक वस्तुस्थिती यावेळी उपस्थितांच्या लक्षात आणून देण्यात आली. उपक्रमादरम्यान नागरिकांना "नायलॉन मांजाचा वापर टाळा", "पर्यावरण वाचवा, जीव वाचवा" असे प्रभावी संदेश देण्यात आले. नायलॉन मांजा हा पर्यावरण व वन्यजीवांसाठी अत्यंत घातक असून त्याच्या वापरावर शासनाने बंदी घातलेली असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. मकरसंक्रांत साजरी करताना पर्यावरणपूरक कापसाच्या मांजाचा वापर करावा, असे आवाहन उपस्थित नागरिकांना करण्यात आले. या जनजागृती उपक्रमाला नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्षा डॉ. प्रिती तोटावार, वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही. एम. दुबे, भारत पाचाडे, सुनिता पाटील, मनोरमा घाटोळे, हिम्मत साबळे, वनरक्षक आर. एस. सोनी, आर. बी. मानकर, पी. डी. दुबे, एस. बी. कोंडे, वनपाल ए. डी. कुडमेथे, एम. ए. मिंदेवार, ऑपरेटर योगेश जाधव, वाहनचालक निखिल आगरकर तसेच वनमजूर अंजना नैताम उपस्थित होत्या.

# अचलपूर बाजार समितीत ५० लाखांचा अपहार

## 'एआर'च्या अहवालात उघड

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर बाजार समितीमध्ये तत्कालीन प्रभारी सचिव आणि लेखापालाने संगनमताने तब्बल ५० लाख ७ हजार ७८६ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे सहकार विभागाच्या सहाय्यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या चौकशीत निष्पन्न झाले. याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यासोबतच त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधकांनी दिले आहेत.

त्यावर बाजार समितीच्या सभापती प्रतिभा ठाकरे यांनी १५ दिवसाची नोटीस दोघांनाही बजावली आहे. कारवाईच्या भीतीपोटी तत्कालीन प्रभारी सचिव अमरदीप वानखडे यांनी कामगार न्यायालयात धाव घेतली होती. बाजार समितीने त्यांना सध्या नोकरीतून कमी करणार नसल्याचे न्यायालयात सांगितले असले, तरी अपहाराची रक्कम भरणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे.दरम्यान जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात या अपहाराची एकच चर्चा होत असून यावर प्रशासनाद्वारे काय कारवाई केल्या जाते याकडे अचलपूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.



### कोणाकडून किती वसुली होणार ?

जिल्हा उपनिबंधकांनी जारी केलेल्या आदेशानुसार अमरदीप वानखडे व ज. ल. गुळदे (संयुक्त): ३७,९१,५०२ रुपये, अमरदीप वानखडे (वैयक्तिक): १०,०४,१८४ रुपये (घरबांधणी अग्रिम व बाजार फी तफावत). ज. ल. गुळदे (वैयक्तिक): २,१२,१०३ रुपये (व्हाउचर व सेस वसुली तफावत). एकूण वसुली पात्र रक्कमः५०,०७,७८६ रुपये.

■ प्रकरणाच्या चौकशी अहवालात नमूद केलेली वसुलीची रक्कम १५ दिवसांत जमा करणे अनिवार्य आहे. अन्यथा शिस्तभंग आणि शास्तीची कारवाई होईल.

**प्रतिभा ठाकरे,**
**सभापती, कृउबास**

### काय आहे नेमके प्रकरण?

बाजार समितीच्या सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षाच्या लेखापरीक्षणात अनेक गंभीर बाबी समोर आल्या होत्या. यावर कलम ४० (ब) नुसार करण्यात आलेल्या चौकशीत अमरदीप वानखडे आणि लेखापाल ज. ल. गुळदे यांनी प्रशासकाच्या परस्पर रोख स्वरूपात सेस वसूल केला आणि तो खोट्या व्हाउचरद्वारे खर्च दाखवून हडप केल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, प्रशासकाच्या खोट्या सह्या करून हा निधी खर्चात टाकण्यात आला होता.

## शिवसेना पदाधिकारी सुधिर देशमुख यांचे निधन

**अचलपूर-** छोटा बाजार येथील रहिवाशी सुधीर पांडुरंगजी देशमुख यांचा बुधवार १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ५ वा.निधन झाले. ते आपल्या मागे बराच आप्त परिवार सोडून गेले आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यकत होत आहे. त्यांची अंतीम यात्रा ४ वा. त्यांचे निवासस्थान छोटाबाजार येथुन निघाली. त्यांच्या मागे दोन मुले, पत्नी व बराच आप्त परिवार सोडून गेले आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्याप्त आहे.



# शिक्षक पतसंस्था दर्यापुरचा पदग्रहण सोहळा

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर शिक्षक पतसंस्था मर्या. दर्यापूर र. नं ५०२ चा नवनिर्वाचित अध्यक्ष डी. आर. जामनिक, उपाध्यक्ष अशोक बावनेर मानद सचिव प्रशांत गहले, खजिनदार सुनिल स्वर्गीय यांचा पदग्रहण सोहळा शिक्षक पतसंस्थेच्या कार्यालयात नानासाहेब राऊत माजी अध्यक्ष शिक्षक बँक तथा शिक्षक पतसंस्था यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक पतसंस्था ज्यांनी १९८९ मध्ये निर्माण केली असे विनायक होले, शिक्षक पतसंस्थाचे माजी सचिव नारायण गावंडे, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघांचे जेष्ठ मार्गदर्शक पंडितराव देशमुख,माजी खजिनदार पुष्पा ताडे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र कट्यारमल, तसेच शिला आठवले (जामनिक) शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती अंजनगाव, शिक्षक बँकेचे संचालक संजय नागे,. तसेच माजी संचालक मधुभाऊ चव्हाण शिक्षक संघांचे तालुका अध्यक्ष सतिश वानखडे, कार्याध्यक्ष सुरेंद्र पतींगे, कोषाध्यक्ष राजू सावरकर शिक्षक पतसंस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पावडे, संजय साखरे,विनायक चव्हाण, धनपाल गजभिये, राजेंद्र मालोकार, माजी उपाध्यक्ष शिक्षक पतसंस्था, मो इर्शाद , यांच्या उपस्थिती मध्ये पार पडला.



याप्रसंगी विनायक होले, नानासाहेब राऊत, किशोरसिह बयस, विनायक चव्हाण, विजय पवार, बाळासाहेब पावडे संजय साखरे, धनपाल गजभिये, तर माजी उपाध्यक्ष राजेंद्र मालोकार, तुफेल अहमद, गजेंद्र बावनेर, तर माजी सचिव नारायण गावंडे,गजानन गणोदे, संजय नागे,अशोक बावनेर, सहसचिव छाया पंडितराव देशमुख, पुष्पा ताडे, भारती मेहरे, भारत माहुरे तसेच जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त लता धनपाल गजभिये यांचा शिक्षक पतसंस्था च्या वतीने शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.पतसंस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डी. आर. जामनिक, उपाध्यक्ष अशोक बावनेर, मानद सचिव प्रशांत गहले, खजिनदार सुनिल स्वर्गीय, संचालक बाळासाहेब पावडे, संजय साखरे, धनपाल गजभिये, विनायक चव्हाण, गजानन गणोदे, तसेच अखिल शिक्षक संघटनेचे मार्गदर्शक पंडितराव देशमुख, शिक्षक बँकेचे संचालक संजय नागे, अखिलचे जेष्ठ उपाध्यक्ष धनपाल गजभिये गजानन मेहरे, तसेच कैलास डहाळे, छगन वाकपांजर, मंगेश ब्रम्हखेडे, सारिका मोहिते, सीमा नागे, सौ गहले, लता गजभिये आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षिका, तसेच उर्दू शिक्षक संघटना चे मो.इर्शाद सिद्दीकी,कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे बाबुराव कुऱ्हाडे, अजय सोनटक्के,शिक्षक भारती चे सचिव राजाभाऊ कातडे तसेच जितेंद्र भडांगे, प्रकाश लिंगोट,धरमदास चव्हाण नदीम व व्यवस्थापक कडू,सुभाष निमकर्डे इतर मान्यवर उपस्थितीत होते.संचालन सतिश वानखडे आभार प्रदर्शन संजय नागे यांनी मानले.

## निखील गवळी यांचे निधन


**बेलोरा/वार्ताहर**



येथील रहिवासी निखील शिवाजीराव गवळी यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, बहिण असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अंतिम संस्कार प्रसंगी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## बलात्काराच्या आरोपीला जामीन मंजूर


**अमरावती-**लग्नाचे खोटे आश्वासन देऊन संमती मिळवून बलात्कार केल्याबद्दल नागपूरच्या बेतालरोडी पोलिस ठाण्यातील आरोपीविरुद्ध एफआयआर अमरावतीच्या राजापेठ पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. आयपीसीच्या कलम ११५(२), २९६, ३५१(२), ३५२, ६४(२), (एम) आणि ६९ अंतर्गत गंभीर आरोपांखाली गुन्हा क्रमांक ८२०/२०२५ नोंदवण्यात आला. या प्रकरणात, जिल्हा दंडाधिकारी न्यायालय क्रमांक ३ मध्ये आरोपीला सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला. ॲड. गिरीराज एस. छंगाणी यांनी आरोपीची यशस्वीपणे बाजू मांडली.आरोपी कल्लूसिंगने लग्नाचे खोटे आश्वासन देऊन तिच्यावर अनेक वेळा बलात्कार केला. सुनावणीदरम्यान, आरोपीचे वकील ॲड. गिरीराज एस. छंगाणी यांनी आरोपी आणि तक्रारदार यांच्यातील दीर्घकालीन आणि संमतीने झालेल्या संबंधांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. आरोपीचे वकील ॲड. गिरीराज एस. छंगानी यांचा युक्तिवाद मान्य करून न्यायालयाने स्पष्ट केले की अटक न करताही तपास प्रभावीपणे करता येतो. या आधारावर, उच्च न्यायालयाने कल्लू यांना सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर केला. ॲड. गिरीराज एस. छंगानी यांना ॲड. आशिष सिंग परिहार, ॲड. मनाली शर्मा आणि ॲड. निखिल गौड यांनी मदत केली.



# सोनोरी-गणोजा रस्त्यासाठी उद्या रास्तारोको

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील सोनोरी-गणोजा-डोमक रस्त्याची, स्थिती आज अत्यंत दयनीय झाली आहे. या रस्त्यावरून वाहनेच काय? पायी चालणे ही कठीण झाले आहे. सदर रस्ता पूर्ण करण्यासाठी स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागाला, वारंवार निवेदने व विनंती पत्र देण्यात आलीत. परंतु मागिल तीन वर्षांपासून , सा.बां.वि. अद्यापही कुंभकर्णी झोपेतून जागे झाले नाही.परिणामी या रस्त्यासाठी गावकऱ्यांवर,आंदोलन करण्याची वेळ आली आहे.त्या अनुषंगाने १६ जानेवारीला गणोजा येथील गांवकरी व शालेय विद्यार्थी, रस्ता रोको आंदोलनासह सार्वजनिक बांधकाम विभागाला ताला ठोको आंदोलन करणार आहेत.



मागिल तीन ते चार वर्षा पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने,या रस्त्यावर कंत्राटदारा मार्फत खडीकरण केले होते.मात्र मंजूर असलेले या रस्त्याचे डांबरीकरण केले नाही.त्यामुळे या रस्त्याचे खडीकरण पूर्णतः उखडले आहे.परिणामी हा रस्ता वाहतूकीस अयोग्य झाला आहे. गणोजा व डोमक येथील अनेक विद्यार्थी,या रस्त्याने शिक्षणासाठी चांदूरबाजार व सोनोरी येथे जातात.

या रस्त्यावर अनेक वेळा,शालेय वाहनांना अपघात झाला आहे.जेव्हा गणोजा येथील नागरीकांनी तक्रार केली तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर फक्त पिवळी चोपण माती तेवढी आणून टाकली.मात्र मंजूर असलेले डांबरीकरण करण्यास प्रत्येक वेळी खो दिला. अखेर गणोजा -डोमक येथील गावकऱ्यांना,आपल्या मागणीसाठी आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागला आहे. सदर आंदोलनात बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसील कार्यालय व पोलीस स्टेशन यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.या आंदोलनानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, जागे होते की पुन्हा निद्रावस्थेत जाते. याकडे गणोजा व डोमक येथील गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## रघुपती खडसे यांचे निधन

**बेलोरा/वार्ताहर**



येथील रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे कार्यकर्ते रघुपती गणुजी खडसे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ९५ वर्षाचे होते. त्यांच्यावर बेलोरा येथील बौध्द स्मशान भुमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी जनसमुदाय मोठया संख्येनी उपस्थित होता.

# अचलपूर नगर परिषद उपाध्यक्ष पद काँग्रेसच्या ताब्यात?

**अचलपूर/वार्ताहर**

अमरावती जिल्हयात सर्वाधिक सदस्य संख्या असणाऱ्या अचलपूर नगर परिषदेच्या ४१ सदस्यांच्या माध्यमातून अचलपूर नगर परिषद उपाध्यक्ष व चार स्वीकृत सदस्यांची निवड आज केली जाणार आहे. यामध्ये अचलपूर न.प उपाध्यक्षपदी काँग्रेस कडून नगरसेविका खुर्शिदा बानो अत्ताउल्लाशा यांची वर्णी तर ४ स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजपाचे अभय माथने,काँग्रेसचे अब्दुल मुजीब अ.रशीद आणि सामाजिक कार्यकर्ते राजू माहेश्वरी ,अनिल चि.अग्रवाल यांची लागणार वर्णी लागण्याची शक्यता आहे.यामुळे आज १५ जानेवारी रोजी होणाऱ्या अचलपूर न . प उपाध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक पदाच्या नावावर शिक्कामोर्तब लागणार असल्याने विविध चर्चांना कायमचे विराम लागणार आहे.









अचलपूर नगर परिषदेत नगरसेवक म्हणून काँग्रेस पक्षाचे १५, अपक्ष १०, भाजपा ९, एमआयएम ३, प्रहार २, राष्ट्रवादी काँग्रेस २ असे एकुण ४१ सदस्यांची संख्या आहे. अचलपूर नगराध्यक्ष पदावर भाजपाच्या सौ. रूपाली माथने विराजीत झाल्या आहे. भाजपाच्या ९ सदस्यांच्या वतीने आ. प्रविण तायडे व भाजपा पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात स्वीकृत सदस्यांकरीता अभय माथने यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.

काँग्रेस पक्षाकडून स्वीकृत नगरसेवक पदासाठी अब्दुल मुजीब अ.रशीद यांचे नाव निश्चित मानले जात आहे तर दुसरीकडे अपक्ष व इतर सदस्यांच्या माध्यमातून २ स्वीकृत नगरसेवक पदासाठी सामाजिक कार्यकर्ते निल उर्फ राजू माहेश्वरी ,अनिल चि.अग्रवाल यांचे नाव ही निश्चित मानले जात आहे .

### जिल्हा सामान्य रुग्णालयाचा ऐतिहासिक टप्पा

# वर्षभरात १० हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन

**अमरावती/का.प्र.**

रक्तकेंद्र व रक्त घटक विलगीकरण केंद्र, अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय विभागाने रुग्णसेवेमध्ये महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. सन २०२५ या वर्षात शासकीय रक्तकेंद्र अमरावती यांनी १० हजार १९० रक्त पिशव्यांचे संकलन केले असून, गेल्या चार वर्षात या रक्तकेंद्राने ४० हजारांहून अधिक रक्त पिशव्यांचे संकलन करून हजारो रुग्णांना जीवनदान दिले आहे. या वर्षात शासकीय रक्तकेंद्राने एकूण २२७ रक्तदान शिबिरे यशस्वीपणे पार पाडली असून, यामुळे सिकलसेल, थॅलेसिमिया, हिमोफेलिया तसेच जटिल शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे.




जिल्ह्यातील एकमेव शासकीय रक्तपेढी असल्यामुळे हे केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, क्षय रुग्णालय आणि अच्च्युत महाराज रुग्णालयासोबतच जिल्ह्यातील खाजगी रुग्णालये व सहा रक्त साठवणूक केंद्रांना नियमित रक्तपुरवठा करीत असते. जिल्ह्यालगतच्या मेळघाट येथील आदिवासी बांधव, गर्भवती माता, लहान बालके तसेच चिखलदरा व धारणी येथील रुग्णांनाही येथून मोठ्या प्रमाणात रक्ताचा पुरवठा केला जातो. विशेषतः सिकलसेल आणि ॲनिमियाग्रस्त रुग्णांना दर पंधरा दिवसांनी रक्ताची गरज भासते, त्यांच्यासाठी हे केंद्र अत्यंत महत्त्वाचे कार्य करीत आहे.

खासदार ३६५ दिवस रक्तदान मोहिमेअंतर्गत राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले आणि रक्त केंद्र प्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य करण्यात आले असून अविरत सुरु आहे. जनसंपर्क अधिकारी मिलिंद तायडे आणि समुपदेशक योगेश पानझाडे यांच्या अथक प्रयत्नांमुळे व संपूर्ण अधिकारी-कर्मचारी चमूच्या सहकार्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना वेळेवर रक्त पुरवठा करणे शक्य होत आहे. रक्ताची ही गरज निरंतर असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संस्था, महाविद्यालये आणि तरुण मंडळांनी रक्तदान शिबिरांसाठी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार व रक्त केंद्रप्रमुख डॉ. आशिष वाघमारे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### विरगव्हाण स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन

## राज्य सरकार व प्रशासनिक अधिकारी यांच्या वतीने जाहीर


**कुऱ्हा/वार्ताहर**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४ नुसार ग्रामपंचायत विभाजन करण्याचे अधिकार राज्य शासनाला असून त्याबाबतचा प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत गटविकास अधिकारी मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त अमरावती मार्फत राज्य शासन ग्रामविकास विभाग यांना पाठवले व गावातील गट ग्रामपंचायत चे भिवापूर ग्रामपंचायतचे विभाजन करून विरगव्हाण येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन झाल्याबद्दल राज्य सरकार व प्रशासनिक अधिकारी यांच्या वतीने जाहीर झालेल्या ३१ डिसेंबर २०२५ रोजी चे अधिसूचना व राजपत्र राज्य शासनाने काढल्यामुळे गावकऱ्यांनी आभार मानले आहे. सरपंच मनोज चव्हाण, उपसरपंच अंकुश राठोड, ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र पवार, ग्रामपंचायत सदस्य गीता चव्हाण, सिद्धार्थ ढेंबरे व गावातील युवा कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. त्यात सुभाष रामदास चव्हाण, लक्ष्मण परसराम राठोड, विनोद धनसिंग जाधव, राहुल रामराव राठोड, उपसरपंच अंकुश पालसिंग राठोड लोकांनी घेतलेला मेहनतीचे फळ अखेर विरागव्हाण वासियांना मिळाले आहे.

## महाटीईटी परीक्षेची अंतीम उत्तरसूची जाहीर


**अमरावती-**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतीम उत्तरसूची जाहीर करण्यात आली आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात आली आहे. या अंतिम उत्तरसूची बाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतरिम उत्तरसूची १९ डिसेंबर रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रं. एक व दोनच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रूटी आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे २७ पर्यंत पाठविणेबाबत १९ डिसेंबर रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूची बाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. या अंतिम उत्तरसूचीनूसार MAHATET-२०२५ परीक्षेचा निकाल यथावकाश परीषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असेही आवाहन आयुक्त ओक यांनी केले आहे.

## पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये मकर संक्रांत



**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये मकर संक्रांत हा सण अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शाळेचे परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.कार्यक्रमाची सुरुवात मकर संक्रांतीचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व सांगणाऱ्या प्रास्ताविकाने झाली. विद्यार्थ्यांनी तिळगुळाचे महत्त्व सांगणारी भाषणे, कविता तसेच सणाशी संबंधित माहिती सादर केली. 'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' या संदेशातून आपुलकी व सौहार्द जपण्याचा संदेश देण्यात आला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मकर संक्रांतीमागील परंपरा व बदलत्या ऋतूचे महत्त्व समजावून सांगितले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय सण-परंपरांची ओळख निर्माण होते, असे मत शाळेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केले.

## राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती



**तिवसा-**वाडेकर नॅशनल स्कूल गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी मासाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी माहिती अनेक विद्यार्थ्यांनी दिली. यावेळी छोटे छोटे विद्यार्थी मॉंसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा करून शाळेत आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून योगशिक्षक तुलसीदास कपाळे हे होते. शिक्षक सुजित काळमेघ व शिक्षिका अश्विनी करकर यांनी स्वामी विवेकानंद व मॉंसाहेब जिजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी माहिती दिली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका हिना बाटविया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शाळेच्या शिक्षिका सर्वश्री अश्विनी खैरकर, सुजित काळमेघ, रोशनी आवारे, नम्रता मोहोड ,रूपाली इंगोले, गीतांजली साहू,दिपाली पखाले, सुरेखा खंडार, सारिका डहाके, प्रतीक्षा यावले, प्रवीना रामावत यांनी परिश्रम घेतले.

## 'राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन' पुस्तकाचे प्रकाशन

**अमरावती-** 'राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन' पुस्तकाचे डॉ. गोविंद कासट मित्रमंडळीच्या विनंतीनुसार नववर्षाची पहाट तपोवनात या दरवर्षीच्या मित्रमंडळीच्या दाजीसाहेबांना तपोवनात वंदन करण्याच्या संस्थाध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या मार्गदर्शन होणाऱ्या कार्यक्रमात प्रकाशन झाले. थोर हिंदी साहित्यिक भगवान वैद्य प्रखर यांच्या हस्ते झालेल्या या प्रकाशानाला चंद्रकुमार जाजुदिया सुदर्शन गांग डॉ. विजय भांगडिया दिलीप भाई पोपट डॉ. नंदकुमार लोहाना हसमुख कारिया उषा करवा प्रभाताई आवारे प्रवीण वासनिक सुरेश कस्तुरकर दीपक दारव्हेकर सुरेश गटलेवार प्राचार्य एस व्ही शिरभाते डॉ. राजू डांगे आदी मंडळी उपस्थित होते.

# आज लोकशाहीचा उत्सव

**अमरावती/का.प्र.**

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीकरीता महानगर पालिका आयुक्त आणि निवडणूक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व निवडणूक तयारी पूर्ण झाली आहे. महानगरपालिकेच्या एकूण २२ प्रभागांमध्ये बहु-सदस्यीय पॅनेल प्रणाली अंतर्गत निवडणुका होत आहेत. प्रभाग १ ते ८ आणि १० ते २२ मधील चार जागांसाठी (अ, ब, क, ड) आणि प्रभाग ९ ते ९ मधील तीन जागांसाठी (अ, ब, क) नागरिक मतदान करतील.


निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्याची माहिती आयुक्तांनी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रशासनाचा आढावा घेतला आहे. निवडणूक आयोगाने

**महानगपालिका निवडणूक- २०२६**

नियुक्त केलेले मुख्य निवडणूक निरीक्षक डॉ. भरत एन. बास्तेवाड आणि अनिल खंडागळे निवडणूक कार्यवाहीचे बारकाईने निरीक्षण करत आहेत.

प्रत्येक मतदान केंद्रावर एकूण पाच कर्मचारी तैनात केले जातील: एक केंद्रप्रमुख, तीन मतदान अधिकारी आणि एक पोलिस कर्मचारी.





मतदानासाठी पुरेशा संख्येने नियंत्रण युनिट आणि मतपत्रिका युनिट उपलब्ध असतील आणि सर्व यंत्रांची प्रथम-स्तरीय तपासणी पूर्ण झाली आहे.

सर्व मतदान यंत्रे कडक पोलिस बंदोबस्तात स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहेत.

सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आणि वेबकास्टिंगद्वारे बारकाईने लक्ष ठेवले जाईल.

प्रत्येक जिल्ह्यात एक समर्पित महिला मतदान केंद्र, गुलाबी बुथ आणि हिरवे बुथ स्थापन करण्यात आले आहेत. चौचाळीस प्रादेशिक अधिका ऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक करीता मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. या निवडणुकीत महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागातील दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे शक्य नसल्यास, त्यांच्या सोयीसाठी ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित मतदारांनी खाली नमूद केलेल्या संपर्क अधिकाऱ्यांशी व्हाट्सअप द्वारे संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी आदल्या दिवशी संबंधीतांना सुचना द्यावयाचे असल्यास व्हाट्सअप वर मॅसेज करावा.

अधिकारी तपशील:-झोन क्र. १- रामपुरी कॅम्प प्रभाग क्र. १, २, ५, वाहन क्रमांकः MH 31 DS 0141, संपर्क अधिकारी : डॉ. पुजा देशमुख मोबाईल क्रमांक : ७४४८२३९०९५झोन क्र. २ नवीन तहसील कार्यालय, प्रभाग क्र. ३,४,७, वाहन क्रमांक: MH 30L4140, संपर्क अधिकारी डॉ. दिपिका वावगे मोबाईल क्रमांकः ८७६६४७८८९७.झोन क्र. ३ मनपा झोन कार्यालय, क्र. २, राजापेठ प्रभाग क्र. ११,१२, १८, वाहन क्रमांक: DD 01AG ९८११, संपर्क अधिकारी : डॉ. प्रियंका हिवराळे मोबाईल क्रमांक: ७७२१८७३७४९.

झोन क्र. ४ मनपा झोन कार्यालय, क्र. ३, दस्तुरनगर, प्रभाग क्र. : ८, ९, १०, वाहन क्रमांक: श्प २७ ण ५९८५ संपर्क अधिकारी डॉ. संतोष तोटे, मोबाईल क्रमांक : ९३२६३ २९७६८, झोनक्र. ५- मनपा शिक्षण विभाग, अंबापेठ, प्रभागक्र. : ६,१३,१७, वाहन क्रमांक: MH 31 CD 1381, संपर्क अधिकारी डॉ. तुषार पोहणकर, मोबाईल क्रमांकः ९४०३४२२३०६, झोन क्र.६ जुने तहसील कार्यालय, प्रभाग क्र.ः १४, १५, १६, वाहन क्रमांकः MH 27C 5794 संपर्क अधिकारी: डॉ. अस्मिता मुंद्रे, मोबाईल क्रमांकः ७४९९१ ५०६५९,झोन क्र. ७- मनपा झोन कार्यालय, क्र. ४, बडनेरा, प्रभागक्र.:१९, २०, २१, २२, वाहन क्रमांकः MH 12 FC 9670, संपर्क अधिकारी डॉ. वैशाली मोटघरे, मोबाईल क्रमांक ८०८७२८२०५८.



**अमरावती तहसील कार्यालयाच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्फत प्रभाग क्रमांक ३,४,७ चे निवडणूक साहित्य सांस्कृतिक भवन येथून वाटप करण्यात आले.(फोटोः प्रदीप इंगोले)**

## राजकमल उड्डाणपुलाची टाळेबंदी

# अमरावतीकरांच्या संयमाचा अंत की राजकीय षडयंत्र?

शहराच्या हृदयाचे ठोके मानल्या जाणाऱ्या राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपूल गेल्या अनेक महिन्यांपासून वाहतुकीसाठी बंद आहे. जो पूल शहराच्या एका टोकाला दुसऱ्या टोकाशी जोडायचा, तोच आता सामान्यांच्या त्रासाचे आणि राजकीय उदासीनतेचे केंद्र बनला आहे. मात्र, याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे अमरावती रेल्वे स्थानक शहराबाहेर हलवण्याच्या हालचाली आणि महानगर पालिका निवडणुकीच्या तोंडावर सर्वच राजकीय पक्षांनी या विषयावर धारण केलेले 'मौनी बाबा'चे व्रत!



### विकासाचा पूल की त्रासाचा सापळा?

राजकमल उड्डाणपूल बंद असल्याने बस स्थानक, इर्विन चौक आणि जयस्तंभ चौकावर वाहतुकीचा प्रचंड ताण पडत आहे. रुग्णवाहिकांना रस्ता मिळत नाही, व्यापाऱ्यांचा व्यवसाय ठप्प झाला आहे आणि नोकरदार वर्गाचा तासनतास वेळ वाहतूक कोंडीत जात आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम तांत्रिक कारणांमुळे रखडले आहे की त्यामागे काही वेगळेच गणित आहे, असा प्रश्न आता सर्वसामान्य अमरावतीकर विचारू लागला आहे.


### रेल्वेस्थानक स्थलांतराचा डाव?

पुलाच्या दुरुस्तीसोबतच सध्या पडद्यामागे हालचाली सुरू आहेत त्या अमरावती रेल्वे स्थानक शहराबाहेर हलवण्याच्या. जर रेल्वे स्थानक शहराच्या बाहेर गेले, तर शहराच्या मध्यवस्तीतील ही मोकळी होणारी जागा कुणाच्या घशात जाणार? हा खरा कळीचा मुद्दा आहे.

रेल्वे स्थानक लांब गेल्यास सामान्य प्रवाशांचे हाल होतील, रिक्षा-टॅक्सी चालकांचा रोजगार धोक्यात येईल आणि अमरावतीची ओळख पुसली जाईल, याची भीती व्यक्त होत आहे.

### निवडणुका तोंडावर, पण नेते गप्प का?

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत एरवी गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे विषय काढणारे राजकीय पक्ष या मुद्द्यावर मात्र 'मूग गिळून' बसले आहेत.सत्ताधारी तांत्रिक कारणांचे दाखले देत वेळकाढू पणा करत आहेत.विरोधक केवळ फोटोसेशनपुरते आंदोलन करून शांत होत आहेत.नेत्यांचे मौन बरेच काही सांगून जाते. या विषयावर बोलल्यास कोणाचे हितसंबंध दुखावले जातील, ही भीती की या मौनामागे काही 'सेटलमेंट' आहे?



### अमरावतीकरांचा सवाल

राजकमल पुलाचे काम युद्धपातळीवर का पूर्ण केले जात नाही? रेल्वे स्थानक स्थलांतरित करण्याच्या हालचाली कुणाच्या फायद्यासाठी सुरू आहेत? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महापालिका निवडणुकीत मते मागताना लोकप्रतिनिधी या प्रश्नांची उत्तरे देणार का? वेळ आली आहे की, अमरावतीच्या जनतेने आता केवळ आश्वासनं नाही, तर ठोस कृतीची मागणी करावी. अन्यथा, हा बंद पूल केवळ सिमेंटचा सांगाडाच नाही, तर लोकशाहीतील मेलेल्या संवेदनशीलतेचे प्रतीक ठरेल.

**ॲड. श्रीकांत खोरगडे**

# तगड्या पोलीस बंदोबस्तात होणार मतगणना

## शहरात ३ हजार पोलिसांचा फौजफाटा

**अमरावती/का.प्र.**

महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक सुरक्षा व्यवस्था लावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि भयमुक्त पार पडावी यासाठी पोलिस प्रशासनाने व्यापकस्तरावर सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन केले आहे.



निवडणूक ड्युटीसाठी ३ उपायुक्त, ७ सहायक पोलीस आयुक्त, ९२ एपीआय, पीएसआय, ३१ पोलिस निरीक्षक ,१,६५० अंमलदार आणि महिला पोलिस कर्मचारी निवडणूक कर्तव्यासाठी तैनात करण्यात आले आहेत. संवेदनशील भागांत करडी नजर ठेवण्यासाठी शहरात अतिरिक्त पोलिस दल देखील तैनात केले आहे. सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी शहरात ९०० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी आणि दोन उपविभागीय पोलिस अधिकारी, ३ आरसीपी पथक, ४ क्यूआरटी पथक तैनात करण्यात आले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा संदेश देण्यासाठी विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत शक्तीप्रदर्शन केले जात आहे. मनपा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी व गुन्हेगारांवर निगराणी ठेवण्यासाठी गुन्हे शाखेचे अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ८ पथक नेमण्यात आले आहे. या व्यतिरिक्त एफएसटीचे ८, वीएसटीचे ८ व एसएसटीचे १० पथक नियुक्त करण्यात आले आहे. मनपा हद्दीत २२ प्रभागांमध्ये एकूण ४४ क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत ४४ अंमलदार सतत पेट्रोलिंग करणार आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी २२ प्रभागांमध्ये २४१ इमारती ८०५ मतदान केंद्र आहे. जिथे मतदान होणार आहे.१६ जानेवारी रोजी डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा संकुल नवसारी येथे ७ झोन निहाय मतमोजणी होणार आहे. मतदान आणि मतमोजणीसाठी व्यापक नियोजन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आलेला आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या नेतृत्वात पोलीस विभाग सज्ज आहे.

### ड्राय डे मध्ये दारू विकणाऱ्यांवर कारवाई

मंगळवारी सायंकाळी ५.३० वाजता प्रचार पूर्णपणे थांबला. शहरात ड्राय डे लागू करण्यात आला आहे.मतमोजणी आणि मतदाना प्रक्रिये दरम्यान दारू तस्कर मोठ्या प्रमाणात सक्रिय राहतात. या साठी गुन्हे शाखे सह सर्व पोलिस ठाण्यांच्या डीबी पथकां सह विविध नियुक्त पथकांद्वारे दारू तस्करांना लक्ष्य ठेवण्यात येणार आहे.

# क्यूआर कोड स्कॅन करा... मतदान केंद्र शोधा

**अमरावती**-महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सज्ज राहून मतदानासाठी पुढे यावे, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी केले आहे.मतदान करताना मतदार ओळखपत्र किंवा भारत निवडणूक आयोगाने मान्य केलेले वैध ओळखपत्र ऊध्र्ंध आवश्यक असून, प्रत्येक मतदाराने आपले नाव मतदार यादीत आहे की नाही तसेच आपले मतदान केंद्र कुठे आहे, याची माहिती आधीच तपासून ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.यासाठी Matadhikar (Maha IT) Voter Search App नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच मतदार यादीतील नाव व मतदान केंद्राची माहिती मिळविण्यासाठी उपलब्ध कोड स्कॅन किंवा https://mahasecvoterlist.in/Cojection On Click/ Search Voter Name या करून वेबसाईटला भेट देऊन नागरिकांना काही सेकंदांत थेट माहिती मिळणार आहे.

मतदान केंद्र हे मतदारांच्या घराच्या जवळील केंद्रावर निश्चित करण्यात आले असून, नागरिकांनी आजच आपले मतदान केंद्र शोधून घ्यावे.

# मतदान करू चला !

तब्बल आठ वर्षानंतर महानगरपालिकेच्या निवडणूका होत असल्याने यंदा राजकीय पक्षांची नेतेमंडळी, कार्यकर्ते यांसह सामान्य नागरिकांमध्येहे उत्साहाचे वातावरण दिसून आले. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी प्रत्येक उमेदवाराने आपल्या मतदार क्षेत्रातील गल्ली-बोळा पिंजून काढला आहे. नानाविध आश्वासने दिली आहेत, आजतागायत झालेल्या प्रचाराच्या व्याप्तीवरून पक्षाच्या प्रमुख मंडळींनी यश-अपयशाची गणिते मांडण्यासही सुरुवात केली आहे. यंदा पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून प्रचारासाठी जीवाचे रान केले गेले असले, तरी मतदान करण्यासाठी मतदार किती प्रमाणात घराबाहेर पडतात यावरून पक्षांचे आणि उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. महापालिका क्षेत्रातील समस्त सरकारी यंत्रणानी मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. विविध माध्यमांतून जागृतीही केली आहे,. मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे ही शहरे दाट लोकवस्तीची असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणारी मतदान केंद्रे नागरिकांच्या घरापासून जेमतेम एक किलोमीटरच्या अंतरात असतात. तरीही अनेक नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडण्यास, मतदानासाठी रांग लावण्यास इच्छुक नसतात हें आजतागायतचे निरीक्षण आहे. असे असले तरी काही गोष्टींचे कौतुकही वाटते. वयाची नव्वदी-शंभरी गाठलेले जेष्ठ नागरिक मतदानासाठी बाहेर पडतात, अधू, अपंग नागरिक इतरांच्या साहाय्याने उत्साहाने मतदान करताना प्रत्येक वेळेस दिसून येतात, नोकरी व्यवसायानिमित्त देशाबाहेर गेलेले काही नागरिक केवळ मतदान करण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून भारतात येतात. या सर्वांचा उत्साह पाहिल्यावर जे नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत, मतदानानिमित्त मिळालेल्या सुट्टीचा उपयोग मौजमजा करण्यासाठी आणि सहलीला जाण्यासाठी करतात त्यांची लोकशाही उपभोगण्याचीच पात्रता नाही असे वाटते.



नगरसेवक हा सामान्य नागरिकाचा सर्वात जवळचा लोकप्रतिनिधी असतो. आपल्या प्रभागातील नागरिकांना अनेकदा तो वैयक्तिकरित्या ओळखत असतो. आपल्या परिसरातील लहान सहान समस्या घेऊन त्याच्याकडे जाता येते. त्याचे साहाय्य घेता येते त्यामुळे हा लोकप्रतिनिधी निवडण्यात आपल्या प्रत्येकाचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. नगरसेवक निवडताना सध्या वारे कोणत्या पक्षाचे आहेत, महापालिकेवर कोणत्या पक्षाची सत्ता असायला हवी या गोष्टी बाजूला ठेवून आपल्या प्रभागाच्या समस्या सोडवण्यास कोणता उमेदवार सक्षम आहे, स्वहितापेक्षा जनहिताला प्राधान्य देणारा उमेदवार कोणता आहे, नागरिकांच्या अडीअडचणींना उद्या कोण धावून येऊ शकतो या गोष्टी लक्षात घेऊन मतदान करायला हवे. मतदान म्हणजे कोण्या राजकीय नेत्यावर किंवा पक्षावर उपकार करणे नव्हे, तर आपल्या आणि आपल्या कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी आणि सुविधेसाठी योग्य लोकप्रतिनिधींची निवड करणे ही भावना लोकांमध्ये केव्हा जागृत होणार ? आपल्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या भवितव्यासाठी आपले एक मतही बहुमोल कामगिरी करणारे ठरणार आहे त्यामुळे निरुत्साह झटकून मतदान करण्यासाठी घराबाहेर पडूया !

**जगन घाणेकर**

# श्री गुरु तेग बहादूर : धर्मरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान

**शिखांचे ९ वे गुरु हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहेब यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी समागमानिमित्त राज्य शासनाच्यावतीने राज्यात विविध कार्यक्रम, उपक्रम घेतले जात आहे. त्याअंतर्गत २४ जानेवारी रोजी नांदेड येथे भव्य कार्यक्रम होत आहे. त्यानिमित्त गुरुजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा लेख..**

श्री गुरु तेग बहादुर साहेब हे मानवतेचे रक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी धार्मिक स्वातंत्र्य, समानता आणि मानवी मूल्यांसाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि छुआछूत यांसारख्या सामाजिक वाईट गोष्टींविरुद्ध आवाज उठवला. लोकांना शांतता, धैर्य आणि निःस्वार्थ सेवेचा मार्ग दाखवला आणि आपल्या सर्वोच्च बलिदानाने धर्माचे रक्षण केले म्हणून त्यांना 'हिंद दी चादर' (भारताची चादर) असेही म्हटले जाते.

श्री गुरू तेग बहादूर साहिबजींचा जन्म २१ एप्रिल १६२१ रोजी झाला झाला. गुरुजींचे जीवन त्याग, करुणा आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी समर्पित होते. आजही लोक गुरु तेग बहादूर साहिब यांना शूर योद्धा म्हणून स्मरण करतात. श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या मानवता, शौर्य, मृत्यू, प्रतिष्ठा या विचारांचाही गुरू ग्रंथसाहिबमध्ये समावेश करण्यात आला आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी आपल्या वडिलांसोबत मुघलांविरुद्ध लढा दिला. लहानपणापासूनच ते संतांसारखे, खोल विचारी, उदार मनाचे, शूर आणि निर्भय स्वभावाचे होते.

श्री गुरू तेग बहादूर जींचे पुर्वीचे नाव 'त्याग मल' होते. त्यांच्या या शौर्याचा परिचय दिल्यानंतर गुरु हरगोविंद साहिब यांनी त्यांचे नाव बदलून तेग बहादूर ठेवले. रणांगणावरील त्यांच्या लढाई आणि तलवारीच्या कौशल्यातून त्यांना नाव मिळाले. रणांगणातील भीषण रक्तपाताचा गुरुजींच्या एकांतवासावर खोल परिणाम झाला. त्यांचे मन आध्यात्मिक चिंतनाकडे वळले. संयम, शांतता आणि त्यागाचे मुर्तिमंत श्री गुरु तेग बहादूर जी यांनी 'बाबा बकाला' नावाच्या ठिकाणी एकांतात



२० वर्षे अखंड ध्यान केले. आठवे गुरु हरकिशन जी यांनी 'बाबा बकाले' यांना त्यांच्या उत्तराधिकारी नावाची सूचना दिली.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या मृत्युनंतर १६६४ मध्ये श्री गुरु तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून शिखांनी गादीवर विराजमान केले. श्री गुरु तेगबहादूर सिंहजी धार्मिक प्रचारासाठी आपल्या अनुयायांसह विविध ठिकाणी यात्रा करत असत. पहिले शीख गुरू 'गुरू नानक जी' यांच्यानंतरच्या दहा शीख गुरुंमध्ये सर्वाधिक प्रवास करणारे श्री गुरू तेग बहादूर साहीब होते. त्यांनी पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, आसाम, बांगलादेश असा प्रवास केला.

गुरुजींच्या प्रवासाचे दस्तऐवजीकरण त्यांच्या भेटींच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापित केलेल्या गुरूद्वारांच्या स्वरूपात केले गेले आहे, त्यात अयोध्येतील एका गुरूद्वाराचाही समावेश आहे.

श्री गुरू तेग बहादूरजींनी धर्माच्या रक्षणासाठी आणि धार्मिक स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केले. एकदा गुरु तेग बहादूर आनंदपूर साहिबमध्ये एका संगतीत बसले होते. तेथेच काश्मिरी पंडितांचा एक गट त्यांच्या भेटीसाठी आला होता. पंडित किरपा राम या गटाचं नेतृत्व करत होते. हजारो वर्षांपूर्वीचा त्यांचा धर्म धोक्यात आलाय हे त्यांनी श्री गुरु तेगबहादूर जी यांना सांगितले. औरंगजेबाने नेमलेला काश्मीरचा गव्हर्नर इफ्तेखार खान याने सगळ्यांना इस्लामचा स्वीकार करण्याची सक्ती केलीय. जो कोणी इस्लाम स्वीकारणार नाही त्यांना मृत्युदंड देण्यात येईल, असाही आदेश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी गुरुंनी विरोध केला. त्यानंतर औरंगजेबाच्या आदेशानुसार दिल्लीतील चांदनी चौक येथे त्यांना शहीद करण्यात आले. ज्या ठिकाणी त्यांना शहीदी करण्यात आले, त्या ठिकाणाचे नंतर गुरुद्वारा शीश गंज गुरुद्वारा साहिब आणि गुरुद्वारा रकाबगंज साहिब या शीख पवित्र स्थळांमध्ये रूपांतर करण्यात आले.

श्री गुरू तेग बहादुर जी हे फक्त शीख धर्माचे गुरू नव्हते तर ते मानवतेचे रक्षक आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक होते. त्यांचे जीवन आणि बलिदान आपल्याला आजही न्याय, समानता आणि स्वातंत्र्य यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देतात.

विविध विषयांवर रचलेले श्री गुरु तेगबहादुरांची ११६ पद्ये उपलब्ध आहेत. श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या जीवनाचा इतिहास, त्याग, धर्माचे रक्षण, राष्ट्रप्रेम, आणि शिकवणींमधून आपण प्रेरणा घेऊया आणि मानवतेची सेवा करण्याचा संकल्प करुया.

**गुरुमुख सिंह बावरा**
सहसचिव, विदर्भ क्षेत्रिय समिती
समुद्रपूर

# आज मतदान : ८० जागांसाठी ४६९ उमेदवार रिंगणात

## ६३० मतदान केंद्रांवर आज होणार मतदान

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज, गुरुवारी (दि. १५) शहरातील ६३० मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडत आहे. वीस प्रभागांतील ८० जागांसाठी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), शिवसेनेचे दोन्ही गट, एमआयएम तसेच अपक्ष उमेदवार असे एकूण ४६९ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून त्यांचे भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे.*

यंदाची महानगरपालिका निवडणूक अत्यंत चुरशीची ठरण्याची शक्यता असून भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गट यांची युती, तर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गट यांची युती झाली आहे. शिवसेना शिंदे गट व शिवसेना उबाठा यांनी मात्र स्वबळाचा नारा देत निवडणूक लढवली आहे. त्यामुळे सर्वच प्रभागांमध्ये थेट लढती रंगत असल्याचे चित्र आहे.



### मतदानासाठी आज सार्वजनिक सुटी

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महानगरपालिका निवडणुकीच्या दिवशी आज सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, खासगी कंपन्या, हॉटेल, मॉल्स, आयटी कंपन्या आदींना ही सुटी लागू राहणार आहे. अत्यावश्यक व लोकोपयोगी सेवांमध्ये पूर्ण दिवस सुटी शक्य नसल्यास कर्मचाऱ्यांना मतदानासाठी दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे बंधनकारक आहे. सूट न दिल्यास संबंधित आस्थापनांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### अनेक भागात व्होटर स्लिप पोहोचल्याच नाही

महानगरपालिका प्रशासनाकडून ९० टक्के मतदारांना व्होटर स्लिप वितरित झाल्याचा दावा करण्यात आला असला तरी मंगळवार (दि. १३) सायंकाळपर्यंत शहरातील अनेक भागात मतदारांना स्लिप मिळाल्या नसल्याच्या तक्रारी आहेत. बुधवारीही स्लिप न मिळाल्यास मतदान केंद्र शोधण्यातच मतदारांचा वेळ जाण्याची शक्यता आहे. शहरात एकूण ५ लाख ५० हजार ६० मतदार असून मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. मात्र प्रत्यक्ष वितरण १०० टक्के होणे गरजेचे असल्याची भावना मतदारांतून व्यक्त होत आहे.

### मतदान केंद्रांवर ३०० आरोग्य कर्मचारी तैनात

मतदान केंद्रे व मतमोजणी स्थळी प्रथमोपचार व आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सात वैद्यकीय पथके कार्यरत असून त्यात डॉक्टर, परिचारिका, आशा वर्कर व सफाई कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. याशिवाय मतदान प्रक्रियेसाठी सुमारे ३०० आरोग्य कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

### मतदानाची टक्केवारी ६० पार करणार का?

महानगरपालिका निवडणुकांमध्ये गेल्या काही वर्षांत मतदानाची टक्केवारी समाधानकारक राहिलेली नाही. सरासरी ३५ ते ४० टक्के मतदार मतदानापासून दूर राहतात. यंदा मात्र ही टक्केवारी ६० टक्क्यांचा टप्पा ओलांडणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नगरपरिषद उपाध्यक्षपदी प्रतिभा येऊल

## स्वीकृत सदस्यपदी श्याम भोपळे, किरण सेदानी यांची वर्णी

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■


हिवरखेड नगरपरिषदेतील सत्तासमीकरणाबाबत अनेक दिवसांपासून असलेले संभ्रमाचे चित्र अखेर स्पष्ट झाले आहे. नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी भाजपच्या प्रतिभा वीरेंद्र येऊल यांची अविरोध निवड झाली असून स्वीकृत नगरसेवकपदी भाजपचे किरण लालजी सेदानी आणि शिवसेना (शिंदे गट) कडून श्याम सहदेवराव भोपळे यांची निवड करण्यात आली आहे.

नगरपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर मंगळवार दि. १३ जानेवारी रोजी नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा घेण्यात आली. या सभेत उपनगराध्यक्षपदासाठी निवड प्रक्रिया पार पडली. उपनगराध्यक्षपदासाठी भाजपकडून प्रतिभा येऊल यांनी नामांकन अर्ज दाखल केला होता. मात्र, त्यांच्या विरोधात कोणताही अर्ज दाखल न झाल्याने प्रतिभा येऊल यांची उपनगराध्यक्षपदी अविरोध निवड घोषित करण्यात आली. दरम्यान, स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजपकडून किरण सेदानी यांचे नाव निश्चित करण्यात आले, तर शिवसेना (शिंदे गट) कडून पिढीजात काँग्रेसचे नेते म्हणून ओळख असलेले श्याम सहदेवराव भोपळे यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात आली.



या निवडीमुळे नगरपरिषदेत भाजप व शिवसेना शिंदे गटाचे सत्तासमीकरण अधिक मजबूत झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या घडामोडींमुळे हिवरखेड नगरपरिषदेतील राजकीय हालचालींना वेग आला असून आगामी काळात विकासकामांबाबत सत्ताधारी आघाडीची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान -जिल्हाधिकारी



■ प्रतिनिधी | अकोला ■

आदिशक्ती अभियान गावोगाव उत्कृष्टपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज दिले. जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधीकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. महिला सक्षमीकरणासाठी आदीशक्ती अभियान राबविण्यात येत असून गावोगाव प्रभावी अंमलबजावणी व्हावी. ग्रामपंचायतीना तालुका ते राज्यस्तरापर्यंत लाखो रूपयांची बक्षीसे जिंकण्याची संधी मिळणार आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी सांगितले.

विशेष अभियानांतर्गत जिल्हयात ग्रामस्तरीय समित्या गावोगाव स्थापन झाल्या आहेत. ७ तालुकास्तरीय समित्यांचे गठन करण्यात आले. अभियानात गावोगाव ग्रामसेवक यांनी wcdadhishakti.in या पोर्टलवर ग्रामपंचायतीची नोंद करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी केली.

शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्याघटकातील महिलांपर्यंत पोहचविणे, राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजीक, शैक्षणीक, आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे जनजागृतीच्या माध्यमातून चळवळ निर्माण करून कायमस्वरूपी उपाययोजना करणे हा या अभियानाचा मुख्य उदेश आहे.

जिल्हयात या अभियानांतर्गत जनजागृती सुरू असून माहीती या अभियानांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत आदीशक्ती अभियानच्या शासन निर्णयामध्ये ठरवन दिल्यानुसार झालेल्या कामांचे मुल्यांकन करून ग्रामपंचायतील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराअंतर्गत

तालुकास्तरावर प्रथम बक्षीस १ लाख, द्वितीय ५० हजार व तृतीय २५ हजार असे आहे.

जिल्हा स्तरावर प्रथम बक्षीस ५ लाख व्दितीय ३ लाख तृतीय १ लाख आहे शिवाय राज्य स्तरावर

प्रथम बक्षीय १० लाख, व्दितीय बक्षीस ७ लाख व तृतीय ५ लाख आहे. असे श्रीमती राजश्री कौलखेडे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी सांगितले. ग्राम चळवळीतून महिलांच्या समस्यांचे महत्व जाणुन घेणे व महिलांच्या आरोग्य समस्यांचे महत्व जाणून घेणे व महिलांच्या आरोग्य समस्यांचे निवारण करणे सक्षम समाज निर्माण करणे. लिंगभेदात्मक विचारसरणीला आव्हान देवुन मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे व बालविवाहमुक्त समाज निर्माण करणे तसेच लैंगीक, शारीरीक अत्याचाराला प्रतिबंध करून हिंसाचारमुक्त कुटुंब व समाज निर्माण करणे व अनिष्ट रूढींचे निर्मुलन करणे, महिला नेतृत्वाला सक्षम करून पंचायत राज पध्दतीमध्ये त्यांचा सहभाग वाढवीणे.

# आकोट सहकारी जिनिंग फॅक्टरीतून भागधारकांना भेटवस्तूंचे वितरण

■ प्रतिनिधी | अकोट ■

सहकारी जिनिंग संस्था बहुतांशी तोट्यात जात असताना अकोट तालुका सहकारी जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरीने मात्र सकारात्मक पाऊल उचलत संस्थेच्या नफ्यातून भागधारक सभासदांना सुमारे ३,२०० रुपये किमतीच्या भेटवस्तूंचे वितरण केले. मकर संक्रांतीच्या शुभ पर्वावर हा उपक्रम राबवून संस्थेने सहकार क्षेत्रात आपला वेगळा लौकिक निर्माण केला आहे.

संस्थेच्या भागधारक सभासदांना पेडीस्टल फॅन व मिल्टन वॉटर बॅग भेट म्हणून देण्यात आली. याबाबतचा निर्णय



यापूर्वी झालेल्या आमसभेत जाहीर करण्यात आला होता. अध्यक्ष सुभाषराव वानखेडे व उपाध्यक्ष रामदास थारकर यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने यासाठी सुमारे ६ लाख रुपयांची तरतूद केली होती.

भेटवस्तू वितरणाचा कार्यक्रम ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत पाचडे, संचालक निरज हिंगणकर, संस्थाध्यक्ष सुभाषराव वानखेडे, संचालक राजेश पुंडकर, अभिजित अग्रवाल, संचालिका सौ. रमाताई गावंडे, गजाननराव डांगे, गजाननराव गावंडे, उद्वराव टापरे, विलासराव चोरे, दिपक पाटील तसेच व्यवस्थापक राजेश सांगोले उपस्थित होते.

यावेळी नानासाहेब हिंगणकर यांनी संस्थेचा पारदर्शक कारभार व सभासदहित जोपासणारे निर्णय याबद्दल अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळाचे मुक्तकंठाने कौतुक केले. संस्थेच्या या उपक्रमामुळे भागधारक सभासदांनीही समाधान व्यक्त करत नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

# रविवारी मध्यस्थी परिचय पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या मध्यस्थी वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने सन २०२६ साठीच्या वधू-वर परिचय पुस्तिकेच्या वार्षिकांकाचे प्रकाशन रविवारी दि. १८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे संपन्न होणार आहे.

या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन आदीशक्ती श्री संत मुक्ताई संस्थान, मुक्ताईनगरचे अध्यक्ष रविंद्र उपाख्य भैय्यासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेवरावजी महल्ले राहणार आहेत. तर जेष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

मध्यस्थी मंडळ गेल्या तेरा वर्षांपासून समाजातील मुला-मुलींचे विवाह जुळून आणण्यासाठी निष्काम भावनेने विविध उपक्रम राबवित आहे. राज्यभरातील समाजातील सर्व स्तरांतील युवक-युवतींची नोंदणी मंडळाकडे झाली असून त्यांची सविस्तर परिचयात्मक माहिती या पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आली आहे. ही परिचय पुस्तिका महाराष्ट्रभर मागणीची असून आपल्या मुला-मुलींसाठी अनुरूप व योग्य स्थळ शोधण्यासाठी पालकांसाठी ती अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे. या प्रकाशन सोहळ्यास युवक-युवती, त्यांचे पालक तसेच समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मध्यस्थी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे व मंडळाच्या सदस्यांनी केले आहे.

# दीर्घकालीन भांडवली वाढ साध्य करण्याचा योजनेचा उद्देश

**अकोला :** भारताची अर्थव्यवस्था सध्या सर्वांगीण परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. भौतिक पायाभूत सुविधा, वित्तीय व्यवस्था आणि तांत्रिक क्षमतांमध्ये होत असलेली लक्षणीय सुधारणा सर्व आकारांच्या उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण करत आहे. पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च, अधिक सखोल होत जाणारे भांडवली बाजार, औपचारिक कर्जसुविधांपर्यंत सुधारलेली पोहोच आणि देशव्यापी डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांमुळे लहान कंपन्यांना भेडसावणारे पारंपरिक तोटे हळूहळू कमी होत आहेत.

# अ. भा. गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय पटेल यांची अकोला भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

गुजराती समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक विकासासाठी अ.भा. गुजराती समाज संस्था कटिबद्ध असून या संस्थेत समाजाच्या महिला पुरुष नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन अखिल भारत गुजराती समाजचे राष्ट्रीय अध्यक्ष भोपाळ येथील संजय पटेल यांनी केले. व्हीनस सभागृहात श्री गुजराती सेवा



समिती व अ.भा.गुजराती समाज महाराष्ट्र व गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने संजय पटेल यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमात संजय पटेल हे मार्गदर्शन करीत होते. या वेळी भोपाळ येथील गुजराती समाजाचे सहसचिव संजीवभाई पटेल, श्री गुजराती सेवा समितीचे वालजीभाई पटेल, सेवा समितीचे पदाधिकारी हरीश लाखानी, अ भा गुजराती समाजाचे महाराष्ट्र गोवा उपाध्यक्ष हेमेन्द्र राजगुरू, समितीचे मनोज भिमजीयानी, श्री अकोला गुजराती समाजाचे अध्यक्ष दिपेन शहा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात संजय पटेल, संजीव पटेल यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# पूर्वतयारी नरनाळा महोत्सवाची

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांची बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. महसूल, वनविभाग, पाटबंधारे विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने महोत्सव यशस्वी करावा, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**UJJAWALA SATISH DHUMALE**
-- TO--
**UJJWALA SATISH DHUMALE**
PASSPORT NO :- S5111675 My
Residential Address is :-
Ward No.3 New
Tapadiya Nagar kharab
road akola

# बालकांत खेळप्रेमाचे बीजारोपण

**अकोला -** स्थानिक रामदास पेठ येथील ज्युबिली प्रायमरी शाळेत नुकताच क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. केजीच्या बालकांमध्ये खेळाबाबत रुची जागवण्यासाठी हा उपक्रम साकार करण्यात आला होता. ३ ते ५ वर्ष वयोगटातील बालकांसाठी असलेल्या या क्रीडा महोत्सवात बालकांसोबत त्यांच्या पालकांनीही सहभाग घेतला.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार नामे नितीन भास्कर इंगळे मु. गिर्जापूर, पो. रेल, ता. अकोट, जी. अकोला यांनी दिलेल्या अधिकार व माहितीच्या आधारे सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नितीन भास्कर इंगळे यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- ग्रामपंचायत मालमत्ता क्र. २९/१, मौजे - धारेल, ता. अकोट, जी. अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ १००० चौ. फुट, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - उकरडा इंगळे, पश्चीमेस शामराव इंगळे, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - बोळ, या वर्णनाची मालमत्ता आमचे पक्षकार यांची मालमत्ता आहे. सदरहू मालमत्ता गहान ठेवून आमचे पक्षकार हे जना स्माल फायनान्स बँक कडून कर्ज घेत आहेत.

येणेप्रमाणे सदरहु वरील वर्णनाच्या व चतु:सिमेतील सदर मिळकती संबंधी इतर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा, गहाण, वा इतर कसल्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करिता हि जाहीर नोटीस.

ठिकाण :- अकोला
दिनांक :- १४/०१/२०२६

**पक्षाकाराकरिता अधिवक्ता**
**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क. २३- ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९१७५९३८२४२.

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ०१/२०२६ प्रोसेस नं.३०/२०२६
चौ.ता. २०/०२/२०२६ दिनांक : १३/०१/२०२६

**अर्जदार :** १. मधुकर मारोती खाडे, रा. मु. पो. सकनी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : बानाबाई मधुकर खाडे (लग्नाआधी बानाबाई संभाजी खिल्लारे)
**पत्ता :-** रा. मु. पो. सकनी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बानाबाई मधुकर खाडे (लग्नाआधी बानाबाई संभाजी खिल्लारे) यांचे दिनांक ०८/०९/२०२५ रोजी सकनी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१/२०२६ प्रोसेस नं.६१३/२०२६
चौ.ता. १७/०२/२०२६ दिनांक : १३/०१/२०२६

**अर्जदार :** १. श्री. रमेश रामजी बावणे रा. कुरणखेड, ता. जि. अकोला, २. सौ. संगीता रमेश सातरोटे रा, माना, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. ३. सौ. मंगला रामेश्वर श्रावणे रा. व्दारा रामेश्वर श्रावणे मु. पो. वरूड बु. कुलट ता. दर्यापूर, जि. अमरावती. ४. रविंद्र रमेश बावणे रा. कुरणखेड, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** दिनेश रमेश बावणे रा. हरीहर पेठ, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : यशोदा रमेश बावणे
**पत्ता :-** रा. कुरणखेड, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत यशोदा रमेश बावणे यांचे दि. ०८/०९/२०२५ रोजी कुरणखेड, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३३६/२०२५ प्रोसेस नं.२१०१९/२०२५
चौ.ता. ०५/०२/२०२६ दिनांक : २४/१२/२०२५

**अर्जदार :** १. दिनेश घसिता जरिया २. मुलचंद घसिता जरिया दोघेही रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला, ता. जि. अकोला. ३. सौ. सरिता मुलचंद रघुवंशी रा. ५६, बाग मुफ्ती, काबितपुरा, शहजानाबाद, हुजुर, ता. हुजुर जि. भोपाल मध्यप्रदेश. ४. आनंद घसिता जरिया मयत ४ अ. श्रीमती राखी आनंद जरिया ४ ब. अंतरा आनंद जरिया ४क. आकांशा आनंद जरिया ४ड. सलोनी आनंद जरिया ४इ. संजना आनंद जरिया ४अ ते ४इ रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुमित्रा घसिता जरिया
**पत्ता :-** रा. बापु नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमित्रा घसिता जरिया यांचे दि. २२/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३८४/२०२५ प्रोसेस नं.४४१/२०२६
चौ.ता. २६/०२/२०२६ दिनांक : ०८/०१/२०२६

**अर्जदार :** १. गणेश अर्जुनसिंह बलोदे २. राजेश अर्जुनसिंह बलोदे ३. सतिष अर्जुनसिंह बलोदे अर्जदार क. १ ते ३ रा. बलोदे लेआउट, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. ज्योती सुरेश परदेशी रा. संगमनेर रोड, नॉर्डन ब्रांच, वार्ड नं. ७, श्रीरामपुर, अहमदनगर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शकुंतलाबाई अर्जुनसिंह बलोदे
**पत्ता :-** रा. बलोदे लेआउट, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शकुंतलाबाई अर्जुनसिंह बलोदे यांचे दि. १९/०८/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ४९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### बिबट्याचा मुक्त संचार; हल्ल्यात पाळीव श्वान ठार

**वर्धा-** परिसरात बिबट्याचा मुक्त संचार वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा पाळीव श्वान ठार झाल्याची घटना समोर आली आहे.सध्या रब्बी हंगाम सुरू असून गहू, चना, तूर, कापूस आदी पिकांच्या रखवालीसाठी शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री शेतात जावे लागत आहे. अशातच बिबट्याच्या मुक्त संचारामुळे जीविताला धोका निर्माण झाला आहे. मंदार देशपांडे यांच्या पाळीव श्वानावर बिबट्याने झडप घालून त्याची शिकार केली. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली असून वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**वर्धा-** नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत जिल्हा पुनर्वसन केंद्रासाठी इच्छुक असलेल्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव दिव्यांग आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येणार आहे. प्रस्ताव सादर करण्यासाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. संस्थेच्या बँक खात्याचा तपशिल असणे आवश्यक आहे. प्रस्ताव सादर करतांना काही अडचण असल्यास जिल्हा समाज कल्याण कार्यालयाच्या ०७१५२-२४२७८३ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी कळविले आहे.

### पार्किंगमधून दुचाकी लंपास

**वर्धा-** जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारातील पार्किंगमधून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.सेलू तालुक्यातील खेरडा येथील अभिजित बावणे (वय ३०) यांनी आपली एमएच ३२ एजी ०७१८ क्रमांकाची दुचाकी रुग्णालयाच्या आवारात उभी केली होती. मात्र काही वेळाने परत आल्यानंतर दुचाकी गायब असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून चोरट्यांचा शोध सुरू आहे. रुग्णालय परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# सौरऊर्जा संयंत्र बसविणे आजच्या काळाची गरज

## वीज बिलात ७० ते ९० टक्के बचत; फसवणूक टाळण्यासाठी सुटेपार्ट, कंपनी व वॉरंटीची प्रमाणपत्रे मागणे ग्राहकांचा हक्क

**सेलू/ अभय बेदमोहता**

वाढती महागाई, वारंवार वाढणारे वीजदर आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास पाहता घरावर सौरऊर्जा संयंत्र बसविणे ही केवळ आधुनिकतेची बाब न राहता आजच्या काळाची नितांत गरज बनली आहे. सौरऊर्जेमुळे वीज बिलात मोठी बचत होत असून पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागत आहे.

सौरऊर्जा यंत्रणा बसवल्यास घराचे वीज बिल ७० ते ९० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. एकदा केलेली गुंतवणूक साधारण ३ ते ४ वर्षांत वसूल होत असून, पुढील सुमारे २० ते २५ वर्षांपर्यंत अत्यल्प दरात किंवा जवळपास मोफत वीज मिळते, असे तज्ज्ञ सांगतात. कोळसा जाळून तयार होणारी पारंपरिक वीज मोठ्या प्रमाणावर प्रदूषण करते, मात्र सौरऊर्जा ही हरित ऊर्जा असल्याने कार्बन उत्सर्जन कमी होऊन जागतिक तापमानवाढ रोखण्यास मदत होते.

सौरऊर्जेला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने पीएम सूर्य घर मोफत वीज योजनासारख्या योजनांद्वारे अनुदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे सौर पॅनेल बसविण्याचा खर्च बराच कमी होतो. तसेच सौर पॅनेलद्वारे गरजेपेक्षा जास्त वीज निर्मिती झाल्यास 'नेट मीटरिंग'च्या



माध्यमातून ती वीज वितरण कंपनीला विकता येते. यामुळे वीज बिल शून्यावर येतेच, शिवाय क्रेडिटही मिळू शकते.

सौरऊर्जा यंत्रणेत हलणारे भाग नसल्यामुळे देखभाल खर्च अत्यल्प असतो. दर तीन महिन्यांनी पॅनेलवरील धूळ स्वच्छ केल्यास यंत्रणा सुरळीत चालते. बहुतेक नामांकित कंपन्या सौर पॅनेलवर २५ वर्षांची वॉरंटी देत असल्याने दीर्घकालीन सुरक्षितता मिळते. तसेच भारनियमन आणि वारंवार होणाऱ्या वीजखंडितीपासूनही सौरऊर्जेमुळे दिलासा मिळतो.

मात्र, अलीकडे 'ग्रो ऑन' नावाने सौरऊर्जा संयंत्र बसवून देण्याच्या आमिषाने सहा गरीब शेतकऱ्यांकडून सुमारे १२ लाख रुपये घेऊन संचालक पसार झाल्याची घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा प्रकारच्या फसवणुकीमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कंपन्यांवरही संशय निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर सौरऊर्जा संयंत्र बसविताना सर्व आवश्यक प्रमाणपत्रे घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे जाणकारांचे मत आहे. नेट मीटरिंग करार, वेंडर अ?ग्रीमेंट, डीसीआर प्रमाणपत्र, इन्व्हर्टर वॉरंटी कार्ड, पॅनेल वॉरंटी कार्ड ही कागदपत्रे ग्राहकांकडे असणे आवश्यक आहे. यामुळे भविष्यात कोणतीही फसवणूक होणार नाही, तसेच बसविण्यात आलेले उपकरण सांगितल्याप्रमाणेच कंपनीचे व योग्य किलोवॅट क्षमतेचे आहे की नाही, याची खात्री करता येते. भविष्यात गंडा बसू नये यासाठी सौरऊर्जा योजनेतील सवलती, त्या किती वर्षांसाठी मिळणार आहेत, तसेच सेवा देणाऱ्या कंपन्यांची कर्तव्ये काय आहेत, याची सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे. योग्य माहिती आणि जागरूकतेसह सौरऊर्जा संयंत्र बसविल्यास ही गुंतवणूक आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरण्याबरोबरच पर्यावरण रक्षणासाठीही मोलाची ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**समुद्रपूर-** पोलीस ठाण्याच्या हद्दीत दारूच्या नशेत एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शुभम मेघे (वय २९, रा. शेगाव गाठोडे) असे मृत युवकाचे नाव आहे. ही घटना सोमवारी उघडकीस आली.शुभमला दारूचे व्यसन होते. दरम्यान, दारूच्या नशेतच त्याने राहत्या घरात गळफास घेत जीवन संपविल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तक्रारीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विदर्भस्तरीय बौद्ध धम्म परिषद १८ जानेवारीला

## देश-विदेशातील भिक्षुसंघ, मान्यवरांची उपस्थिती

**वर्धा/ जनमाध्यम**

धम्म, शांती आणि सामाजिक समतेचा संदेश देणारी विदर्भस्तरीय बौद्ध धम्म परिषद रविवार, १८ जानेवारी रोजी धम्मप्रिय अशोक सम्राट नगरी, अंबानगर येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचे आयोजन भदंत डॉ. राजरत्न यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, परिषदेच्या निमित्ताने संपूर्ण अंबानगर परिसर आकर्षक सजावटीने उजळून निघाला आहे.

धम्म परिषदेचे उद्घाटन सकाळी ११ वाजता मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती रोहित पिसाळ यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेह-लदाख येथील ज्येष्ठ भिक्षू भदंत संघसेन महाथेरो राहणार आहेत.या परिषदेकरिता अतिथी



म्हणून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू डॉ. राजरत्न आंबेडकर, विधानसभा उपाध्यक्ष आ. अण्णा बनसोडे, शिक्षणमहर्षी डॉ. राजाभाऊ टाकसाळे, शिक्षणमहर्षी अनिल जवादे, शिक्षणमहर्षी मदन मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तसेच विशेष अतिथी म्हणून पोलीस उपाधीक्षक प्रमोद मकेश्वर, पत्रकार श्रीमंत माने, ॲड. डॉ. विकास साठे (मुंबई), डॉ. राजकुमार शेंडे, उद्योजक विकास घरडे, रत्नदीप डहाट आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून डी. के. पाटील, तर प्राचार्य देवराव गजभिये यांचीही उपस्थिती कार्यक्रमास लाभणार आहे.धार्मिक मार्गदर्शनासाठी आग्रा येथील भदंत आनंद महाथेरो, आदिलाबाद येथील भदंत झेन मास्टर बोधिधम्मा, येनाळा येथील भदंत सत्यानंद महाथेरो, बोधगया (बिहार) येथील भदंत विनाचार्य यांच्यासह पूज्यनीय भिक्षुसंघ परिषदेकरिता उपस्थित राहणार आहे. धम्म परिषदेच्या समारोपप्रसंगी संध्याकाळी आंतरराष्ट्रीय प्रबोधनकार कडूबाई खरात (मुंबई) यांचा बुद्ध-भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.या विदर्भस्तरीय बौद्ध धम्म परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भदंत डॉ. राजरत्न, कार्यकारी चित्रपट निर्माता चरण हरले, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष विशाल मानकर यांच्यासह नीरज ताकसांडे, सुनील ढाले, मुकुंद नाखले, सुहास थुल, आनंद सोनटक्के, प्रणोज बनकर, दिनेश वाणी, नीरज गुजर, प्रा. शैलेंद्र निकोसे, किशोर खैरकार, विवेक मेश्राम, भीमा शंभरकर, देवानंद बोरकर, प्रशांत भगत, आदींनी केले आहे

### ई-केवायसी होऊनही मदत नाही

**आंजी (मोठी)-** आंजी सर्कलमधील शेकडो शेतकरी अद्यापही शासकीय मदतीपासून वंचित असून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून दोन महिने उलटूनही मदतीची रक्कम मिळालेली नाही.कृषी व महसूल विभागाकडून वारंवार आवाहन केल्यानंतर शेतकऱ्यांनी ई-केवायसी केली. मात्र अद्याप खात्यावर पैसे जमा न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. व्यापाऱ्यांचे थकीत पैसे, रासायनिक खते, कीटकनाशके खरेदी करणे अशक्य झाले असून गहू व चना पिकांच्या लागवडीवर त्याचा थेट परिणाम होत आहे. खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

### ग्रामीण रुग्णालय आष्टी समोरील रस्ता अर्धवट

#### वाहनधारक व पादचाऱ्यांची गैरसोय;रस्त्याचे काम त्वरित सुरू करा; बांधकाम विभागाला निवेदन




**आष्टी/ जनमाध्यम**

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालय समोरील मुख्य रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असून गेल्या अनेक दिवसांपासून सदर काम बंद असल्यामुळे वाहनचालकांसह पायी ये-जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खडबडीत व उखडलेल्या रस्त्यावरून प्रवास करताना अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांना फार त्रास सहन करावा लागत आहे.

सदर रस्ता ग्रामीण रुग्णालयासमोरील असल्यामुळे रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह रुग्णवाहिका, दुचाकी व चारचाकी वाहनांची सतत वर्दळ असते. मात्र रस्त्याचे काम अर्धवट सोडल्याने चिखल, खड्डे आणि धूळ यामुळे परिसरातील परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुळीमुळे रुग्णांसह नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपंचायत स्वीकृत सदस्य शेख नासिर यांच्या नेतृत्वाखाली जनशक्ती संघटनेचे तालुकाध्यक्ष विकी माहोरे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करून सदर रस्त्याचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की, हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा असून त्याची तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण होणे आवश्यक आहे. यावेळी दीपक लाटकर, मनोज तिने, सचिन जयवंतकार, मंगेश इंगळे, प्रशांत माहोरे आदी उपस्थित होते. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याचे काम तात्काळ सुरू न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. प्रशासनाने परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अन्यथा नागरिकांमधील रोष वाढण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद देशाचे आदर्श-गजेंद्र सुरकार

## अंधश्रद्धा, कर्मकांड झुगारून विवेक, विज्ञान आणि मनगटावर विश्वास ठेवण्याचा संदेश

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

जगातील प्रत्येक देशाला काही व्यक्ती आदर्श असतात. भारतातही अनेक महान व्यक्तिमत्त्वांनी आदर्श निर्माण केले असून त्यात छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि नवभारताची संकल्पना मांडणारे स्वामी विवेकानंद हे देशाचे खरे आदर्श आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त हिंगणघाट तालुक्यातील वाघोली येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, हिंगणघाट शाखा व महाराष्ट्र शासनाच्या पार्टी (पाटी) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात गजेंद्र सुरकार यांनी विद्यार्थ्यां व गावकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी सुरकार म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना लहानपणापासून भूत, आत्मा, लावडीण-चकवा अशा अंधश्रद्धा सांगितल्या नाहीत. त्यांनी शिवाजी महाराजांना अंधश्रद्धाळू न बनवता विवेकशील माणूस घडविले. अमावस्या व पौर्णिमा या आकाशीय व नैसर्गिक घटना असून त्यांची भीती बाळगण्याचे कारण नाही, हे भान महाराजांना दिले. त्यामुळेच शिवाजी महाराजांनी अमावस्येला अनेक लढाया केल्या आणि त्या जिंकल्या. आजही विज्ञानयुगात अमावस्येला शुभकार्य टाळण्यासारख्या अंधश्रद्धा समाजात घट्ट रुजलेल्या असल्याचे त्यांनी नमूद केले.



स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथे जाण्यापूर्वी संपूर्ण भारत पिंजून काढला. जात, धर्म, लिंगभेद, कर्मकांड, पूजा-अर्चा यांचा गैरफायदा घेऊन काही पुजारी, पुरोहित, ज्योतिषी लोकसामान्यांना लुबाडतात, महिलांचे शोषण होते, त्यामुळेच देशात गरीबी, रोगराई, कुपोषण वाढले, असे विवेकानंदांचे निरीक्षण होते. भारत शक्तिशाली करायचा असेल तर नविन देव, नविन धर्म व नविन ग्रंथ निर्माण करावे लागतील, असा आग्रह त्यांनी धरला होता, असेही सुरकार यांनी सांगितले. आजचा तरुण वर्ग अंधश्रद्धा आणि तथाकथित चमत्कारांच्या मागे भरकटत असल्याची खंत व्यक्त करत, यावेळी बूवा-बाबा, माता, देवी, पिर-पाद्री कशा प्रकारे फसवणूक करतात, याचे प्रात्यक्षिकांसह प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून मा. पोहाने, शाळा व्यवस्थापन समितीच्या भारती महाकाळकर, मुख्याध्यापिका डुंबरे मॅडम, प्रभाग अध्यक्षा सोनू भोयर, वाघोली प्रभाग प्रमुख भारत हेमके, जामणी प्रभाग प्रमुख अश्विनी गावंडे, कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सवाई मॅडम, रजनी सुरकार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योत्स्ना जांभुळकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर बडोले यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, कर्मचारी व गावकरी उपस्थित होते.

### देशी वाणांचे संवर्धन करणे आवश्यक-जीवन काळबांडे

**कारंजा (घा)/ जनमाध्यम**

सामाजिक वनीकरण विभाग वनपरिक्षेत्र कारंजा घाडगे व श्री सोहमनाथ विद्यामंदिर उमरी येथे देशी वाणांचे संवर्धन व जैवविविधता आणि आपले ताट या विषयावर मार्गदर्शन जीवन काळबांडे, बजाज फाउंडेशन, वर्धा, वनविभागाचे प्रकाश देशभ्रतार यांनी आपले विचार मांडले. प्रस्ताविक मुख्याध्यापक राजकुमार तिरभाने यांनी मांडले.मेरी लाईफ थीम अंतर्गत स्वच्छता व वृक्षारोपण करण्यात आले. देशी वाणांचे संवर्धन अभ्यास यावर अभ्यासपूर्ण विचार मांडण्यात आले. विद्यार्थ्यांना जैवविविधता, विविध बीज संवर्धन, आपल्या थाळी मधील भाजी व अन्न, पारंपरिक पद्धतीने शेती, बी बियांचे संवर्धन, गांडुळखत, जमिनीची प्रत व आपले वनवैभव आणि संवर्धन या विषयावर चर्चासत्र करण्यात आले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले. सामाजिक वनीकरण विभाग वनपरिक्षेत्र कारंजा तर्फे सर्वांना भोजन देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण ने करण्यात आली. संचालन नीलम गोहते, प्रतीक्षा काळभूत यांनी तर आभार मनिषा कामथे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन साठी युवराज किनकर, रामेश्वर डोंगरे, ईश्वर हिंगवे यांनी सहकार्य केले.

### रानडुकराच्या हल्ल्यात युवक जखमी

मोझरी (शेकापूर)-येथील युवकावर रानडुकराने अचानक हल्ला केल्याची घटना घडली. राहुल वसंतराव ढुमणे (वय ३२) असे जखमी युवकाचे नाव आहे.राहुल ढुमणे हे सकाळी मोझरी शिवारातील शेतात कामासाठी गेले असता तुरीच्या पिकात लपून बसलेल्या रानडुकराने अचानक हल्ला केला. यात ते गंभीर जखमी झाले.

# सामाजिक भान असेल तरच समाजाची उन्नती -प्रलय टिप्रमवार

## स्व.मा.सा. कन्नमवार यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

कुठल्याही समाजाची खरी प्रगती ही समाजातील नेत्यांमध्ये सामाजिक भान जागृत असल्याशिवाय शक्य नाही, असे परखड मत ज्येष्ठ समाजसेवक तथा संकल्प फाउंडेशन, यवतमाळचे अध्यक्ष प्रलय टिप्रमवार यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्राचे द्वितीय मुख्यमंत्री स्व. मा. सा. कन्नमवार यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मातोश्री सभागृह, हिंगणघाट येथे बोलत होते.

स्व. मा. सा. कन्नमवार यांच्या जीवनातील संघर्षमय प्रसंगांचा उल्लेख करत टिप्रमवार यांनी समाजबांधवांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. समाजहितासाठी घेतलेले निर्णय, त्याग व चिकाटी आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभाताई गुंडलवार होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेश आसमवार, प्रा.तारीखा इंगेवार (वर्धा), प्राविण चिटटवार (नागपूर) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्व. मा. सा. कन्नमवार व स्व. अण्णाजी वदनलवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.कार्यक्रमात स्मिता कोपूलवार यांच्या चमूने मधुर स्वागतगीत, शिवानी भंडारवार यांच्या चमूने गणेशवंदना तर मंजूषा चिटटवार यांच्या चमूने मनमोहक समूह नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.




मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन प्रविण चिटटवार, प्रमोद नगरवार, अमित आगुलवार व निखिल वदनलवार यांनी केले.

यावेळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.पलक येनपूतवार, जिज्ञासा गिंदेवार व आदित्य नागुलवार यांना सन्मानित करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिक रेणुका नगरवार व ताराबाई नगरवार यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमानिमित्त रांगोळी, फुल सजावट, प्रश्नमंजूषा, नृत्य, संगीत खुर्ची आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धांतील विजेत्यांना आकर्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धांना समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यानंतर प्रा.तारीखा इंगेवार यांनी स्व. मा. सा. कन्नमवार यांचा प्रेरणादायी जीवनपट उलगडून सांगितला. डॉ. राजेश आसमवार यांनी समाजाने कन्नमवार यांच्या संघर्षाचा विसर पडू देता कामा नये, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात विभा गुंडलवार यांनी महिलांनी स्व. कन्नमवार यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक पुढे येण्याची गरज व्यक्त केली.प्रस्तावना व समाज संघटनेचा कार्यआढावा प्रविण चिटटवार, अध्यक्ष बेलदार समाज संघटना, हिंगणघाट यांनी मांडला. आभार प्रदर्शन संजय कोपूलवार यांनी केले. कार्यक्रमस्थळी समाजबांधवांची मोठी गर्दी उसळली होती.दरम्यान, डॉ. गिंदेवार हॉस्पिटल, हिंगणघाट यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व विविध चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमित आगुलवार, डॉ. अजय गिंदेवार, निखिल वदनलवार, प्रमोद नगरवार, चंद्रकांत फेदेवार, राजू चिटटवार, संजय चिटटवार, संजय कोपूलवार, राजू कोंडावार आदींनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ५१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मतदान प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी निवडणूक कर्मचारी सज्ज

## -ईव्हीएमसह मतदान केंद्रांकडे रवाना

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने लोकशाहीचा हा महत्त्वपूर्ण उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण निवडणूक प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व सुरळीत पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेले सर्व निवडणूक अधिकारी व कर्मचारी कर्तव्यावर दाखल झाले असून त्यांनी आवश्यक तयारी पूर्ण केली आहे.





निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अमरावती महानगरपालिका सातही झोन कार्यालयांमार्फत मतदानासाठी आवश्यक असलेले साहित्य निवडणूक कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आले. यामध्ये ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन), मतदार यादी, मतदानासाठी लागणारे शिक्के, सील, फॉर्म्स, ओळख पटविण्याचे साहित्य तसेच इतर पूरक साहित्याचा समावेश आहे. साहित्य वितरणाची प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

साहित्य स्वीकारल्यानंतर सर्व निवडणूक कर्मचारी ईव्हीएम मशीनसह आपल्या संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाले आहेत. मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयी, तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन, गृह रक्षक दल व इतर सुरक्षा यंत्रणा सतर्क असून मतदान केंद्रांवर विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रशासनाकडून सतत देखरेख ठेवण्यात येणार आहे.

नागरिकांनी निर्भयपणे, उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांचा सक्रिय सहभाग लोकशाही अधिक मजबूत करणारा ठरेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# विद्यापीठातील वक्तृत्व स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' आणि 'एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन' यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

स्पर्धेसाठी 'राजमाता जिजाऊ यांची विचारधारा व संस्कारांची आजच्या समाजातील उपयुक्तता', 'राजमाता जिजाऊ : स्त्री नेतृत्वाचा ऐतिहासिक आदर्श' आणि 'स्वराज्य निर्मितीतील जिजाऊंचे मातृत्व व नेतृत्व' असे तीन विषय ठेवण्यात आले होते. स्पर्धक विद्यार्थ्यांनी तीनही विषयांवर अत्यंत प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि भावनिक मांडणी करत मॉ जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले. प्रथम पुरस्कार साक्षी पवार हिला ५००१, द्वितीय प्रतिक्षा दापूरकर हिला ४००१, तृतीय मनश्री अढाऊ ३००१, चतुर्थ पुरस्कार तन्वी मानकर हिला २००१ व उत्तेजनार्थ १००१ रु. चा पुरस्कार पल्लवी नेरकर या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करुन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परिक्षण डॉ. वैभव मस्के, प्रा.अभिजित इंगळे, डॉ. मनिषा इंगलकर, प्रा. पुजा अलोणे व प्रफुल्ल कुबडे यांनी केले. याप्रसंगी विभागाचे संचालक डॉ.श्रीकांत पाटील तसेच परिक्षक डॉ. वैभव मस्के, प्रा. अभिजित इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. आदित्य पुंड, तर आभार डॉ. अनघा देशमुख यांनी मानले. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

# ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. २७ जानेवारी २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

# गणेश जयंती निमित्त श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञ सप्ताह

**मोर्शी/प्रतिनिधीः-** उदखेड येथील टेकडीच्या गणपती मंदिर संस्थानात गणेश जयंती निमित्त श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञ सप्ताह यात्रा महोत्सवाचे दि. १५ जाने ते. दि. २२ जाने दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.



गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी सकाळी श्री चा अभिषेक व तीर्थ स्थापना गजानन रडके यांच्या हस्ते होणार आहे. उदखेड येथील श्रीराम मंदिर ते गणपती मंदिरापर्यंत भागवत कथा ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत उदखेड वरला येथील ग्रामस्थ तसेच वारकरी संप्रदाय भजन मंडळी, महिला भजन मंडळी सहभागी होणार आहे.

दररोज दुपारी १ ते ५ वाजता पर्यंत आळंदी देवाची येथील ह भ प मंगेश महाराज गावंडे यांच्या मधुर वाणीतून भागवत गीता वाचनाला प्रारंभ होणार आहे. या सप्ताह दरम्यान दररोज सायंकाळी सात वाजता हरिपाठ तसेच उदखेड, वरला, खेड,येरला, विष्णोरा, लाडकी बुजरुक येथील भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी ह भ प मंगेश महाराज गावंडे यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर दुपारी एक वाजल्यापासून महाप्रसादाला सुरुवात होणार आहे. या महाप्रसादाचा जास्तीत जास्त भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन गणपती मंदिर संस्थांच्या पदधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ करीता प्रत्यक्ष मतदान दिनांक १५ जानेवारी, २०२६ रोजी होणार आहे. या निवडणुकीत अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागातील दिव्यांग तसेच ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे शक्य नसल्यास, त्यांच्या सोयीसाठी ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित मतदारांनी खाली नमूद केलेल्या संपर्क अधिकाऱ्यांशी WhatsApp द्वारे संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी आदल्या दिवशी संबंधीतांना सुचना द्यावयाचे असल्यास WhatsApp वर मॅसेज करावा.

झोननिहाय मतदान केंद्र व संपर्क अधिकारी तपशील : झोन क्र. १ – रामपुरी कॅम्प प्रभाग क्र. : १, २, ५ वाहन क्रमांक : MH 31 DS 0141 संपर्क अधिकारी : डॉ. पुजा देशमुख मोबाईल क्रमांक : ७४४८२३९०९५ झोन क्र. २ – नवीन तहसील कार्यालय प्रभाग क्र. : ३, ४, ७ वाहन क्रमांक : MH 30 L 4140 संपर्क अधिकारी : डॉ. दिपिका वावगे मोबाईल क्रमांक : ८७६६४७८८९७ झोन क्र. ३ – मनपा झोन कार्यालय, क्र. २, राजापेठ प्रभाग क्र. : ११, १२, १८ वाहन क्रमांक : DD 01 AG 9811 संपर्क अधिकारी : डॉ. प्रियंका हिवराळे मोबाईल क्रमांक : ७७२१८७३७४९ झोन क्र. ४ – मनपा झोन कार्यालय, क्र. ३, दस्तुरनगर प्रभाग क्र. : ८, ९, १० वाहन क्रमांक : MH 27 C 5985 संपर्क अधिकारी : डॉ. संतोष तोटे मोबाईल क्रमांक : ९३२६३२९७६८ झोन क्र. ५ – मनपा शिक्षण विभाग, अंबापेठ प्रभाग क्र. : ६, १३, १७ वाहन क्रमांक : MH 31 CD 1381 संपर्क अधिकारी : डॉ. तुषार पोहणकर मोबाईल क्रमांक : ९४०३४२२३०६ झोन क्र. ६ – जुने तहसील कार्यालय प्रभाग क्र. : १४, १५, १६ वाहन क्रमांक : MH 27 C 5794 संपर्क अधिकारी : डॉ. अस्मिता मुंद्रे मोबाईल क्रमांक : ७४९९१५०६५९ झोन क्र. ७ – मनपा झोन कार्यालय, क्र. ४, बडनेरा प्रभाग क्र. : १९, २०, २१, २२ वाहन क्रमांक : MH 12 FC 9670 संपर्क अधिकारी : डॉ. वैशाली मोटघरे मोबाईल क्रमांक : ८०८७२८२०५८ झोन क्र. ८ – मनपा झोन कार्यालय, क्र. ४, बडनेरा प्रभाग क्र. : १९, २०, २१, २२ वाहन क्रमांक : MH 27 X 9884

संपर्क अधिकारी : डॉ. विपुल मेश्राम मोबाईल क्रमांक : ७०२०६४९५१९

सदर सेवेबाबत संबंधित संपर्क अधिकारी प्रतिसाद देत नसल्यास, अतिरिक्त आयुक्त (२) – मो.क्र. ८७६६९७२९३७ वैद्यकीय आरोग्य अधिकारी – मो.क्र. ९४०५२३२७६० यांच्याशी संपर्क साधावा, असे महानगरपालिकेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिकेने शहरातील सर्व पात्र दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.


## जाहीर सुचना

आमचे पक्षकार श्रीमती शरयु आशिष मुलार, वय ३१ वर्षे तथा अधिराज आशिष शरयु मुलार अज्ञान (वय २ वर्षे) रा.ह. मु. श्याम शहाणे, रेणूका माता मंदिराजवळ, अर्जुन नगर, अमरावती, ता.जि. अमरावती. पोस्ट ऑफिस शिवाजी नगर, अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून समस्त नागरीकांना ह्या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. गणपतराव मारोतराव मुलार व सौ. देविका गणपतराव मुलार, रा. वार्ड क्र. १७, गजानन कॉलनी, मोर्शी, ता. मोर्शी, जि. अमरावती यांचा मयत मुलगा नामे आशिष गणपतराव मुलार यांची विधवा पत्नी नामे श्रीमती शरयु आशिष मुलार व अज्ञानधारक मुलगा नामे अधिराज आशिष मुलार यांना विद्यमान न्यायालयानी मयताचे कायदेशीर वारस घोषीत केल्यानंतर, मयताचे आई-वडील नामे सौ. देविका गणपतराव मुलार व श्री. गणपतराव मारोतराव मुलार यांची वडीलोपार्जीत खालील वर्णनांकीत केलेली स्थावर शेती मिळकत व घर मिळकत आमच्या पक्षकाराच्या पश्चात विकण्याचा, तबदील करण्याचा व विल्हेवाट लावण्याचा प्रत्यन सुरू केलेला आहे, असे आमच्या पक्षकाराला खात्रीलायक माहिती प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | मौजा | तालुका,जिल्हा | गट क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| १ | पेठमांगरूळी | ता. वरूड, जि. अमरावती | २१४/६७/१ | १ हे. ७५ आर. |
| २ | करजगांव | ता. वरूड, जि. अमरावती | ८२ | ३ हे. ३१ आर. |
| ३ | गोरेगांव | ता. वरूड, जि. अमरावती | १९७ | ० हे. ४५ आर. |
| ४ | सावंगा | ता. वरूड, जि. अमरावती | २८७ | ० हे. ८९ आर. |

मयताच्या आई-वडीलांनी आमच्या पक्षकाराच्या संमती शिवाय त्रयस्त इसमास विकण्याचा तथा तबदील करण्याचा व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर ठरून आमचे पक्षकारांवर कायेदीशर बंधनकारक राहणार आहे. करीता कोणत्याही त्रयस्तांनी आमच्या पक्षकाराच्या संमती शिवाय कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, केल्यास बेकायदेशीर ठरेल, याची नोंद घ्यावी. करीता जाहीर नोटीस प्रसिद्धीस असे.

स्थळ : अमरावती
दिनांक : १००/०१/२०२६

**पक्षकाराची सही**
श्रीमती शरयु आशिष मुलार तथा अधिकार आशिष मुलार(अज्ञान)

सही
**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
ॲड. शरद टेकाडे, अमरावती
मो. नं.९९६०४०२५६१

## जाहीरनामा/सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- २८४२/२०२५ पुढील तारीख २०.०१.२०२६
मनोज विरूध्द निरंक

अर्जदार **1. Manoj Kamalakar Wakekar**
Age-56 yrs Occ-Labour
R/o B-1 Ashiyana Apartment Vidhya Colony Road, Camp Behind Court Amravati
**2. Sudhir Kamalakar Wakekar** Age-58 yrs Occ-Labour R/o behind Court Camp B-3 Ashiyana Apartment Vidhya Colony road Amravati
**3. Ranjana Shrikant Ingole**
Age-62 yrs Occ Household R/o behind Court Camp B-1 Ashiyana Apartment Vidhya Colony road Amravati
**4. Sadhana Kamalakar Wakekar** Age-61 yrs Occ-Household R/o behind Court Camp B-1 Ashiyana Apartment Vidhya Colony road Amravati

**विरुध्द**
**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत आशा कमलाकर वाकेकर** दि. २९ ०९.२०२५ रोजी अमरावती, येथे मयत झाले **अर्जदार मनोज व इतर विरूध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **अर्जदार मनोज व इतर विरूध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १६.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती**

नमुना २
(नियम १४ व २४ पहा )
**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० (२) अन्वये सूचना**

**ज्याअर्थी तालुका :- धामणगावं** **गाव :- विरुळ रोघे**

गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विर्निर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभागीय क्रमांक |
|---|---|---|
| ३७७२ | नोंदीचा प्रकार :वारस<br>फेरफाराचा दिनांक : १४/०१/२०२६<br>माहिती मिळालेला दिनांक :१२/०१/२०२६ श्री/श्रीमती हितेद्र मानसिंग रोघे यांनी अर्ज दिला की गट नंबर/सर्वे नंबर २७९,४४६,२७४ वरील खातेदार कै.मनोहर माधवराव रोंघे हे /हया दिनांक १६/०३/२००५ रोजी मयत झाले/झाल्या असून त्यांना वारस खालीलप्रमाणे<br>१) संदीप मनोहर रोंघे, नाते :मुलगा, वय : ५५, वारसदाराची स्थिती : हयात<br>मयतास वरील वारसाशिवाय अन्य कोणीही वारस नसलेबाबत प्रतिज्ञापत्र, मृत्यू नोंदीचा दाखला जवाब दिलेवरुन व वारस ठराव क्रमांक २४१ प्रमाणे नावे दाखल केली असे. | २७४,२७९,४४६ |

आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवही वरुन मला वाटते, आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तीक कारण आहे.
त्याअर्थी आता मी, शारीक अहमद रियाज अहमद, ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसुल अधिकारी याव्दारे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मवित आहे. ग्राम महसुल अधिकारी विरूळ रोंघे यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

**ठिकाण** : विरुळ रोंघे
**दिनांक** : १४/०१/२०२६

**ग्राम महसुल अधिकारी ( सही व शिक्का)**
**सही/-**
**एस.आर.अहमद**
**ग्राम महसुल अधिकारी-विरुळ रोघे**
**साझा क्र.-०५, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती**
**दि.१४/०१/२०२५**

## मा.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदगाव खंडेश्वर, यांचे न्यायालयामधील

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.३५३/२०२५ ने.ता.१६.०२.२०२६

**१.अलका मारोतराव बोपुलकर**
**२.अंकुश मारोतराव बोपुलकर**
**३.प्रशांत मारोतराव बोपुलकर**
**४.पवन मारोतराव बोपुलकर**
सर्व रा.पो.सार्शी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

//वि /
निरंक

ज्याअर्थी **मयत मारोतराव रामकृष्ण बोपुलकर** यांचा मृत्यू दि.**११.११.२०२५ रोजी सार्शी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. **मयताचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे. अर्जदार नं २ ते ४ ही मुले आहेत.** मयत यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार** :- **सरफराज सलाहोद्दीन काझी अजिजोद्दीन**
वय ६५ वर्षे, रा.जामा मस्जिद जवळ यासीनपुरा, दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती
**तर्फे** :- **ॲड डि.बी.अग्रवाल, मुर्तिजापुर रोड,**
मु.पो. गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

खालील सही करणार जाहिर नोटीस देतो की,

आमचे पक्षकार हे उपरोक्त पत्यावर राहत असून त्याचे शाळेच्या दाखल्यात काझी हा शब्द वडिलांच्या नावाअगोदर पाहिजे होता परंतु नजर चुकीचे आमचे पक्षकाराचे नावासमोर लिहल्या गेल्या. याबाबत आमचे पक्षकारानाने मा.आयुक्त साहेब शिक्षण विभाग, अमरावती यांना सुध्दा कळविले आहे. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, ११-१७ डिसेंबर २०२५ मध्ये पेज नं. ५७ नुसार क्र.**N- 2569143** प्रमाणे पुर्ण नांव सरफराज सलाहोद्दीन काझी अजिजोद्दीन **Saraf Salahuddin Quazi Azizuddin** हेच बरोबर असल्याचे प्रकाशित सुध्दा केलेले आहे.

त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हीग लायसंन्स यावर सुध्दा त्याप्रमाणे नोंदणी झालेली आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा वाद असेल तर ७ दिवसाच्या आत योग्य दस्तासह खालील दिलेल्या पत्यावर संपर्क साधावा. वेळ संपल्यावर कोणाताही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही.

करिता जाहीर नोटीसीने सुचविले आहे.

**सही**
**ॲड.डि.बी.अग्रवाल**
**गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती**
**मो.नं.७५८८०८५२०१**

## जाहीर नोटीस

**अंजनगाव सुर्जी जि.अमरावती येथील (श्री.एस.बी.बहिरट) दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५६४/२०२५ ने.ता.२०.०१.२०२६

१. **श्रीकृष्ण भगवान वाघ,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. **कांताबाई देविदास दामोधर,** वय ६९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. **निर्मला विलास आठवले,** वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. **मिरा विलास कांबे,** वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
नं.१ रा.हिंगणी, गावंडगाव, खुर्द ता. अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती
नं.२ रा.शेरी वडनेर, पो.माळेगाव, बाजार, ता.तेल्हारा, जि.अकोला
नं.३ रा.दहीहांडा, ता.जि.अकोला
नं.४ रा.सासन रामापुर ता.दर्यापूर, जि.अकोला ....**अर्जदार**

-- **विरुध्द** --
**निरंक** ....**गैरअर्जदार**

ज्याअर्थी या नोटीसव्दारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडिल नामे **भगवान पुंजाजी वाघ** यांचा **दिनांक ०३.०३.१९९७** रोजी मृत्यू झाला. तसेच अर्जदाराची आई नामे **गोकर्णा भगवान वाघ यांचा दिनांक २५/०२/२०२२** रोजी मृत्यू झाला. **अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे वारस खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीकृष्ण भगवान वाघ | ५२ वर्षे | मुलगा |
| २ | कांताबाई देविदास दामोधर | ६९ वर्षे | मुलगी |
| ३ | निर्मला विलास आठवले | ४९ वर्षे | मुलगी |
| ४ | मिरा विलास कांबे | ५१ वर्षे | मुलगी |

**या व्यतिरिक्त इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.**

**भगवान पूंजाजी वाघ, गोकर्णा भगवान वाघ** हे मरण पावल्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरिता तसेच इतर कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता विद्यमान **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंजनगाव सुर्जी** येथे **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता** अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर **जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून एक महिन्याचे आंत आपले म्हणणे सादर करावे.** अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरुन अर्जावर सुनावणी करुन अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१८.१२.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय , क.स्तर, अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

प्रो.नं.११७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१३.०१.२०२६

वि.सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
आर.एम.जे.सी.अर्ज क्र.७/२०२६ ने.ता. ११.०२.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. **वत्सला सुरेश कपिले,** वय ६९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.खोलापुरी गेट, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **भरत सुरेशराव कपिले हे** दिनांक **२५.०८.२०२५** रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** - **भरत सुरेशराव कपिले** यांचे नांवे मौजा दर्यापूर,ता.दर्यापूर, जि.अमरावती ग्रा.पं. गायवाडी अंतर्गत मालमत्ता क्र.१४४३, प्लॉट नं. २९,क्षेत्रफळ १३५६ चौ.फुट (१२६ चौ.मि.) येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत २०,०००/- रु.आहे.

आज दि.१३.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

प्रो.नं.११८/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१३.०१.२०२६

**वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
**आर.एम.जे.सी.अर्ज क्र.६/२०२६ ने.ता. १०.०२.२०२६**

## जाहीर नोटीस

**अर्जदार -** १. **मनोज गोपाळ ओलीवकर,** वय ४५ वर्षे, धंदा - नोकरी
२. **संदिप गोपाळ ओलीवकर,** वय ४१ वर्षे, धंदा - नोकरी
दोन्ही रा.बिल्डीग नं.एम.-९, श्रीनगरी अप्पुघराच्या पाठीमागे, पिंप्री, पुणे

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **माया गोपाल ओलीवकर हया** दिनांक **०२.०८.२०२२** रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** - **माया गोपाल ओलीवकर** यांचे नांवे मौजा थिलोरी,ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.५९५, १ हे २० आर, आ.रु. ६.००/- यामध्ये सामाईकात हिस्सा आहे.

आज दि.१३.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १३०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




### दर्यापूर शहरात जड वाहतुकीवर बंदी घालण्याची मागणी

**खल्लार-** दर्यापूर शहरात अलीकडच्या काळात वाढत चाललेल्या अपघातांच्या घटनांचा गंभिर पध्दतीने विचार करून शहरातील जड वाहनांना सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत शहरात प्रवेशबंदी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी केली आहे. यासंदर्भात पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन दर्यापूर यांना निवेदन सादर केले. शहरातील मुख्य रस्त्यांवरून धावणाऱ्या ट्रक, ट्रान्सपोर्ट आणि इतर भारी वाहनांमुळे शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना जिल्हा समन्वयक प्रदीप वडतकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, युवासेना तालुका प्रमुख सागर गिऱ्हे, युवासेना शहर प्रमुख रुपेश मोरे, शिवसेना उपशहर प्रमुख दिपक बगाडे, शिवसेना उपशहर प्रमुख सदाफ सुफी,उपसरपंच शरद आठवले, युवासेना उपतालुकाप्रमुख आशिष लायडे, युवासेना उपशहर प्रमुख शुभम विल्हेकर, युवासेना उपशहर प्रमुख राज गुजराती, निलेश ढाकरे, गिरीश रंगारी, कलीम कुरेशी यांसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील वाहतूक पोलिस पथकाला योग्य उपाययोजना राबवून नागरिकांचे प्राण व सुरक्षितता जपण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.




### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जलसंधारणाची कामे सुरू

**बेलोरा-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्राम पंचायत बेलोरा येथे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी जलसंधारणाची महत्त्वपूर्ण कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग, बंधारा बांधकाम तसेच विहीर पुनर्भरण या कामांचा समावेश आहे. ही सर्व विकासकामे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात येत असून आदरणीय सरपंच भैय्यासाहेब कडू यांच्या नेतृत्वाखाली तसेच संपूर्ण ग्रामपंचायत सदस्यांच्या सहकार्याने कामांना सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांमुळे पाण्याची साठवण क्षमता वाढून भूजल पातळी सुधारण्यास मदत होणार असून शेतकरी व ग्रामस्थांना त्याचा मोठा लाभ होणार आहे.ग्राम पंचायत बेलोरा जलसंधारणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकासाच्या दिशेने भक्कम पावले उचलत असून, या कामांचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत आहे.



### उद्योजकता विकास विषयावर मार्गदर्शन

**अमरावती-** कृषी विभाग व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अमरावती यांच्यामार्फत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना अंतर्गत अन्न व फळ प्रक्रिया उद्योग या विषयावर एक दिवसीय मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.शिबिरामध्ये प्रा. गजानन अढाऊ यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना ही केंद्र सरकारची योजना असून, सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना आर्थिक मदत (सबसिडी, कर्ज) आणि पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी सुरू केली आहे, ज्यामुळे, शेतकरी स्वतःचा वैयक्तिक व्यवसाय सुरू करू शकतील. यामध्ये १० लाखांपर्यंत अनुदान, प्रशिक्षण आणि बँकेच्या कर्जाची सोय आहे. केंद्र सरकारची प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना उद्योगाला प्रोत्साहन देत आहे. विविध अन्नधान्य व स्थानिक उत्पादन होणाऱ्या फळ पिकांवर प्रक्रिया करून विविध प्रकारचे व्यवसाय करून शेतकरी व उद्योजक अधिक चांगला नफा कमवू शकतात अशी माहिती प्रा. गजानन अढाऊ यांनी दिली.शिबिरासाठी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयाचे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना चे जिल्हा नोडल अधिकारी गजानन देशमुख, कृषी विभागाचे सचिन देशमुख तसेच महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अमरावतीचे नेत्रदीप चौधरी यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.



### 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते' योजनेच्या निविदा प्रक्रियेला प्रारंभ

**अमरावती-** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची शेतात ये-जा करण्याची अडचण दूर करण्यासाठी आणि शेतमाल बाजारपेठेपर्यंत नेण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना'अमरावती जिल्ह्यात प्रभावीपणे राबविली जात आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बारामाही दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज असून, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष प्रशिक्षण नुकतेच पूर्ण झाले. या योजनेअंतर्गत गाव नकाशावरील अतिक्रमित झालेले शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करून त्या ठिकाणी दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रस्ते तयार करण्यात येणार आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी इच्छुक कंत्राटदारांकडून १४ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

# दाट झालेल्या तुरीवर ड्रोनद्वारे औषध फवारणी

## चांदूर बाजार तालुक्यात तळवेल येथे नाविन्यपूर्ण प्रयोग

**टाकरखेडा संभू/ वार्ताहर**

सध्या तूर पीक मोठ्या प्रमाणात दाट झाले असून उंच वाढ झाल्यामुळे पारंपरिक पद्धतीने औषध फवारणी करणे शेतकऱ्यांसाठी अडचणीचे ठरत आहे. अशा परिस्थितीत ट्रॅक्टर किंवा मजूर वर्ग शेतात जाणे कठीण होत असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर चांदूर बाजार तालुक्यातील तळवेल येथे ड्रोनच्या सहाय्याने तुरीवर औषध फवारणी करण्याचा नाविन्यपूर्ण प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे.

तळवेल येथील प्रवीण प्रकाशराव फुलझेले यांच्या शेतात तब्बल १२ एकर क्षेत्रावर ड्रोनद्वारे औषध फवारणी करण्यात आली. तूर दाट झाल्यामुळे हाताने किंवा यंत्राद्वारे फवारणी करताना पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असते, तसेच मजुरांची कमतरता आणि वाढलेला खर्चही



शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरते.

ड्रोनच्या वापरामुळे कमी वेळेत, अचूक प्रमाणात आणि समान पद्धतीने औषध फवारणी करता आल्याने पिकाचे संरक्षण प्रभावीपणे झाले आहे.

या प्रयोगामुळे वेळ, मजुरी आणि खर्चात बचत झाली असून शेतकऱ्यांच्या आरोग्यालाही धोका कमी झाला आहे. ड्रोनमुळे उंच व दाट पिकांवर सहज फवारणी शक्य झाल्याने हा प्रयोग परिसरातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाची तालुक्यात सर्वत्र चर्चा सुरू असून अनेक शेतकरी ड्रोन तंत्रज्ञान वापरण्याबाबत उत्सुकता व्यक्त करत आहेत.

शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास उत्पादनवाढीसोबतच खर्चातही बचत होऊ शकते, हे या प्रयोगातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# कांद्याचा मालवाहू ट्रक उलटून अपघात

## राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा येथील घटना

**तिवसा/ वार्ताहर**

मालवाहू ट्रकमध्ये कांद्याचे कट्टे भरून कलकत्ता जाण्यासाठी अमरावतीवरून नागपूरकडे जाणारा ट्रक राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा येथील पंचवटी चौकात अनियंत्रित होऊन उलटला.आज पहाटे ४ वाजता ही घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, मालवाहू ट्रक क्रमांक -२३,-६५३३ हा कांद्याचे कट्टे लोड करून नागपूरमार्गे कलकत्ता जाण्यासाठी निघाला होता.दरम्यान आज बुधवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास अचानक तिवसा येथील पंचवटी चौकात राष्ट्रीय महामार्गाच्या स्पीडब्रेकरवर ट्रकचा बेल्ट तुटला व ट्रकचे चाके



फिरून तो अनियंत्रित होऊन नागपुरच्या दिशेहून थेट अमरावतीच्या दिशेकडे पलटी झाला.

अपघातात सुदैवाने वाहन चालकाला कुठलीही दुखापत झाली नसली तरी मात्र ट्रकमधील कांद्याचे व ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे. सकाळपासून महामार्गावर अस्ताव्यस्त पडून असलेला कांदा सावरण्याचे काम सुरू होते. दुपारी १ वाजेच्या दरम्यान महामार्गावरील अपघातग्रस्त ट्रक क्रेनच्या साहाय्याने उचलून मार्ग मोकळा करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघाताची नोंद घेतली व वाहतूक सुरळीत करण्यास सहकार्य केले.

## श्रावण बाळ योजनेच्या लाभापासून ९० वर्षीय वृद्ध वंचित

# न्याया करिता २६ जानेवारीला उपोषण

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या श्रावणबाळ योजनेच्या लाभांपासून स्थानिक ९० वर्षीय वृद्ध वंचित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे.



याबाबत माहिती अशी की, स्थानिक मनीराम गंगारामजी राऊत (वय ९० वर्ष) रा. खिडकीपुरा अंजनगाव सुजी तहसील कार्यालयात श्रावण बाळ सेवा योजना अंतर्गत केस मंजूर झाली होती. त्यांना शासनाकडून तेराशे रुपयाचा दर महिन्याला लाभ मिळत होता. परंतु गेल्या एक वर्षापासून त्यांचा लाभ बंद झाला आहे. सध्या स्थितीत त्यांचे ९० वर्षाचे वय आहे.

याबाबत येथील तहसील कार्यालयात चौकशी केली असता आधार कार्डवर त्यांचे वय ६२ असल्याने त्यांचा लाभ बंद झाल्याचे स्थानिक संजय गांधी निराधार योजनेच्या कार्यालयातून सांगण्यात आले आहे.

मनीराम गंगारामजी राऊत रा. अंजनगाव सुर्जी हे अशिक्षित असून त्यांचे शिक्षण झाले नसल्याने त्यांच्याजवळ शाळेचा जन्म तारखेचा दाखला नाही.

परंतु त्यांच्याजवळ जन्म तारखेची कोतवाल बुकाची नक्कल आहे. परंतु कोतवाल बुकाच्या नक्कल च्या आधारे आधार कार्ड वरील जन्मतारीख दुरुस्त होत नाही

आधार कार्ड वरील जन्मतारीख दुरुस्त करण्यासाठी शाळेचाच दाखला पाहिजे असल्याने या ९० वर्षीय वृद्धासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आधार सेतू केंद्रात शाळेची टीसी मागतात.

अशा या तांत्रिक अडचणीमुळे ९० वर्षीय वृद्ध शासनाच्या श्रावणबाळ योजनेच्या सेवा लाभांपासून जवळपास एक वर्षापासून वंचित आहे.

# चारा टंचाईवर मात करण्यासाठी मासोद येथे काटेविरहित 'कॅक्टस' लागवडीचा उपक्रम

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत मासोद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटिकेमध्ये सामाजिक वनीकरण विभागामार्फत काटेविरहित 'कॅक्टस' (निवडुंग) या चारा उपयोगी प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात आली. राजमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. पशुधनासाठी जाणवणारी चारा टंचाई दूर करणे आणि पडिक जमिनीचा सुयोग्य वापर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याप्रसंगी विभागीय आयुक्त कार्यालयाचे अधीक्षक कृषी अधिकारी निलेश ठोंबरे, पशुवैद्यकीय अधिकारी, वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी भालचंद्र गावंडे, प्रवीण गुल्हाने व इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

कॅक्टस ही प्रजाती अत्यंत कमी पाण्यात, डोंगराळ भागात आणि निकृष्ट जमिनीत जिथे इतर फळझाडे येऊ शकत नाहीत, तिथेही जोमाने वाढते. तसेच ही लागवड भूजल पातळी वाढविण्यासही मदत करते.



याप्रसंगी निलेश हेलोंडे पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महाराष्ट्रात उन्हाळ्यात जाणवणारी चारा टंचाई दूर करण्यासाठी काटेविरहित कॅक्टस ही एक क्रांतिकारी वनस्पती ठरू शकते. ही केवळ लागवड नसून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांसाठी एक वरदान आहे. ज्या जमिनीवर काहीही उगवत नाही, अशा पडीक जमिनीत कॅक्टस लावून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवता येतो. कॅक्टसमध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असल्याने जनावरांची पाण्याची गरजही काही प्रमाणात भागते.

या प्रजातीची लागवड प्रत्येक गावात करणे ही काळाची गरज असून, यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल.

यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी कॅक्टसच्या चारा गुणधर्मांबाबत माहिती दिली.

यामध्ये तंतूमय पदार्थ आणि पाण्याचे योग्य प्रमाण असल्याने जनावरांच्या आरोग्यासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरते. चारा टंचाईच्या काळात हा एक स्वस्त आणि शाश्वत पर्याय आहे. विशेष म्हणजे, ३ किलो कॅक्टसपासून ३.३८ स्क्वेअर फूट लेदर तयार होते, ज्याचा वापर जोडे, चप्पल आणि बॅग तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

# माँ जिजाऊंच्या जयघोषासह रॅलीने दुमदुमली नगरी



**मोर्शी-** जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने काढण्यात आलेल्या माँ जिजाऊच्या शोभायात्रा रॅलीने मोर्शीनगरी दुमदुमली. माजी नगराध्यक्ष राजाभाऊ बेले यांच्या हस्ते माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून शोभायात्रा रॅलीचे उद्घाटन करण्यात आले.विदर्भ समाज कल्याण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुहास ठाकरे, मुख्याध्यापक सुधीर सवाई, सुखदेवराव राऊत, जयंत सराटकर आदींच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. ही रॅली मालवीय गार्डन, पुनर्वसन कॉलनी येथून मार्गक्रमण करीत जिजामाता माध्यमिक शाळा येथे रॅलीची सांगता झाली. या रॅलीदरम्यान जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊ यांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी परिधान करून मोर्शीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

# स्व.डॉ.दामोदर पांढरीकर स्मृतीप्रित्यर्थ रोगनिदान व उपचार शिबीर

**अमरावती/ का.प्र.**

श्री दामोदर बहुउद्देशीय संस्था अमरावती, जिल्हा परिषद मुलांची शाळा नांदगाव पेठ, श्री अंबादेवी संस्थान हॉस्पिटल, तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय डॉ दामोदर पांढरीकर स्मृती प्रित्यर्थ ३१ वे रोगनिदान व उपचार शिबीर नुकतेच नांदगाव पेठ येथे उत्साहात संपन्न झाले. विवेकानंद जयंतीच्या पावन पर्वावर दरवर्षीप्रमाणे आयोजित या शिबिराचे उद्घाटन अमोघ वाणीचे वक्ते तसेच गुलाबराव महाराज यांच्या संत साहित्याचे गाढे अभ्यासक,वक्ते प्राचार्य अरविंद देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून झाले.यावेळी व्यासपीठावर आय एम ए चे अध्यक्ष डॉ अलका कुथे, सचिव डॉ राधा सावडेकर ,शाळेचे प्राचार्य बंडूभाऊ मानेकर,वरिष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ ललिता मुलमुले,तसेच डॉक्टर विजय कुठे व डॉ जयंत पांढरीकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री अंबादेवी व स्वर्गीय डॉक्टर दामोदर पांढरीकर यांच्या




प्रतिमेला हार अर्पण,दीपप्रज्वलन व मान्यवरांचे स्वागत करून झाली. प्रास्ताविक भाषणामध्ये दामोदर बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ जयंत पांढरीकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकला तसेच बालकांचे आरोग्य निरोगी कसे ठेवता येईल याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आयएमएच्या अध्यक्ष डॉ अलका कुथे यांनी सातत्याने ३१ वर्षापासून आयोजित केल्या जाणाऱ्या शिबिराचे अभिनंदन केल.स्त्री रोग तज्ञ डॉ ललिता मुलमुले यांनी उपस्थित महिलांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य अरविंद देशमुख यांनी गेले अडीच तपापासून या शिबिराची आयोजन करणाऱ्या पांढरीकर कुटुंबीयांचे अभिनंदन केले. संचालन अंजली पांढरीकर यांनी तर आभार प्रदर्शन आय एम ए च्या सचिव डॉ राधा सावदेकर यांनी केले शिबिरात डॉ सपना व्यास, डॉ कबीर वासनकर इत्यादींकडून करण्यात येऊन सर्व रुग्णांना मोफत औषधोपचार करण्यात आला. ५२ रुग्णांची रक्तगट तपासणी करण्यात आली.शिबिरात एकूण ४२ बालकांना श्वसन रोग, ३४ रुग्णांमध्ये वाताचा विकार तर अंदाजे ३६ महिलांमध्ये ॲनिमियाचा प्रमाण आढळून आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन अंजू पांढरीकर, अंजली बिजवे, विजु पांढरीकर,मोरेश्वर मानेकर, नंदू राजुरकर,रमण जोशी, रामेश्वर उमेकर,अमोल मोर्शे यांनी केले. शिबिराला भरघोस प्रतिसाद मिळण्याकरिता गजानन माळवेकर,निधी पांढरीकर,शेंदरकर,भारती सपाटे, चंदू राजुरकर,वर्षा पांढरीकर,शोभा राजूरकर, अनिता तायडे, वर्षा राजूरकरसह सर्व गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीमुळे वाहतुकीमध्ये अंशतः बदल

**अमरावती/ का.प्र.**

महानगरपालिका अमरावती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख, क्रीडा व वाणिज्य संकुल, महानगरपालिका, नवसारी, अमरावती येथे सकाळी १० वाजेपासून सुरू होणार आहे. तत्पुर्वी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया आटोपल्यानंतर मतदान केंद्रावरील इव्हीम मशीन, कंट्रोल युनीट इत्यादी सामुग्री घेवून येणाऱ्या वाहनांची वर्दळ मतमोजणी केंद्र परिसरात मोठ्या प्रमाणात राहणार आहे. तसेच १६ जानेवारी रोजी मतमोजणी प्रक्रियेसाठी सकाळी ८ वाजेपासून संबंधित अधिकारी, उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी महानगरपालिका क्रीडा संकुल, नवसारी, अमरावती परिसरात मतमोजणीसाठी दाखल होतील.

मतमोजणी प्रक्रीयेसाठी मोठ्या संख्येने येणार शासकीय व खाजगी नागरिक यांची व



वाहनांची वर्दळ लक्षात घेता मतदान केंद्र परिसरात वाहतुक कोंडी, अपघात यासारखा प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. सर्व सामान्य नागरिकांचे जीवित रक्षण व कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी मतमोजणी केंद्र परिसरासमोरील मार्गावरील वाहतुक बंद करून इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी मुंबई पोलीस कायदा तसेच मोटर वाहन कायदा अन्वये हा आदेश जारी केला आहे.

प्रवेश बंदी मार्ग- कठोरा ते छत्रपती संभाजी राजे चौक राजपूत धाबा चौक पर्यंत. कालावधी- गुरूवार १५ जानेवारी २०२६ चे रात्री १० वाजेपासून शुक्रवार १६ जानेवारी २०२६ चे संपूर्ण मतमोजणी प्रक्रीया संपेपर्यंत राहील. याला पर्यायी मार्ग- पंचवटीकडून नवसारीकडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी कठोरा नाका रंगोली लॉन-कठोरा जकात नाका या पर्यायी मार्गाचा वापर करावा. राजपूत धाबाकडून पंचवटीकडे येणाऱ्या सर्व वाहनांनी पर्यायी मार्ग-राजपूत धाबा-रिंगरोड-पोटेपाटील चौक-कठोरा नाका फक्त किंवा राजपूत धाबा-रिंगरोड-पोटे पाटील चौक-रहाटगाव टी पॉईटं या मार्गाचा अवलंब करावा. अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतुकीच्या नियमनाबाबत अंशतः बदल करण्याचे अधिकार राहील.

# महापालिकेच्या ८७ जागेसाठी ८०५ केंद्रावर आज मतदान

## -६.७७ लाख मतदार ठरवणार शहराचे भवितव्य, -६६१ उमेदवारांच्या भाग्याचा होणार फैसला

### इव्हीएमसह पथक रवाना







**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून मतदान केंद्रांवर जाण्यासाठी पोलिंग पार्टी बुधवारी (दि.१४) देखील रवाना झाल्या आहेत. आज गुरुवार १५ जानेवारीच्या सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार आहे. शहरात एकूण २२ प्रभाग आहेत. ज्यात २१ प्रभाग हे ४ सदस्यीय तर एक प्रभाग ३ सदस्यीय आहे. ८७ नगरसेवकासाठी ६६१ उमेदवार रिंगणात उतरले आहे. ६ लाख ७७ हजार १८० मतदार शहराचे भवितव्य ठरवणार आहे. उमेदवारांचे नशीब आज मतपेटीमध्ये बंद होणार आहे.

निवडणुकीची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, या करिता ☞(पान २ वर)

### १६ ला मतमोजणी

मनपा निवडणुकीची मतमोजणी १६ जानेवारी रोजी डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडा संकुल नवसारी येथे ७ झोन निहाय होणार आहे. मतदान आणि मतमोजणीसाठी व्यापक नियोजन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या नेतृत्वात पोलीस विभाग सज्ज आहे. गुरुवारी निवडणूक झाल्यावर उशिरा रात्री पर्यंत मतपेट्या नवसारी येथील क्रीडा संकुल मध्ये पोहोचविण्यात येईल. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मतमोजणी प्रारंभ होणार आहे.

### २६०० पोलीस कर्मचाऱ्यांचा पहारा

निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि भयमुक्त पार पडावी यासाठी ३ उपायुक्त, ७ एसीपी ,९२ एपीआय, पीएसआय, ३१ पोलिस निरीक्षक ,१,६५० अंमलदार आणि महिला पोलिस कर्मचारी निवडणूक कर्तव्यासाठी तैनात करण्यात आले आहेत.

संवेदनशील भागांत करडी नजर ठेवण्यासाठी शहरात अतिरिक्त पोलिस दल देखील तैनात केले आहे. सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी शहरात ९०० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी आणि दोन उपविभागीय पोलिस अधिकारी,३ आरसीपी पथक, ४ क्यूआरटी पथक तैनात करण्यात आले आहेत. गुन्हेगारांवर निगराणी ठेवण्यासाठी गुन्हे शाखेचे अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ८ पथक नेमण्यात आले आहे. या व्यतिरिक्त एफएसटीचे ८, वीएसटीचे ८ व एसएसटीचे १० पथक नियुक्त करण्यात आले आहे. मनपा हद्दीत २२ प्रभागांमध्ये एकूण ४४ क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत ४४ अंमलदार सतत पेट्रोलिंग करणार आहे.

# महादेवखोरी परिसरात कारमध्ये सापडली रोकड

### -मतदार खरेदीचा खेळ

### -निवडणूक रणधुमाळीत 'नोटांचा पाऊस'

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात मतदार खरेदीचा घाणेरडा खेळ सुरू असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात पैशांच्या वाटपाचा प्रकार उघडकीस आल्याने संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. महादेवखोरी परिसरात पोलिसांनी बुधवारी (दि.१४) कारमधून मोठ्या प्रमाणात रोकड जप्त केल्याने खळबळ उडाली आहे.

बुधवारी सायंकाळी सुमारे ६ ते ७ वाजताच्या सुमारास फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे पथक महादेवखोरी परिसरात पेट्रोलिंग करत असताना एका संशयास्पद कारमध्ये रोकड असल्याची माहिती मिळाली.



नागरिकांनीही सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रार केल्यानंतर पोलीस व निवडणूक विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. काही वेळ कारचालक अनुपस्थित असताना, नंतर चालक आल्यानंतर कारची झडती घेण्यात आली. तपासणीदरम्यान कारमध्ये दोन ते तीन लाख रुपयांची रोकड आढळून आली. ही रक्कम नेमकी कोणाची आहे, ती कोणासाठी आणि कशासाठी आणली होती, याबाबत कोणतीही ठोस माहिती चालकाकडून देण्यात आली नाही. ☞(पान २ वर)

# नवसारी मतमोजणी केंद्राची आयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडून पाहणी



**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी नवसारी येथील मतमोजणी केंद्राचे निरीक्षण केले.

आयुक्तांनी या दौऱ्यादरम्यान मतमोजणी कक्ष, स्ट्रॉंग रूम, मीडिया सेंटर, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश–निर्गमन मार्ग, वाहतूक व पार्किंग नियोजन, तसेच



आपत्कालीन सेवा यांचा सविस्तर आढावा घेतला. मतमोजणी केंद्रात येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी व इतर अधिकृत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रवेश व निर्गमन गेट ठेवण्यात आले असून, गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सातही झोनसाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले असून प्रत्येक झोनचा निकाल स्वतंत्रपणे आणि अचूकरीत्या मांडता यावा यासाठी ☞(पान २ वर)

# बडनेरात अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यानुसार बडनेरा रेल्वे पोलिसांनी दोन दारू विक्रेत्यांवर कारवाई करून मुद्देमाल जप्त केला आहे.



बडनेरा रेल्वे पोलीस स्टेशन अंतर्गत मागील एका आठवड्यात अवैधरित्या दारू बाळगून वाहतूक केल्याप्रकरणी २ कारवाई करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये एकूण २ आरोपींविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. निवडणूक पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी बडनेरा रेल्वे पोलीस स्टेशनकडून दक्षता घेण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक अमोल दोंड यांच्या नेतृत्वात कारवाई करण्यात आली.

# घरगुती वादात पत्नीचा पतीवर चाकूने हल्ला

### -पंचशील नगरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-**


घरगुती वादात पत्नीने पतीवर चाकूने हल्ला केल्याची घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पंचशील नगरमध्ये बुधवारी रात्री समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. जखमी पती हरिदास गोविंदराव इंगळे (वय ३५) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार हरिदास इंगळेचे



पंचशील नगर मध्ये राहत्या घरी पत्नीसोबत किरकोळ भांडण झाले होते. पाहता पाहता भांडण वाढत गेले आणि रागाच्या भरात त्यांच्या पत्नीने त्यांच्यावर चाकुने हल्ला केला. यामध्ये ते जखमी झाले.जखमी अवस्थेत त्यांनी ☞(पान २ वर)

# व्यास लेआउट येथे घरफोडी

**मोर्शी/प्रतिनिधीः-** व्यास ले-आउट येथील जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त फिर्यादी शिक्षक साहेबराव लक्ष्मणराव पखाले (वय ६४) हे पत्नी व दोन मुली सोबत वेस लेआउट येथे राहतात. मागील आठ दिवसापासून फिर्यादीच्या पत्नीची तब्येत खराब असल्यामुळे तिच्यावर नागपूर येथील एम्स रुग्णालयात औषध उपचार सुरू आहे. पत्नीची देखरेख करण्याकरिता दोन्ही मुली सुद्धा नागपूर येथेच आहे. फिर्यादी दि १३ जानेवारी रोजी मोर्शी येथे आले होते. सायंकाळी सहा वाजता घराच्या सर्व दरवाजे बंद करून मुख्य दरवाजाला कुलूप लावून वरुड तालुक्यातील काचुर्णा येथे मामीकडे मुक्कामी गेले होते. फिर्यादी हे दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता मोर्शी येथे घरी आले असता घराच्या मुख्य दरवाजाला कुलूप आढळून आले नाही. घरात प्रवेश केला असता घरातील इतर खोलीतील सामान☞(पान २ वर)




# बाथरूममध्ये पडल्याने वृद्धाचा मृत्यू

### रवी नगर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-**

बाथरूम मध्ये पडल्याने जखमी झालेल्या वृद्धचा उपचारादरम्या सुपर स्पेशालिटीमध्ये मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात राजापेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. रमेश लक्ष्मण खंडारे (वय ५७, पंचारत्न अपार्टमेंट,रविनगर ) असे मृतकाचे नाव आहे. माहिती नुसार



रमेश लक्ष्मण खंडारे यांचे दोन महिन्यापूर्वी ऑपरेशन झाले होते तेव्हापासून ते घरीच होते. ८ जानेवारीला दुपारी दोन वाजताच्या सुमारास ते बाथरूम मध्ये गेले होते. २० मिनिटानंतरही बाहेर आले नाही. यामुळे त्यांच्या मुलांनी त्यांना ☞(पान २ वर)

# चांदूर बाजार नगर परिषदेत प्रहार जनशक्ती पक्षाचा सत्तारूढ प्रारंभ

### खुर्चीऐवजी स्वच्छता व रक्तदानातून सत्तेचा पहिला दिवस साजरा


**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** नगर परिषद चांदूर बाजार येथे आज दिनांक १४ जानेवारी २०२६, बुधवार रोजी प्रहार जनशक्ती पक्षाला बहुमताचा स्पष्ट जनादेश प्राप्त झाल्याने, 'राष्ट्र प्रथम प्रहार जनशक्ती पक्ष प्रणीत लोकशाही आघाडी' या नावाने अधिकृत गट स्थापन करण्यात आला. नगर परिषदेच्या एकूण २१ सदस्यांपैकी नगराध्यक्ष मनीषा मनीष नांगलिया यांच्यासह १६ नगरसेवकांचा गट तयार करण्यात आला असून, गटनेता : सचिन खुळे स्वीकृत नगरसेवक : अजय मलिये व शेख नजीम (प्रिन्स) उपाध्यक्ष : शेख रहमान शेख इब्राहिम यांची सर्वानुमते निवड ☞(पान २ वर)



# खानापूर येथे इसमाची गळफास लावून आत्महत्या

**मोर्शी/प्रतिनिधीः-**

मोर्शी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खानापूर येथे मंगळवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास दिनेश बन्सीलाल धुर्वे (वय २६) या इसमाने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मृतक दिनेश धुर्वे यांची पत्नी गेल्या आठ दिवसापासून माहेरी गेली होती. दिनेश राहत्या घरात आई-वडिलांसोबत राहत होता. मंगळवारी सायंकाळी सहा सात वाजताच्या दरम्यान आई वडील सोबत जेवण केल्यानंतर



खोलीत झोपण्याकरिता गेला होता. मृतकाची आई दरवाजा बंद करण्याकरिता गेली असता मुलगा दिनेश गळफास लावून लटकलेल्या अवस्थेत दिसून आला होता. याबाबतची माहिती मोर्शी पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा ☞(पान २ वर)

# तृतीयपंथी मतदारांची बैठक, शंभर टक्के मतदानाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी महानगरपालिका अमरावती सौम्य शर्मा–चांडक यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील तृतीयपंथी मतदारांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत तृतीयपंथी समाजातील मतदारांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी शंभर टक्के मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला.

बैठकीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी तृतीयपंथी मतदारांचे मतदानातील महत्त्व स्पष्ट करताना,



निवडणूक प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे नमूद केले. मतदानाचा हक्क बजावताना कोणत्याही अडचणी आल्यास☞(पान २ वर)

# कीटकनाशक प्राशन करून शेतकऱ्याची आत्महत्या

### कर्जबाजारीपणामुळे टोकाचे पाऊल; सालोरा गावात हळहळ

अमरावती/प्रतिनिधीः-

वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सालोरा (बु.) गावात नापीकीं आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या एका ६५ वर्षीय शेतकऱ्याने घरातच कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. मृत शेतकऱ्याचे नाव नंदकिशोर



रामप्रसाद गौरीहार (वय ६५, रा. सालोरा बु.) असे आहे. घटनेनंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

मृतकाच्या ☞(पान २ वर)

